वर्ष : दूसरे अंक : आठवा
एक परिपूर्ण मासिक
साहित्य चपराक website : www.chaprak.com
चतुरस्त्र परखड रास्त कर्तव्यदक्ष
RNI No. MAHMAR33202/13/1/2008-TC
Declaration No. : PHM/SR/3/VIII/2009

■ संस्थापक संपादक : घनश्याम पाटील
■ उपसंपादक : सौ. चंद्रलेखा बेलसरे, केदार कदम
■ सहसंपादक : राजेंद्र बांदल, शिवराज सणस
■ व्यवस्थापक : वसंतराव पाटील
■ जाहिरात व्यवस्थापक : प्रमोद येवले
■ सल्लागार : ॲड. भगवानराव साळुंखे
■ अंतर्गत सजावट : राम गंगणे
■ मुखपृष्ठ : गुरुगोविंद आंबे
■ मुद्रण सहाय्य : सुनिल गंगाराम मोरे
■ कथाचित्रे : दुर्गा येनपुरे
■ विशेष सहाय्य : मोरेश्वर ब्रह्मे / विनोद पंचभाई
सौ. अनुराधा देशपांडे, विलास पायगुडे,
ॲड. कैलास थोरात, मन्मथ बेलुरे, सौ. गिरीजा गोखले

■ संपादकीय कार्यालय ■
'चपराक प्रकाशन'
१३६०, शुक्रवार पेठ, काळा हौद, पुणे २
भ्रमणध्वनी :९२२६२२४१३२
Email : info@chaprak.com
■ बावधन : श्री सिद्धीविनायक इमारत, सर्व्हे क्र. ११/अ/१/२, बापूजीबुवा मंदिराजवळ, बावधन बुद्रुक, ता. मुळशी, पुणे २१
■ नाशिक : वैभव कुलकर्णी, १४, नर्मदा दर्शन अपार्टमेंट, ब्रह्मगिरी सोसायटी, जेल रोड, नाशिक. दूरध्वनी (०२५३) २४१६५१४

# थोडं मनातलं

एक प्रवासी एका अरण्यातून जात असताना रस्ता चुकतो. भरपूर पायपीट करूनही त्याला त्याची दिशा सापडत नाही. जवळील खाद्यपदार्थही संपलेले असतात. तहानेने जीव व्याकुळ झालेला असतो. अशाच अवस्थेत तो दिवस जातो, रात्र सरते. सृष्टीच्या नियमाप्रमाणे दुसरा दिवस उजाडतो. प्रसन्न पहाटेचे स्वागत करण्याएवढे त्राण त्याच्या शरीरात उरलेले नसतात. हताशपणे तो एका झाडाखाली बसून विचार करत असतो. सततची पायपीट, तहान आणि भूक यामुळे आपल्याला या जागेवरून उठताही येणार नाही, याची जाणीव त्याला होते.

तेवढ्यात समोरून एक वाघ डरकाळी फोडत त्याच्याच दिशेने येताना पाहून त्याचा थरकाप उडतो. साक्षात मृत्युला समोर पाहून तो अस्वस्थ होतो. अतिशय चपळाईने उठतो आणि झाडावर चढून सर्वात वरच्या फांदीवर जाऊन बसतो. वर गेल्यानंतर विचार करतो, माझ्यात तर अजिबात ताकत नव्हती; मग मी इतक्या तत्परतेने झाडावर कसा चढलो? ही ऊर्जा माझ्यात कशी निर्माण झाली?

...असाच काहीसा प्रकार आमच्याबाबतही घडतो. समाजातील वाढलेली अराजकता पाहून आम्ही बैचेन होतो. 'संस्कृतीदूत' म्हणून काम करताना वाढलेली आणि वाढत चाललेली गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दहशत, अनैतिकता पाहून आम्ही अस्वस्थ होतो. वाईट प्रवृत्तीविरूद्ध, विविध क्षेत्रातील समाजद्रोह्यांविरूद्ध त्वेषाने पेटून उठतो. याचे प्रतिबिंब 'चपराक'मधून आपण अनेकवेळा अनुभवलेच आहे. चराचरातील सर्व चांगल्या शक्तींना एकत्र करून यापुढील काळातही ही धार आणखी प्रखर करण्याचा मानस आहे. या विधायक संकल्पसिद्धीसाठी आपणा सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

दिवाळी हा सण फक्त प्रकाशाचा नसून 'विचारां'चाही आहे. ज्योतीने ज्योत पेटावी आणि अंधार नष्ट व्हावा; त्याप्रमाणेच चांगले विचार सर्वदूर पसरावेत आणि सर्वत्र 'विचार दिवाळी' उत्साहात साजरी व्हावी, याच मंगलमयी दीपावलीच्या अंतःकरणापासून शुभेच्छा!

**-घनश्याम पाटील**

**वार्षिक वर्गणी : २००/- रु.**
**द्विवार्षिक वर्गणी : ३८०/- रु.**
**पंचवार्षिक वर्गणी : ९००/- रु.**
(सर्व विशेषांकासह)

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक घनश्याम वसंतराव पाटील यांनी हे मासिक मायबोली प्रिंटर्स, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'चपराक प्रकाशन', मधुराज अपार्टमेंट, नामदेवराव मोहोळ विद्यालयाजवळ, बावधन (खुर्द), पुणे ४११०२१ येथून प्रकाशित केले.
**अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही.**
न्यायालयीन कारवाई पुणे न्यायालयाअंतर्गत. **भ्रमणध्वनी** : ९२२६२२४१३२




मा.ना. शरदचंद्रजी पवार
केंद्रिय कृषीमंत्री भारत

'साहित्य चपराक' मासिकाच्या सर्व वाचकांना ही दिवाळी सुख-समृद्धीची, भरभराटीची व आनंददायी ठरो!



मा. ना. अजितदादा पवार
जलसंपदामंत्री, महाराष्ट्र

## शुभेच्छुक



# श्री. मिलिंद हिवलेकर

उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त जाती जमाती सेल



**मा. व्यंकटराव अवधूत**
प्रदेशाध्यक्ष
राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या
विमुक्त जाती-जमाती सेल

**१८, जनता हौसिंग सोसायटी, दिनदयाळ नगर, नागपूर २२, भ्रमणध्वनी : ९४२२१२०९०३**


सुग्रास भोजनाची
वाढवतो लज्जत
'लिज्जत'
पापड
लिज्जत
पापड
उडीद, मूग, पंजाबी,
लाल मिरची, लसुण
SYMBOL OF WOMAN'S STRENGTH
Lijjat
PAPAD
श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड
( खादी आणि ग्रामोद्योग कमिशन द्वारा मान्यता प्राप्त )
ससा
डिटर्जंट पावडर व वडी
असली म्हणजे
काळजीच नको
पैशांची, हाताची, शुभ्रतेची !
ससा
डिटर्जंट पावडर
Active Effect
SASA
WHITE
DETERGENT POWDER
ससा
ग्रीन
डिटर्जंट पावडर
ससा
POWER
SOFT
SASA
सारांश
SYMBOL OF WOMAN'S STRENGTH
Lijjat
PAPAD
ससा
डिटर्जंट पावडर व वडी
श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड
( खादी आणि ग्रामोद्योग कमिशन द्वारा मान्यता प्राप्त )

# अनुक्रमणिका


- असं आमुचं पुणं! / **सुधीर गाडगीळ** / ६
- एम.बी.ए. शिवाय एम.बी.ए. / **प्राचार्य श्याम भुर्के** / १०
- समाज, संस्कृती आणि शासन / **प्रा. मिलिंद जोशी** / १४
- शिवशाहीचा इतिहास जागवणारे किल्ले / **शिवशाहीर अरविंद दाढे** /१८
- सुखी दाम्पत्याचे रहस्य (कथा) / **नारायण शेळके** / २२
- बालगीतांच्या मजेदार दुनियेत / **आश्लेषा महाजन** / २६
- खेळ हुंड्याचा / **प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर** / ३०
- अजब सरकार, गजब सरकार / **सौ. मंजिरी धामणकर** / ४२
- कारुण्याचे शाहीर विनोदकार दत्तू बांदेकर / **डॉ. माधव पोतदार** / ४४
- दुर्लक्षित बालरंगभूमी / **प्रकाश पारखी** / ४८
- सिनेतारकांचा सुवर्णकाळ / **डॉ. मधुसूदन घाणेकर** / ५०
- गणेशविद्या प्रसार चळवळ / **प्रा. अनिल गोरे** / ५४
- सर्वधारांचे तीर्थक्षेत्र : जनसाहित्य / **डॉ. सुभाष सावरकर** / ५६
- अफलातून दानधर्म (कथा) / **प्रभाकर तुंगार** / ६०
- जन्म नामार्थ जाहला / **विलास पायगुडे** / ६४
- श्री. श्री. रविशंकर - एक अलौकिक व्यक्तिमत्व / **प्रा. मानसी रांजेकर** / ६८
- तोच मी बदनाम / **रमेश गोविंद वैद्य** / ७२
- पुस्तक आणि वाचन / **प्रभाकर लोहोकरे** / ७५
- शेवटी इच्छा (कथा) / **शशिकला वाळके** / ७६
- निळा रियाज / **दीपाली दातार-पत्की** / ८१
- अबोलीचे दिवस / **मुकुंद अनगळ** / ८२
- बंध-अनुबंध / **ज्योत्स्ना चांदगुडे** / ८६
- माणसांचेच बारसे (कथा) / **सुरेश पोरे** / ९०
- मराठी कवितेचे विद्यापीठ - नारायण सुर्वे / **सदानंद करंदीकर** / ९३

- ताठी उघडा ज्ञानेश्वरा / **सुरेश कोकीळ** / ९४
- संस्काराचे फळ (बालकथा) / **उज्ज्वल कुळकर्णी** / ९७
- संगत असावी अशी (बालकथा) / **अरुण देशपांडे** / ९८
- बोचणारं सुख (बालकथा) / **सुभाषचंद्र वैष्णव** / १००
- शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे / **प्रा. सु. ह. जोशी** / १०२
- कुटुंब रंगलय कला-साहित्यात / **डॉ. मनिषा पोतदार** / १०४
- हा भारत आहे, भारत! (कथा) / **नागेश शेवाळकर** / ११०
- अशी आहे अमेरिका / **अरविंद देशपांडे** / ११४
- व्हिजिट टू ऑस्ट्रेलिया / **सौ. सरिता कमळापूरकर** / ११६
- सूड (कथा) / **सौ. ममता सरदेसाई-साळुंखे** / ११८
- संपादकांच्या फुलक्या / **डॉ. श्रीराम दिवटे** / १२४
- फेस्कॉम / **अरुण रोडे** / १२६
- खचलेल्या मनाला दिली विपश्यनेने उभारी / **दत्ता कोहिनकर पाटील** / १२८
- वंचितांसाठीची दिवाळी / **रवीन्द्र माळवदकर** / १३०
- भटक्या विमुक्तांना भीक नको, हक्क हवा / **व्यंकटराव अवधूत** / १३२
- क्षण हा सुखाचा / **सौ. सुषमा देशपांडे** / १३४
- माझिया मना (कथा) / **रवीन्द्र जोगळेकर** / १४०
- जय-विजय (कथा) / **सौ. चंद्रलेखा बेलसरे** / १४६
- 'जीबीएस'च्या विळख्यात / **सिद्धाराम भै. पाटील** / १५१
- मराठी मधुशाला / **वसंत गोखले** / १५९


## काव्यपुष्प

• **माधव गिर,** पुणे • **श. मा. पाटील,** धाराशिव • **खलीद सैय्यद,** जळगाव • **बाळासाहेब कारले,** पुणे • **डॉ. श्रीकांत नरुले,** कोल्हापूर • **डी. के. शेख,** धाराशिव • **एकनाथ भंडारे,** पुणे • **अपर्णा आंबेडकर,** पुणे • **राजा फोपे,** पुणे • **मारुती कटकधोंड,** सोलापूर • **प्रकाश दुल्हेवाले,** नागपूर • **निरंजन माधव,** चंद्रपूर • **इरप्पा निंबाळ,** पुणे • **दर्शनकुमार नेरकर,** पुणे • **जयश्री घुले,** पुणे • **दत्ता हलसगीकर,** सोलापूर • **राज राठोड,** संभाजीनगर • **शेषराव करदोरे,** धाराशिव • **विनोद पंचभाई,** पुणे • **प्रल्हाद दुधाळ,** पुणे • **श्रीकांत म्हेत्रे,** शिरूर • **सौ. चंद्रलेखा बेलसरे,** पुणे • **बाळकृष्ण बाचल,** पुणे • **इरफान शेख,** चंद्रपूर • **ऋचा घाणेकर,** पुणे • **शरद पाटील,** सोलापूर • **शरद अत्रे,** पुणे • **माधव पवार,** सोलापूर • **सौ. आकांक्षा वाघ,** धुळे.

## अंकातील व्यंगचित्रे

**प्रा. बापू घावरे** (पुणे), **नारायण शेळके** (पुणे), **अरविंद गाडेकर** (संगमनेर), **प्रकाश घादगिने** (लातूर)



**-सुधीर गाडगीळ**
नेहरु स्टेडियमजवळ, दादावाडी,
स्वारगेट, पुणे ९
भ्रमणध्वनी : ९४२२०४६७४४

# इथं न काही उणं, असं आमुचं पुणं

मुंबईतल्या लोकलच्या गच्च गर्दीत, घामेजलेल्या वातावरणात, गाडीतल्या कलकलाटाच्या वरच्या पट्टीत जर कोणी तावातावानं, आपला मुद्दा ठासून पटवून देत असेल; तर हमखास समजावं, की तो 'पुणेरी' आहे.' पुण्याचा माणूस ओळखण्याची ही सोपी खूण सांगितली आहे पु. ल. देशपांडेंनी!

स्वत:च्या ज्ञानाचा ठाम आत्मविश्‍वास, मनात गोंधळ नसल्यानं, मांडणीतली तर्कशुद्धता आणि काटकसरीनं वागून, कुणाचं देणं नसल्यानं आलेला निर्भिडपणा, ही पुणेरी वैशिष्ट्ये पारंपरिक वाड्यांनी आणि पुलापलीकडच्या जिमखान्यावरल्या बंगल्यांनी जोपासली होती.

आधी १९६१च्या पानशेतच्या पुरानं शनिवार-नारायण जमिनदोस्त झाली. पाठोपाठ, पंचवीस वर्षांनी १९८५ च्या आसपास आलेल्या बिल्डर जमातीनं पस्तीस सालातले बंगले आणि पेशवेकालीन वाडे भुईसपाट केले आणि विस्तारलेल्या पुण्याचं 'विश्‍व'च बदललं. आणखी पंधरा वर्षानं एकवीसाव्या शतकाच्या आरंभापासून 'एक्स्प्रेस वे' ने आर्थिक राजधानी मुंबई, तीन तासानं जवळ आली आणि श्रीमंत बहुभाषीकांनी वाढत्या कॉलन्यांमध्ये फ्लॅटसची इन्व्हेस्टमेंट करून पुण्याचं रुपच पालटून टाकलं.

शिवरात्रीला नदीतून चालत जाऊन, पलीकडच्या पाताळेश्‍वराचं दर्शन घेऊन परतताना, तुळशीबागेपासल्या चरकावरचा ऊसाचा रस पिणं ही वार्षिक अप्रूपाची बाब होती. गाड्यावरच्या पोत्याखाली लपलेला भुशातला बर्फ फक्त सणावाराला घरातल्या श्रीखंडाच्या पातेल्याभोवती दिसायचा आणि कडक उन्हाच्या दुपारी, घंटा वाजवत येणाऱ्या बर्फवाल्याचे लाल, पिवळे रंग ओतलेले गोळे खाण्यासाठी चड्डीतल्या पोरांची झुंबड उडायची. पण रस्तोरस्ती अलीकडे उघडलेल्या ज्युस सेंटर्सनी अननसापासून कलींगडापर्यंत सर्व तऱ्हेचे 'रस' ग्लासातून ओतत, तसेच प्रात:काळच्या पार्कातल्या 'पाचकपेयांनी', बर्फाच्या खाताना हातावर फुटणाऱ्या गोळ्यांची नि गवताची काडी डोकावणाऱ्या बिनबर्फाच्या, आलं लावलेल्या ऊसाच्या रसाची 'चव'च घालवून टाकली.

वाड्यांबरोबर कुरड्या-पापड्या-पापडांची वाळवणंही गेली आणि 'चीक' व 'लाटी' हे शब्द कोशात शोधायची वेळ आली. दिवाळीच्या पहील्या पहाटे 'फटाका' पहीला कुणी फोडायचा आणि कुणाच्या किल्ल्यावर 'आळीव' जास्त उगवलाय, हे पाहण्याची चुरस जावून, थिएटरातल्या पाडवापहाट कार्यक्रमांना धावण्याची स्पर्धा वाढली.

मोरपीसांची टोपी घातलेला 'देव पावला' म्हणणारा, चिपळी वाजवत येणारा वासुदेव, कपाळी आडव भस्म लावलेले उघडे मद्रासी ब्राह्मण, रविवारच्या सकाळी 'ॐ भवती भिक्षांदेही' म्हणणारे माधुकरे, 'वाटाऽऽणा... हरभरा.... मूऽऽग, मटकी मोऽऽडाची' गाडी ढकलत येणारा कडधान्यवाला, हे प्रात:काळच्या वर्दळीचे आद्य मानकरी जाऊन, त्यांची जागा कॅप घालून, माईक हातात घेऊन, उघड्या मॉडर्न गाडीवरुन पेप्सी, कोला, आयडीया विकत फिरणाऱ्या पोरांनी घेतली.

वाड्यातल्या किंवा बंगल्यातल्या बागेतलं फूल अंबाड्यात खोवून, हाती स्वत:ची चतकोर सतरंजी घेऊन, प्रवचनाची वेळ गाठण्यासाठी घाईत असलेल्या आजी जावून, सार्वजनिक बागेत 'फिटनेस'साठी धापा टाकणाऱ्या किंवा स्वच्छ निरोगी मनाच्या शोधात सामुदायिक खिदळणाऱ्या 'आज्या' वाढल्या. आख्या कुटुंबाचा 'चॉईस' ठरवणारा 'शिंपी', आणि घरातल्या सर्व वयोगटातल्यांची 'नाडी' नेमकी माहीत असलेला फॅमिली डॉक्टर जाऊन, स्पेशलाईज्ड टेलर नि टेस्टा वाढल्या आणि नगरसेवकांना बारीकसारीक रोगांवरची 'शिबीर' घेण्याचा नवा उद्योग मिळाला.

पक्षांमध्ये मतभिन्नता असूनही, नगरीच्या कल्याणासाठी महोत्सव न भरवताही 'एकवाक्यता' होती. वर्षानुवर्षे सतरंज्याच घालणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांच्या मताला नेते किंमत देत होते. हुजऱ्यांची फौज किती मोठी यावर नेतृत्वही ठरत नव्हतं आणि 'पोस्ट' मिळाली नाही म्हणून पक्षांमध्ये घसरणही नव्हती. एखाद्या कर्तृत्ववान नेत्याच्या छटी सहामासी होणाऱ्या पंचाहत्तरी सोहोळ्यात, विचारांची जुगलबंदी ऐकायला मिळे. तारखा लक्षात ठेवायला कॉम्प्युटर घ्यावा लागेल इतकी वाढदिवसांच्या अनाधिकृत बोर्डांची गर्दी वाढलेली नव्हती.

म्हणता म्हणता, सगळ्याच गोष्टींची गर्दी वाढली. भाषा वाढल्या, पूल वाढले, बिल्डिंगा - अपार्टमेंटस् वाढली, पन्नास प्रकारच्या हॉटेल्सची संख्या वाढली. दर दिवसाच्या वेगळ्या पोशाखांच्या 'शोरुम्स'ही वाढल्या. आपली आपल्या क्षेत्रातील 'ड्यूटी' प्रामाणिकपणे करणं ही किमान पात्रता होती ती 'विशेष गुणवत्ता' ठरून 'पुरस्कार' वाढले. महोत्सव गजबजले. जातीनिहाय बुवा-महाराज वाढले. सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल झाली पण स्वत्व हरवलं.

प्रत्येक गोष्ट 'इव्हेंट' झाली. नुसता झगमगाट वाढला. त्यात अंगणातल्या सार्वजनिक 'होळी'च्या रंगाचं, गणपती विहीरीवर विसर्जित करताना एक दिलानं म्हटलेल्या 'मोरया'च्या वा आरतीच्या नादाचं, वरात वा प्रेतयात्रा जाताना बोळांमध्ये पडणाऱ्या प्रकाशाचं, आग्रहानं वाढलेल्या पंक्तीतल्या चवीचं, व्याख्यानमालांमधल्या तर्कशुद्ध वक्तृत्वातील 'विषयाच्या गाभ्याचं' निखळपणचं 'लापता' झालं आणि समारंभात ज्याला त्याला बळेबळे 'पगडी' घालण्यापुरत 'शोभेचं' पुणेरीपण उरलं.

*With Best Compliments*

# UNISON ARCHITECTS

**Architect ■ Interior Designer**



**Prop. B. K. BOBADE**

**(b.arch) Mob. 9822515792**

Office : 10, Kakade Terrace, Ganpati Matha, Malwadi, Pune - 411052.
Ph. 020-25292233 Mob. 9921303006. Email : bobade8000@yahoo.co.in



# लोकमंगल फाऊंडेशन पुणे

रजि. नं. महा ८६३/एफ-२४९२४/२००९/पुणे
वीर भारत माता तरुण मंडळ, स्वीपरचाळ, ताडीवाला रोड, पुणे - ४११००१
भ्रमणध्वनी : ८८०५४६७७४३/९८५०३४७२४१

**संचलित : गोविंद बाल संस्कार केंद्र ❄ महिला सबलीकरण केंद्र**



**शुभाशिर्वाद :**
**प.पु. स्वामी गोविंददेव गिरीजी**
(आचार्य किशोरजी व्यास)

संचालक



**श्री. मन्मथ बेलूरे**

संचालिका



**सौ. चित्रा बेलूरे**

**मार्गदर्शक :**
**मा.मिलिंदभाऊ कांबळे** (सदस्य शिक्षण मंडळ, पुणे म. न. पा.)
**मा. मोहन दुधाने** (स्थानिय लोकाधिकार समिती, पुणे)
**मा. श्रीराम चौथरी** (गुरु टेलर, ताडीवाला रोड, पुणे)
**मा. धनंजय सोलंकर** (ज्येष्ठ कवी, पोलीस निरीक्षक, पुणे)

**तळागाळातील महिला व बाळगोपाळांसाठी गोविंद बाल संस्कार केंद्राच्या माध्यमातून सर्वांगिण विकास कार्ये**

# काव्यपुष्प

## ही भूमी पिकाऊ

ही गावं गोकुळ
इथं गाई गुरांचं
गोठ्यांशी नातं.
ही माती कसदार
इथं धरलेलं
धान्य निघतं
ही भूमी पिकाऊ
इथं कष्टाळू
माणसाचं पीक
जोमानं पिकतं.

**-माधव गुंडू गिर**
कृष्णानगर, दिघी, पुणे १५,
भ्रमणध्वनी : ९९७०९४२२६४

## मी मरणाआधी मेलो

मी मरणाआधी मेलो
देऊन तुम्हाला घास
मज दुःख काय देणार
हा फांदीवरचा फास?
मोजून हाडके घेती
पेढीचे पोशिंदे हे.
मोजतील रक्षा सुद्धा
जगण्याचे पेचिंदे हे.
मी बीज घेतले होते,
ही पीक न्यावया येती.
अंधार पाहूनी दारी
धुत्कार गावया येती
जे कर्ज घेतले होते
मातीत पेरले या, ते
फेडीन ढगातून मी ही;
न्या कधी उगवले जर ते.
एवढेच हात जोडून,
विनवितो तुम्हाला, बाप
कधी जीव न घ्यावा त्यांचा
देऊन मुलांना ताप

**-श. मा. पाटील**
साईनगर, धाराशिव
भ्रमणध्वनी : ९४२२८१३३०१

सहल आपल्याला
हवी तशीच...म्हणजे काय ?
तर खूप महाग नाही...
तर चांगलीच हॉटेल्स् हवीत...
तसेच प्रवास बसने नाहीच...
तर कारने सेफ आणि कंफरटेबल...
या जोडीला बेस्ट एअरफेअर आणि
सुंदर प्लॅनिंग सुध्दा !




**Goa Special Tour**
Pune to Pune all inclusive , Pune Goa Pune A/C Bus
2 Day's Goa sight seeing, A/C Deluxe Hotels with swimming pool
Boat Cruize, DJ party, All meals

**केरळ**
त्रिवेंद्रम : केरळची राजधानी, पदम्नाभ मंदिर
कन्याकुमारी : स्वामी विवेकानंद आश्रम, सुर्योदय - सुर्यास्त
मुन्नार : नयनरम्य मनोहरी दक्षिणेचे काश्मीरच !
टेक्कडी : पेरियार लेक
अल्लेपी : व्हेनिस ऑफ एशिया
कोचीन : सुंदर हार्बर सिटी, चर्चेस, शॉपिंग


**राजस्थान**
जोधपुर : सिटी ऑफ फोर्टस्
जैसलमेर : सुप्रसिध्द सॅमचे वाळवंट राजस्थानी नृत्य,
टेंट मध्ये मुक्काम धम्माल अमर्यादित !!
जयपुर : जगप्रसिध्द शिल्पकलेचे सुंदर नमुने,
आमेर फोर्ट, सिटी पॅलेस व बरेच काही...
उदयपुर : बेस्ट सिटी ऑफ राजस्थान
माउंट आबु : दुरचा शेवट हिल स्टेशनने हवाच...



TOUR OPERATORS
**B. G. TOURS**


Rajan Media Station

बाळाजी-प्रासाद, ४७१, शनिवार पेठ, पहिला मजला,
दक्षिणमुखी मारुतीजवळ, पुणे - ४११ ०३०.
( अप्पा बळवंत चौक, प्रभात सिनेमाजवळ )
फोन : ०२०-२४४३३३४२ / ९४२२३ १५३५८
E-mail : bgtourspune@gmail.com
www.bgtourandtravels.com


सूर्योदय असतो म्हणून, सूर्यास्ताला किंमत आहे,
सुखाबरोबर दु:ख आहे म्हणून, जगण्यात गंमत आहे।


महाविद्यालये, सांस्कृतिक संस्था, महिला मंडळे, क्लब, हाऊसिंग सोसायट्या, कॉलनीज् तसेच सांस्कृतिक उत्सवांसाठी कवितांचा एकपात्री कार्यक्रम !

# क्षण हळवे ऋतु हिरवे




सादरकर्ते
सुप्रसिध्द कवी, गीतकार
जयंत भिडे

संपर्क:
मो. ९८५०८२९७४८

गीत, गजल, कविता, मुक्तछंद, वात्रटिका इत्यादी काव्यप्रकारात गुंफलेला माणसाच्या आयुष्यातील भावनांचे इंद्रधनुष्य उलगडणारा एकपात्री प्रयोग!

राजकारणा इतका चांगला, हल्ली दुसरा धंदा नाही,
एकदा जम बसला, की, सात पिढ्या वांधा नाही!

प्रचलित राजकारणाचे रंग उलगडणारा, सामान्य माणसाला बोलते करणारा
सिंहासन पुणे निर्मित कवितांचा कार्यक्रम



# स्वयंवर झाले सत्तेचे

वेधक काव्यपंक्ती, राजकीय उपहास, विनोद, विडंबन, इ.काव्यप्रकारांची
सुंदर गुंफण केलेला शैलीदार निवेदनासह सादर होणारा बहरदार कार्यक्रम !

संपर्क : जयंत भिडे
२१५, गायत्री सोसायटी, बँक ऑफ महाराष्ट्र जवळ, पर्वती गाव, पुणे ४११००९.

फोन: ०२०-२४४४११७ मो.: ९८५०८२९७४८



- प्राचार्य श्याम भुर्के
गंगातारा, ९१७/७, गणेशवाडी
जिमखाना, पुणे ४१ ००४
भ्रमणध्वनी : ९४२२०३३५००

# एम.बी.ए. शिवाय एम.बी.ए.!

साताऱ्यात शिवाजी महाविद्यालयात शिकत होतो. त्याचवेळी विद्यार्थी परिषदेचे कामही करीत होतो. या काळात अभ्यासाव्यतिरिक्त सतत काहींना काही प्रकल्पात कार्यरत होतो. सन १९६६ च्या दरम्यान, एम. बी. ए. व्हायच तर अहमदाबादला आय. आय. एम.ला किंवा मुंबईला जायला लागायच. मी काही तिकडे गेलो नाही. पण सतत एक एक कार्यक्रम यशस्वी केल्यामुळे अंगी व्यवस्थापन कौशल्ये रूजली. तीन वर्षाच्या काळात दर महिन्याला काही ना काही कार्यक्रम केले. त्यातले नमुना म्हणून दोन प्रकल्प पाहूया!

## भूकंपात एकांकीका स्पर्धा

पुण्यामध्ये विविध संस्थातर्फे एकांकिका स्पर्धा होत. त्याचे वृत्त पेपरमध्ये वाचायला मिळे. अशी स्पर्धा साताऱ्यात का होऊ नये? 'आपणच भरवू या' असा विचार आम्हा मित्रांच्या डोक्यात आला. लागलो कामाला. शाहू कला मंदिराचे दोन दिवसासाठी आरक्षण केले. सातारा जिल्हा महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा जाहीर केल्या.

नटवर्य बाळ कोल्हटकर व चित्तरंजन कोल्हटकर हे मूळचे सातारचेच. त्यांच्या भेटी घेतल्या व या स्पर्धेला नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर करंडक ठेवला. उद्घाटन समारंभ व पारितोषिक वितरण समारंभात लावण्यासाठी निळूभाऊ फुले यांनी मोठ्या पडद्यावर नटराजाचे सुरेख चित्र साकारले. सर्व कॉलेजमध्ये प्रचार करूनही एकांकिकेच्या एंट्रीज मिळेनात. पण आम्ही वेगवेगळ्या कॉलेजमधल्या आमच्याच मित्रांना एकांकिका बसवायला लावल्या. वाईवरून एक गट आल्यामुळे त्याला जिल्हा स्वरूप प्राप्त झाले. तीन एकांकिकांची प्रॅक्टीस तर माझ्याच घरी होत होती. दोन दिवसासाठी तिकीट दर खुर्ची रू. दोन व भारतीय बैठक रू. एक असा ठेवला. तिकीट विक्रीसाठी पुस्तके बऱ्याच कार्यकर्त्यांकडे वाटली. पण उत्साहवर्धक प्रतिसाद नव्हता. एकंदरीत काय, एंट्रीज मिळायला त्रास अन् श्रोते मिळायची वानवा, अशी कठीण परिस्थिती होती. छपाई, थिएटर भाडे, रंगभूषा, परीक्षक, प्रवास खर्च, बक्षीसे असा किमान तीनशे रूपये खर्च अंगावर पडायची भीती होती. पण आता माघार घ्यायची नाही या निर्धाराने आम्ही स्पर्धेची पोस्टर्स छापली. घरी खळ शिजवून तयार केली. रात्री अकरा वाजता ती लावत सुटलो. मोती चौकात मोक्याच्या ठिकाणी पोस्टर लावण्यासाठी बाबू खाकरे एका दुकानावर चढला. मी खळ लावून पोस्टर त्याच्या हातात दिले. ते तो एका पत्र्यावर लावत असताना पत्रा जोरात थरथरू लागला. पत्र्याचे आवाज यायला लागले. बाबूने खाली उडी मारली. मलाही काय झाले हे कळेना. आजूबाजूच्या घरातूनही लोक आवाज ऐकून बाहेर येऊ लागले. तो कोयनेचा भूकंप होता.

आता आम्ही कसली पोस्टर्स लावतोय! 'लोक मरायला लागलेत आणि यांना नाटकं सूचताहेत,' अशी टीका झाली असती. सकाळी गावात टांगे भरभरून पाहुणे येत होते. ते सारे कोयनानगरहून येणारे होते. आम्ही एकांकीका स्पर्धेचा प्रचार थांबविला. पण त्या रद्द केल्या नाहीत. दुसरे दिवशीपासून विविध संस्था भूकंपग्रस्तांसाठी कपडे, भांडी, धान्य, निधी गोळा करू लागल्या. आम्हीही जाहीर केले. 'भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी एकांकिका स्पर्धा!' स्पर्धेच्या दिवसापर्यंत तीनशे रुपयांची विक्री झाली होती. भूकंपाच्या भीतीमुळे लोक घरात झोपत नव्हते. मोकळ्यावर, रस्त्यावर झोपायचे. रात्री उशीरापर्यंत जागे असायचे. शाहू कला मंदिर हे नाट्यगृह ओपन एअर थिएटर होते. रस्त्यावर जागे राहण्यापेक्षा एकांकिका पाहूया या विचाराने ऐन वेळी तिकिटासाठी गर्दी झाली. बंदीस्त असणारी सिनेमागृहे बंद होती. उदय पिडगावकर आणि सहकारी तिकीट विक्रीचा वेग पाहून खूष झाले. एकूण चारशे रूपयांच्या विक्रीचा अंदाज होता. तर प्रत्यक्षात विक्री झाली तेराशे रूपयांची. स्पर्धा जोरदार झाली. जिल्हा

न्यायाधीश आठल्ये यांच्या शुभहस्ते पारितोषिके वाटली आणि भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी पाचशे एक रूपयांची मदत जाहीर केली.

एलआयसीने भूकंपग्रस्तांना मदत म्हणून एक ट्रॅक्टर सामान दिले होते. प्रत्यक्ष वाटपासाठी खरेच तरूण हवे होते. अच्युतराव कोल्हटकरांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही ते सामान घेऊन दुर्गम भागात गेलो. पहाटे पाचला निघालेलो ते दुसऱ्या दिवशी पहाटे पाचला परत आलो. ढेबेवाडी भागात एक फूट रूंदीची व दोन किलोमीटर लांबीची डोंगराला भेग पडली होती. मातीची घरे ढासळली होती. लोकांना आम्ही भाकऱ्या, केळी, भांडी, कपडे इ.चे वाटप केले. दिवसभरात किती पायपीट केली याची गणतीच नाही. पण हे काम करायला मिळाले याचे मानसिक समाधान फार मोठे होते.

### अजिंक्यताऱ्यावर 'जयहिंद' अक्षरे

साताऱ्यात घरी एक दिवस आजी म्हणाली, ''पंधरा ऑगस्ट एकोणीसशे सत्तेचाळीस रोजी भारताला स्वातंत्र्य मिळालं. त्या रात्री तरूण मशाली घेऊन या अजिंक्यताऱ्यावर गेले होते. त्यांनी मशालीनी 'जयहिंद' ही अक्षरे काढली. सातारा गावातून साऱ्या नागरिकांना ती 'जयहिंद' अक्षरे दिसली.''

मी लगेच म्हणालो, ''आता त्या आठवणीला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. मी तसच करून दाखवितो.''

लगेच तयारीला लागलो. विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांना योजना समजावून सांगितली. सारेजण कामाला लागलो. प्रतिभा फोटो स्टुडिओमध्ये जाऊन दत्ता भिडेला योजना सांगितली. तो म्हणाला, ''हे फार अवघड काम आहे.''

''अवघड आहे हे मान्य. पण अशक्य नाही. शिवाय पंचवीस वर्षापूर्वी आपल्याच गावातील तरूणांनी हे करून दाखवलय. तू मला कागदावर नकाशा काढून दाखव,'' मी त्याला विनंती केली.

त्याने एक कागद घेऊन त्यावर 'जयहिंद' अक्षरे काढली. किल्ल्यावर केवढ्या आकाराचे अक्षर हवे म्हणजे ते शहरातून दिसेल याचा अंदाज घेतला. मग त्या अक्षराचे आणि डोंगरावरील अक्षराचे प्रमाण निश्चित केले. कागदावरील एका सेंटीमीटरला एक कार्यकर्ता हवा होता. एकूण एकशे सत्तर मुलांची गरज होती. मी ज, य, हिं, द या चार अक्षरांचे चार गटप्रमुख केले. त्याला आवश्यक ती मुले त्यांनी गोळा केली. आता पाहिजे होत्या मशाली. साताऱ्याजवळच्या महारदऱ्याच्या तळ्याच्या वरच्या बाजूला डोंगरात एरंडाची झाडे होती. त्यातील फांद्या तोडून आणल्या. गावात गटागटाने फिरून सर्व शिंप्यांच्या दुकानातून गेलो. त्यांना कामाचे स्वरूप सांगितले. भरपूर चिंध्या गोळा केल्या. हार्डवेअरच्या दुकानदाराकडून मोफत लोखंडी तार मिळविली. तेल व्यापाऱ्यांकडून क्रूड ऑईल मिळविले. ते एकत्र करून एका पिंपात ठेवले. एवढे सारे सामान ठेवायचे कुठे हा प्रश्न होता. त्यासाठी सातारा नगरपालिकेचा हॉल मिळविला. हनुमानाच्या वानरसेनेप्रमाणे आम्ही वेगाने काम उरकीत होतो. मशाली तयार झाल्या. मशाली येथून पेटवून नेल्या तर डोंगरावर पोहोचेपर्यंत विझतील. तेलात भिजविलेल्या पण न पेटवता नेल्या तरी डोंगरावर जाईपर्यंत तेल गळून जाईल. एकाने सल्ला दिला.

''त्यावर उपाय म्हणून आपण तेलाचा बॅरल डोंगरावर नेऊ व तिथे मशाली तेलात भिजवू.'' मी मार्ग सांगितला.

''पण बॅरल डोंगरावर कसा न्यायचा?'' एक व्यावहारिक शंका.

''आपण ट्रकने बॅरल, मशाली, कार्यकर्ते साऱ्यांना किल्ल्याच्या अर्ध्या भागापर्यंत नेऊ या.'' मी सांगितलेला हा मार्ग साऱ्यांनाच पटला. एक ट्रक मोफत मिळविला. त्याचा सत्कार जाहीररित्या करू असे त्याला पटवून दिले.

किल्ल्यावरील उतारावर ही अक्षर उमटवावयाची होती. जिल्हाधिकारी, नगराध्यक्ष हे गांधी मैदानावरील व्यासपीठावरून ते सारे पाहणार होते. तिथून ते व्यवस्थित दिसेल, तसेच अधिकाधिक शहरवासियांनाही पाहता येईल या दृष्टीने जागा निश्चित केली. एक दिवस आधी सुमारे दीडशे फुटाचे एक अक्षर असे काथ्यानी डोंगरावर काढले. पांढऱ्या फक्कीन मुलं उभ्या रहायच्या खुणा केल्या. एकशे सत्तर मुलांच्या तितक्याच खुणा काढल्या. ट्रक योग्य जागेपर्यंत नीट जाईल ना हे पाहण्यासाठी तिथपर्यंतचा रस्ता पाहून आलो. त्या रस्त्याची थोडीफार डागडुजी केली. तेलवाले, चिंध्यावाले, तारवाले सर्व प्रायोजकांना 'अक्षरं पहा' सांगून आलो. आदल्या रात्री जोरदार पाऊस झाला. डोंगरवाट अवघड झाली. फक्कीने मारलेल्या खुणा गेल्या असणार अशी काळजी वाटू लागली. पण प्रत्यक्ष पंधरा ऑगस्ट या दिवशी पावसाची उघडीप होती. पुन्हा रस्ता थोडाफार ठाकठीक केला. फिक्कीने मारलेल्या खूणा अस्पष्ट जरी झाल्या होत्या तरी पूर्ण पुसल्या गेल्या नव्हत्या. संध्याकाळी घोषणांच्या आवाजाने ट्रकने चार भिंतीच्या मागून प्रयाण केले. जे ट्रकमध्ये मावू शकत नव्हते ते चालत तिथे पोहोचले. ट्रकमध्ये काहीजणांनी बॅरल धरून ठेवला होता. बॅरलमधील तेलात मशाली बुडवल्या होत्या. सर्वजण आपआपली मशाल घेऊन जागेवर बसले. आता अंधार पडला होता. चारही गटप्रमुखांकडे बॅटऱ्या होत्या. पुन्हा घोषणा झाल्या.

'भारत माता की जय'

'जयहिंद'


'भारतीय स्वातंत्र्य चिरायू होवो'

मुख्य नेत्याने शिट्टी मारून सुरूवात करण्यास सांगितले. तोल जाऊन कोणी पडू नये म्हणून प्रत्येकजण जागेवर बसला होता. चारही गटप्रमुखांनी आपली मशाल पेटविली. एक दुसऱ्याच्या मशाली प्रज्वलीत करीत चारही अक्षर वरून खालीपर्यंत पेटत आली. वरील टींबाच्या कार्यकर्त्यांनी स्वतंत्रपणे मशाल पेटविली. 'जयहिंद' अक्षरं उमटली.

गांधी मैदानावरून जिल्हाधिकाऱ्यांनी ते विलोभनीय दृश्य पाहिले. शहरातून हजारो नागरिकांनी आनंदाने वाहवा दिली. आजीने घराच्या दारातून पंचवीस वर्षानंतर पुन्हा तेच दृश्य पाहिले. जिल्हाधिकाऱ्यांनी दुसरे दिवशी आम्हा सर्वांना बासुंदीचे जेवण दिले.

वर नमुना म्हणून सांगितलेले दोन कार्यक्रम म्हणजे आमच्या तीन वर्षाच्या कार्यक्रमाच्या झंझावाताचा नुसता ट्रेलर आहे. ते दिवस म्हणजे समाजकार्याच्या भावनेने झपाटलेले होते. काम पूर्ण करताना येणाऱ्या अडचणींना दूर कसे करायचे, माणसं कशी जोडायची, लोकांपुढे कसं बोलायच याच ट्रेनिंग त्यातून मिळाल. पुढे बँकेत उपमहाव्यवस्थापक पदापर्यंत कामे केली. बँकेच्या व्यवसायाच्या अपेक्षा पूर्ण केल्या. एम बी ए न होताच एम बी ए च प्रभावी शिक्षण आमच्या युवा वयातील कार्यक्रमातून प्राप्त झाले होते. पुढे एम बी एला शिकविण्याच कामही केलं. नोकरीत हाताखाली एमबीए आले. एमबीए पदवीपेक्षा व्यवस्थापन कौशल्य जमले म्हणजे यश आपल्या मागून धावत येते.









# काव्यपुष्प

## 'पाखरांची शाळा'

रानावनात भरली
पाखरांची शाळा
शाळेमध्ये शिकायला
झालेत पक्षी गोळा
मोर, पोपट, कावळा
सुतार, शिंपी आले
टिटवी, साळुंखी, चिमणी
सगळे गोळा झाले
मोर म्हणाला मी आहे
पक्ष्यांचा राजा
माझे तुम्ही ऐकायचे
नाहीतर देईन सजा
पोपटा पोपटा तूच गड्या
शोभतोस खरा टिचर
तूच पाखरांना शिकवायचे
धडे, पाढे भरभर
कावळ्या कावळ्या तुझी
काव काव नको
टिटवीबाई तुझी
टॅवटॅव नको
कविताही शिकव
शिकव एबीसीडी
कुणी चुकला तरी
मारायची नाही छडी

-खालिद सैय्यद
११, नशेमन कॉलनी, संतोषीमाता मंदिर
एरिया, मेहरुण, जळगाव
भ्रमणध्वनी : ९४२३९०४४६५

## 'मला घेऊन जाणार कवा?


चैताची रात, चांदणं त्यात
गुलाबी सुटली हवं
शिणगार केला नवा
हो राया मला घेऊन जाणार कवा?
लाज पदराआड माईना
माझी पापणी वर होईना
लाल तोंडलं ओठी खुललं
खुडून घ्याल हो कवा?
अंग गोरं, केला मी थाट
तंग चोळीची बसना गाठ
किती सावरू पदर ज्वानीचा
त्याला कळायचं कवा?
तुमच्या नजरेची घुसते सुरी
होते हौसच माझी पुरी
जवळ यावं, मिठीत घ्यावं,
खेळुया डाव नवा!

- डॉ. श्रीकांत नरुले
१२६२, खरी कॉर्नर, कोल्हापूर १६
भ्रमणध्वनी : ९८५०९६९००६


# indiana sucro-tech (pune) pvt. ltd.

**Pioneering Sprit in Continuous Pan Boiling Technology**

Continuous Vacuum Pan
for 'A', B\'C Massecuite
Application with
Complete Automation




● EQIPMENTS ● PROCESS AUTOMATION ● PROJECT COORDINATORS

## WE OFFER



- Continuous vacuum pan for 'A', 'B', 'C massecuite with complete automation Total installations - 76 Nos.
- Two - in - One continuous vacuum pan - simultaneous discharge of 'B' & 'C massecuite from one continuous pan. Energy efficient boiling house, balanced for 36% steam on cane. Successfully Commissioned iored During june 2009. **AT 'VISHWANATH SUGAR LTD.'** Karnataka.
- Refined sugar plant (Jointly with Digital Utility & Simbhaoli Technology Services) **AT 'VITHALRAO SHINDE S. S. K.** Maharashtra.
- All conventional boiling house equipments.

For More Details contact: **indiana sucro tech (pune) pvt. ltd.**
Madhav Chambers-1, Flat No. 8 Above Dena Bank, Sr. No. 974, Senapati Bapat Road, Pune 411 016.
Tel.: 020 : 25660872 FAX : 020 25662593, E-mail: istppl@bsnl.in / istppl1@gmail.com



- प्रा. मिलिंद जोशी
बी १/१२, रविराज टेरेस
सुखसागरनगर, कात्रज, पुणे - ४६.
९८५०२७०८२३

# समाज, संस्कृती आणि शासन

एक मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र आता सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. या निमित्ताने नवे सांस्कृतिक धोरण निश्चित करणार असल्याचे राज्याचे सांस्कृतिकमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी नुकतेच जाहीर केले. ही चांगली बाब आहे. कोणत्याही देशाची श्रीमंती त्या देशातील धनसंपत्तीइतकीच सांस्कृतिक समृद्धीवरही अवलंबून असते. ती टिकविण्याचे काम समाजाबरोबरच शासनाने करणे अपेक्षित असते.

ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी 'यक्ष प्रश्न' या ग्रंथात 'सुधारणा आणि संस्कृती' या लेखात जे विवेचन केले आहे ते महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, ''माणूस आणि संस्कृती याचे नाते परस्परावलंबनाचे आहे. माणूस हा संस्कृतीचा निर्माता आहे आणि संस्कृतीचे अपत्यही आहे. संस्कृतीचा हात त्याला घडवीत असतो आणि आपल्या हाताने तो संस्कृती घडवीत असतो. पाण्यातून ढग निर्माण व्हावेत आणि ढगापासून पाणी निर्माण व्हावे असा हा अन्योन्याश्रय आहे. संस्कृतीच्या निर्मितीत माणसाचा मोठा वाटा आहे. भूमी नियतीने निर्माण केली पण शेती माणसाने केली. कंठ निसर्गाने दिला पण संगीत माणसाने तयार केले. पाषाण खाणीतून आला पण लेणी अणि मूर्ती माणसाने कोरल्या. संस्कृती ही सजीवाच्या प्रयत्नातून प्रकट होणारी आतंरिक स्फूर्ती आहे. सुधारणेचा प्रकाश ऐहिक सुखवर्धनाच्या दिशेने वाहतो. संस्कृतीचा प्रकाश आत्मोन्नतीची वाट दाखवितो. सुधारणेमुळे निसर्ग प्रभुत्वाची दारे उघडतात. संस्कृतीमुळे आत्मबोधाची दालने खुली होतात. सुधारणा आणि संस्कृती यांचा समन्वय हाच मानव कुळाच्या भाग्योदयाचा मार्ग आहे. संस्कृतीशिवाय सुधारणेला अर्थ नाही आणि सुधारणेवाचून संस्कृतीला स्थैर्य नाही. सुधारणेच्या सिंहासनावर विराजमान झालेली उद्याची संस्कृती हे सज्जनांचे एक स्वप्न आहे. सुधारणांचा ओघ थोपविता येणार नाही, थांबविता येणार नाही, सामाजिक परिवर्तनाचा तो एक भाग आहे. गतीचा तो कायदा आहे. पण ज्याप्रमाणे पक्वान्नांचा गुणाकार घडला तरी जीवनसत्वांचा भागाकार घडू नये हा आपला आग्रह आपण सोडत नाही. त्याप्रमाणे सुधारणांचा रथ कितीही वेगाने धावला तरी त्याचे सारथ्य संस्कृतीकडून व्हावे, या भूमिकेचे भान सुटू नये.''

मॅकआयव्हर नावाचा समाजशास्त्रज्ञ म्हणतो, ''आपली संस्कृती आपल्या असण्यात असते. आपली सुधारणा आपल्या दिसण्यात असते. संस्कृती हे साक्षात जीवनदर्शन आहे. सुधारणा हे वैभव दर्शन आहे. संस्कृती हे आपले रूप आहे. सुधारणा हे त्यावरचे वस्त्र आहे.''

संस्कृतीचा संभव कसा घडतो या संदर्भात म्हैसूर विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात डॉ. राधाकृष्णन म्हणाले होते, ''स्वभावातील मार्दव, वृत्तीतील निर्भयता आणि दृष्टीची व्यापकता म्हणजे संस्कृती! आपल्या सर्वस्वानिशी जीवनाला सन्मुख होणाऱ्या प्रज्ञा व त्यांच्या प्रतिभेची स्फुरणे म्हणजे संस्कृतीची उवसिते होत.''

ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो असे मानत असे, ''आत्म्याचे संस्करण हाच संस्कृतीचा कळस आहे. मानवाच्या ठायी असणारे उदात्त आणि उत्कट भाव हेच संस्कृतीचे अधिष्ठान होय.''

या सर्व विचारवंतांच्या चिंतनात आणि संस्कृती संदर्भातल्या विवेचनात साम्य आढळते. संस्कृती कधीच रेडिमेड नसते. व्यक्ती आणि समाज यांच्या सजीव संबंधाचा तो परिपाक असतो. यावर सर्वांचे एकमत झालेले दिसते.

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे असे म्हटले जाते. समाजात घडणाऱ्या या घटनांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. साहित्यिक, कलावंत आणि विचारवंत हे त्या समाजाचे घटक असतात. त्यांच्या धारणा, जाणिवा हा संस्कृतीचा परिपाक असतो. संस्कृतीची जी काही स्थिती, गती असते ती त्यांच्या साहित्यातून, कलाविष्कारातून आणि विचारातून प्रकट होत असते. कला जन्मजात असली तरी तिला फुलविण्याचे काम संस्कृती करीत असते. आज ताकतीचे लेखक, पत्रकार, संगीतकार, गायक, वादक, नर्तक दिसत नाहीत अशी तक्रार केली जाते. मुळात एकूण समाजाच्या गुणवत्तेची प्रत खालावत असताना अमुक एका क्षेत्रात गुणवत्तेची अपेक्षा करणे ही घोर आत्मवंचनाच म्हणावी लागेल. ***एखाद्या गव्हाच्या पोत्यातील गहू खराब झाला असेल तर त्यापासून पोळ्या बनविल्या काय, पुऱ्या बनविल्या काय किंवा बिस्कीटे बनविली काय ती चांगल्या दर्जाची व्हावीत अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. कारण या पदार्थांची निर्मिती ज्यापासून झालेली आहे तो उगमच दूषित आहे.***

संस्कृतीचेही असेच असते. उगमातली शुद्धता आणि समृद्धता नंतर जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रवाहित होत असते. त्या शुद्ध उगमाचे जतन आणि संवर्धन ही राज्यकर्त्यांची जबाबदारी असते.

प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभ्यास करताना असे जाणवते की, काही अपवाद वगळता या देशातील बहुतांश राजे हे कला आणि संस्कृतीचे प्रेमी होते. आपल्या काळात त्यांनी संस्कृती संवर्धनासाठी कलेला राजाश्रय दिलेला होता. हे सत्य एकीकडे असताना दुसरीकडे कलावंतांच्या ठायी आश्रीताची भावना निर्माण झाल्यामुळे कलांचे आणि पर्यायाने संस्कृतीचे नुकसानच झाले. त्यातून भाटगिरीही उदयाला आलेली आहे. पण राजाश्रय नाकारून सत्त्व सांभाळत प्रतिभा साधन करणारी अनेक माणसे होऊन गेलेली आहेत. भवभूती, नरेंद्र पंडित या महाकवींची उदाहरणे बोलकी आहेत. अनेकदा राजानेही आश्रयाला असणाऱ्या कलाकारांकडून भाटगिरीची अपेक्षा बाळगलेली नाही. शासनाची कला, साहित्याकडे पाहण्याची दृष्टी कशी असते, यावरती बऱ्याचशा गोष्टी अवलंबून असतात.

> "भाषा ही केवळ प्रांतिक अस्मिता जोपासण्यासाठी नसते. ती लोकशक्तीचा श्वास झाली पाहिजे. जशी एखाद्या माणसाच्या नाडीवरून त्याच्या स्वास्थ्याची अथवा रोगाची कल्पना येते, त्याप्रमाणे त्या राज्यातल्या भाषेवरून राज्याची बरी वाईट स्थिती लोक जाणतात."
>
> **-लोकमान्य टिळक**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण साहेबांसारखे एक द्रष्टे नेतृत्व महाराष्ट्राला लाभले. त्यांना कला-साहित्याची जाण व आवड होती. साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना, विश्वकोश निर्मितीचा प्रारंभ, विधानपरिषदेवर साहित्यिक कलावंतांची आमदार म्हणून निवड यासारख्या महत्त्वपूर्ण गोष्टींना त्यांनी चालना दिली. चिनी आक्रमणानंतर पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, पु. भा. भावे आणि वसंत कानेटकर यांना बरोबर घेऊन त्यांनी तो आक्रमण झालेला प्रदेश दाखविला होता. काकासाहेब गाडगीळ पंजाबचे राज्यपाल असताना भाक्रा नांगल धरणाची माहिती घेण्यासाठी त्यांनी साहित्यिकांना सवलती उपलब्ध करून दिल्या होत्या. देशातील घडामोडींशी आणि विकास प्रक्रियेशी साहित्यिक, कलावंत, विचारवंत जोडला जावा, त्यांच्या जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात यासाठी पावले उचलली जात होती. नंतर मात्र, शासनात ज्या प्रकारची माणसे येत गेली तस तसा दृष्टीकोन बदलत गेला. ७०-८० च्या दशकात शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या ग्रंथ पुरस्कारासाठी परीक्षकांची जी समिती नियुक्त केली होती तिचे निकष डावलून पुरस्कार दिले गेले. त्यामुळे बरेच वादळ उठले होते. आजकाल साहित्य आणि नाट्यसंमेलनाच्या व्यासपीठावर राजकारणी किंवा शासनातली माणसे हवी की नकोत यावरून वादळ उठते. शासन आणि कलावंत दोघांनीही आपला दृष्टीकोन बदलला पाहिजे. तरच संस्कृती संवर्धनाचे काम नीट पार पडू शकते.

प्रतिभावंतांनी सत्त्व सोडू नये ही गोष्ट खरी आहेच. पण शासनाला जमेत धरायचेच नाही ही भूमिकाही चुकीची आहे. शासन ही एक शक्ती आहे. तिचा कला, साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. शासनाने सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासासाठी मदत करताना मदतकर्त्यांचीच भावना ठेवली पाहिजे. त्यांनी 'उपकारकर्त्याचा' आव आणण्याची गरज नाही. शासनाच्या सांस्कृतिक विकासासाठीच्या योजनांना प्रतिभावंतांनी सहकार्यच केले पाहिजे. संतश्रेष्ठ तुकारामांनी छत्रपतींनी पाठविलेला सोन्याचा नजराणा नाकारून अपरिग्रहाची सीमा ओलांडली.

***तुम्हापाशी आम्ही। येऊनिया काय।***
***वृथा शीण आहे। चालण्याचा।।***

असं आग्रहपूर्वक सांगणारे तुकोबाराय दुसरीकडे पाईकीचे अभंग लिहून महाराजांना आत्मिक बळ देत होते. महाराष्ट्राच्या देदिप्यमान इतिहासातील हे उदाहरण बोलके आहे. अलीकडच्या काळात काही चांगल्या गोष्टीही घडल्या. १९६२-६३ साली शासनाच्या पंचवार्षिक योजनेतील लोकोपयोगी योजना समाजापर्यंत पोहचाव्यात यासाठी व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आणि प्रा. द. मा. मिरासदार यांनी कथा कथनाच्या माध्यमातून शासनाला सहकार्यच केले.

समाजाच्या सांस्कृतिक जीवनात ज्या ज्या वेळी कसोटीचे क्षण येतात, त्या त्या वेळी शासनाची भूमिका महत्त्वाची असते. 'संतसूर्य तुकाराम' या डॉ. आनंद यादवांच्या कादंबरीवरून उठलेल्या वादळाची त्यांच्या राजीनाम्यानंतर समाप्ती झाली. हे सारे घडत असताना शासनाने म्हणून काही एक भूमिका घेणे आवश्यक होते. ती शासनाने घेतली नाही. समाजातून तरी हे बरे, हे वाईट अशी प्रतिक्रिया का उमटली नाही? सांस्कृतिक जीवनातील निकोपता, सौहार्द आणि निरामयता टिकविण्याचे काम शासनाबरोबर समाजाचेही आहे. अनेक प्रतिभावंतांना फुलविण्याचे, प्रोत्साहन देण्याचे काम समाजाने केलेले आहे. 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंतांनी वयाच्या २३व्या वर्षी मृत्युंजय ही कादंबरी लिहिली. तत्पूर्वी त्यांनी कुरूक्षेत्राचा प्रवास करण्याचे

ठरविले. त्यावेळी सावंत लेखक म्हणून अजिबात नावारूपाला आलेले नव्हते. त्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झालेले नव्हते. तरीही कोल्हापूरकरांनी त्यांना आठ दिवसात अठराशे रुपये जमा करून दिले. त्यात पहिला सव्वाशे रुपयांचा चेक होता तो चित्रतपस्वी भालजी पेंढारकरांचा. पुढे 'मृत्युंजय' या महाकादंबरीने निर्माण केलेला इतिहास आपणा सर्वांना ज्ञात आहेच. कुसुमाग्रजांचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित व्हावा यासाठी खांडेकरांनी पुढाकार घेतला होता. नारायण सुर्वेंची कविता प्रकाशात यावी, यासाठी कुसुमाग्रजांनी परिश्रम घेतले. जुन्या पिढीने नव्या पिढीचा हात धरून त्यांना मार्गदर्शन करण्याची, पुढे नेण्याची वृत्ती आज अभावानेच दिसते. स्वत: फुलताना इतरांना फुलविण्याची संस्कृती विकसित होणेही तितकेच महत्त्वाचे असते.

काही वेळा विद्यावंतांना आपल्या संस्कृतीचे भान राहत नाही. जेव्हा शास्त्रज्ञांना अणुबॉम्बची निर्मिती किंवा चाचणी करण्याची बुद्धी होते तेव्हा संस्कृतीचा गुरूत्वमध्य ढळतो. केवळ संस्थांना अनुदान, पुरस्कार, कलेला प्रोत्साहन या गोष्टींचा सांस्कृतिक धोरणात समावेश होऊन चालणार नाही. मानण्याची अवहेलना करणारे राजकारण टाळणे, समग्र क्रांतिचे स्वप्न पाहणे, साहित्य, संगीत, धर्म, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांच्या संवर्धनात आनंद शोधणे यात संस्कृतीचे सार आहे. अशा संस्कृतीच्या संवर्धनासाठी आणि भरणपोषणासाठी सांस्कृतिक धोरण असले पाहिजे. वर्तमान युगात यांत्रिक आणि भौतिक प्रगतीचा वेग वाढला आहे. पण समाजाची नैतिक वाटचाल मंदावली आहे. लाच देणे, घेणे आणि मागणे यात संकोच उरला नाही. रीतसर किंमत नावाची गोष्ट उरली नाही. समाजाच्या भौतिक आणि नैतिक जीवनातली दरी 'कल्चरल लॅग' म्हणून ओळखली जाते. त्याला 'सांस्कृतिक मांघ' असे म्हणतात. ते दूर करणे हे सांस्कृतिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे.

दै. 'केसरी'मध्ये लोकमान्यांनी भाषेच्या संदर्भात जो अग्रलेख लिहिला त्यात ते सांगतात 'भाषा ही केवळ प्रांतिक अस्मिता जोपासण्यासाठी नसते. ती लोकशक्तीचा श्वास झाली पाहिजे. जशी एखाद्या माणसाच्या नाडीवरून त्याच्या स्वास्थ्याची अथवा रोगाची कल्पना येते, त्याप्रमाणे त्या राज्यातल्या भाषेवरून राज्याची बरी वाईट स्थिती लोक जाणतात. शिवाजी महाराजांच्या पूर्वी पोवाडे का झाले नाहीत? हे जाणकारांना सांगण्याची गरज नाही. शिवाजी महाराजांचा अभ्युदय म्हणजे मराठी भाषा आणि संस्कृतीचा अभ्युदय'

**तात्पर्य एवढेच:** राज्यकर्त्यांकडे इच्छाशक्ती आणि कृतिशीलता असेल तर संस्कृतीला मरण नाही.


**Products, We supply an extensive array of sugar manufacturing equipment made from top quality stainless steel or mild steel materials, sheets, plates, angles, bars and other requisites.**

**Mill and Boiler Section :** ■ Cane carrier ■ Underfeed rollers. ■ Bagasse carrier ■ Rake Elevators. ■ Return Bagasse Carrier. ■ Bagasse Bailing Machines ■ Bagasse Elevators ■ Wet Scrubbers ■ MS Chimney

**Clarification and Boiling House:** ■ Juice heaters ■ Juice and syrup sulphitor ■ Semi Kestner ■ Falling Film Evaporator ■ Continuous Pans ■ Batch pans ■ M.J.Condensor – (Conventional/Single Entry type) ■ Supply tanks ■ Air/Water/Vacuum Crystallizers ■ Vertical continuous crystallizers ■ Lime station i.e. Clarifier ■ Sugar elevators/Hoppers and Graders ■ Any sized fabricated vapour /exhaust piping

**Sugar and Material Handling Systems:** ■ Sugar Bins of any capacity. ■ Automatic weighing and stitching conveyor arrangement ■ Elevator/ Belt conveyors/ Stackers etc. ■ Mill House crane/Power house crane.

**Cane Handling and Cane Preperatory Devices:** ■ Cane Carrier. ■ Cane Kicker/Levelers ■ Cane unloader ■ Feeder table ■ Cane cutter ■ Molasses Storage Tanks ■ Spray Pond ■ Spent Wash System - SS/MS

**Industries we cater to**
We design and supply a wide range of industrial processing equipments manufactured to meet the needs and specifications of the following industries:
■ Sugar ■ Paper ■ Cement ■ Chemical

**AHMEDNAGAR STEELS PVT. LTD.**

A -24, M I D C. AHMEDNAGAR-414111, MAHARASHTRA, INDIA.PHONE: 0241-2777280 / 2778994, FAX:0241-2777523
EMAIL: ahmdnagarsteels@gmail.com, WEBSITE:www.indiamart.com/ahmednagarsteels/

## ही दिवाळी आपणा सर्वांना सुखसमृद्धीची, भरभराटीची आणि आनंददायी जावो!

।।ॐ श्री विठ्ठलाय नमः ।।
।। श्री गोरक्षजालंदरचर्पटाश्च अड्बंगकानीफमछिंराद्या।।
।।चौरंगीरेंवणाकभत्रींसंद्या भूम्यां बभूवुर्नवनाथ सिद्धा।।



# नाथपंथीय
## सेवा विकास संस्था पुणे

भारत सरकार रजि. नं. एफ ८४५८

**संस्थेची वैशिष्ट्ये :**

- अनाथाश्रमात मुलांच्या संगोपनाची व्यवस्था करणे
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी सहाय्य
- एड्सविषयी जनजागृती व प्रबोधन
- महिलांसाठी मोफत सल्ला केंद्र
- अध्यात्मिक प्रचार व प्रसार



**अध्यक्ष : श्री. किसनराव भोलाजी वाटकर**

११११७, गोखलेनगर पुणे १६, भ्रमणध्वनी : ९७६५८४१६२५



।। जाणता राजा ।।



मा. शरद पवार (केंद्रीय कृषीमंत्री)

## दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

• शुभेच्छुक •



।। मार्गदर्शक ।।



मा. व्यंकटराव अवधूत
प्रदेशाध्यक्ष, भटक्या विमुक्त जाती-जमाती सेल

**सौ. अंजनी किसनराव वाटकर**
■ महिला अध्यक्ष, पुणे शहर ■ सचिव, नाथपंथीय सेवाविकास संस्था

**सौजन्य :** श्री. बाजीराव म्हासाळ, सौ. कविता बढे, सौ. नंदा बेहरा, सौ. नंदा जगताप, सौ. रजनी जाधव, सौ. सीमा भूमकर, सौ. श्वेता परदेशी, मंगल वांजळे, चंदा दीडके, चंद्रप्रभा देवगुणे, प्रशांत अटक



- शिवशाहीर अरविंद दाढे
तुळशीबागवाले कॉलनी,
सहकारनगर नं. २, पुणे - ४११००९.
भ्रमणध्वनी : ९४२२९८६३६९

# शिवशाहीचा इतिहास जागवणारे किल्ले

महाराष्ट्राच्या पश्चिम भागात उभ्या असलेल्या सह्याद्रीच्या डोंगराळ रांगात अनेक ठिकाणी शिवपूर्व कालापासून अनेक बलदंड गडकोट-मोठ्या दिमाखात मराठमुलूखातला इतिहास जागवित उभे आहेत. सुमारे पाचशे साडेपाचशे लहान मोठे- काही मोडकळीस आलेले, काही दुर्लक्षित झालेले असे किल्ले उभे आहेत. त्या डोंगराळ गड कोटाच्या दगडादगडात अनेक ऐतिहासिक घटना उभ्या आहेत. जागृत अंत:करणानी आणि उघड्या डोळ्यांनी गडकोटात प्रवेश केल्यास तेथील दगड आपल्याबरोबर बोलायला लागतात.

अनेक ठिकाणी मला त्या भग्नावस्थेतील वास्तूमधून, मोडकळीस आलेल्या तटा बुरूजातून देदीप्यमान इतिहासाचा चित्रपट डोळ्यांपुढे दिसू लागला अन् मग मी - माझे देहभान विसरून त्या ऐतिहासिक वास्तूच्या, त्यांनी जागवलेल्या, पाहिलेल्या घटनाचा इतिहास अनुभूतीतून, साक्षित्वाने पाहत राहतो. तासन् तास कधी सुख दु:खाच्या तर कधी आनंदाच्या तर कधी उदासिनतेच्या भावनात विरून जातो. काही घटना डबडबलेल्या डोळ्यांनी वेड्यासारखा पाहत राहतो.

येणारे जाणारे निर्विकार मनाने माझ्याकडे पाहतात आणि हा वेडा तासन् तास या भग्न दगडधोंड्यात काय पहातोय, असे म्हणून तुच्छतेने निघून जातात.

राजगडच्या भग्नावस्थेतील दरूणी महालात अन् त्याच्या परिसरात जेव्हा मी उभा असतो, तेव्हा उदास मनाने, दु:खाश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी साडेतीनशे वर्षांपूर्वीच्या इतिहासाची पाने पाहत असतो.

त्या काळातील तो वैभवशाली दरूणी महाल माझ्या डोळ्यापुढे उभा राहतो. त्या महालाच्या गवाक्षावर लावलेले जाळीदार पडदे वाऱ्याने हालायला लागतात. महालात मंदपणे तेवणाऱ्या चारी कोपऱ्यातील समया उदासपणेच प्रकाशत आहेत.

त्या महालातील मंचकावर - हिंदवी स्वराज्याची महाराणी - सकल सौभाग्य संपन्न, सईबाई साहेब राणी सरकार मृत्युशय्येवर पहुडल्या आहेत. जवळच पुतळाबाई साहेब शांतपणे उभ्या आहेत. शिवाजी राजे मंचकावर राणी साहेबांचे जवळ बसलेले आहेत. राणी साहेबांचे कपाळावर हळूवार हात फिरवून मंदपणे हासत आहेत.

आणि-

''राणी साहेब - कोणतीही काळजी करू नका. वैद्य हकिमांची औषधे नियमित घ्या. आम्ही प्रतापगडी चाललो आहोत. त्या अफजल खानाचा समाचार घेऊन लौकरच आम्ही आपल्या भेटीला येऊ''

राणी साहेबांचे खोल गेलेले डोळे. उदास चेहरा. तरी सुद्धा त्या म्हणताहेत,

''महाराज, आमची काळजी करू नका. या संग्रामात यश तुमचंच आहे.''



खरोखरच हा सती सावित्रीचा आशीर्वादच होता.

''पुतळा''

''जी आज्ञा महाराज''

''बाई साहेबांची काळजी घ्या'' अन् राजे त्या महालाच्या बाहेर पडले. राणी साहेब शुन्यात पाहत राहिल्या. हा प्रसंग- मला - आजही त्या राजगडावर दरूणी महालात जाणवतो, भावतो अन् मीही उदासपणे अश्रू ढाळतो. बराच वेळ तेथेच रेंगाळतो. येणारा जाणाऱ्यांना मला तिथे काय दिसते आहे हे कळत नाही पण त्या वास्तू माझ्याशी बोलतात -

त्या राजगडात असे अनेक प्रसंग - माझ्या पुढे उभे असतात. कधी प्रतापगडावर जाव. अगदी पहाडा जंगलातून, अंबेनळीपासूनच चालायला सुरूवात करावी. अन् अफजल बुरूजाच्या पायथ्यापर्यंत याव. अन् तिथे पुन्हा देहभान विसरून, भव्य उंच- अगडबंब बुरूजाकडे बराच वेळ पाहत बसावं. याच बुरूजात खानाचे मुंडके पुरले आहे. ते कसे असेल याचा विचार करता करता त्या प्रतापगडाच्या संपूर्ण इतिहासाच्या साक्षात्काराने पुन्हा स्वत:ला हरवून बसावे, अन् साडे तीनशे वर्षांपूर्वीच्या इतिहासात - एकरूप व्हावे. त्या जावळीच्या जंगलात आणि निबिड अरण्यात या प्रचंड अगडबंब खानाचा कोथळा या मराठी नरसिंहाने प्रतापगडच्या उंबरठ्यावर टारटार फाडला. प्रचंड हलकल्लोळ झाला अन् शत्रूच्या आर्त किंकाळ्या आणि मराठ्यांच्या हरहर महादेवच्या विजयी आरोळ्या, त्या आसमंतात आजही घुमताहेत. तो तलवारीचा खणखणाट. चाललेली पळापळ - मी डोळे विस्फारून - एकटाच वेड्यासारखा पाहत राहतो. त्या परिसरात हा प्रतापगडचा संग्राम अगदी जिवंत होतो. माझ्या मन:चक्षू समोर साकारतो.

अनेक वेळा मी प्रतापगड पाहिला आहे. गडावर मुक्कामही केला आहे. पण नवरात्रात प्रतापगडावर राहण्यात वेगळाच एक ऐतिहासिक अनुभव येत असतो. कधी सुर्यास्ताच्या वेळेला - विखुरलेल्या तांबूस ढगातून - शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या पश्चिम तटाकडून होणाऱ्या सूर्यास्ताचे दर्शन अत्यंत देखणे असते आणि तसेच सकाळी पूर्वेला देवीच्या मंदिरातून दिसणारे सुर्योदयाचे ते विशाल जावळीच खोर आणि श्री महाबळेश्वराला हळूच जाग आणून शारदीय कोवळी किरणे घेऊन देवीच्या पुजेला येणारा सूर्य, गडावर शारदीय प्रसन्नता आणतो. कधी कधी काळ्याकुट्ट ढगांच्या दाटीत आणि पावसाच्या वर्षावात नवरात्र नटून जाते. पण तरीसुद्धा नवसाला पावणाऱ्या त्या आदिशक्तीच्या दर्शनाला आजूबाजूच्या खेड्यातून श्रद्धापूर्वक येणाऱ्या भाविक भक्त स्त्री पुरूषांची गर्दी नऊ दिवसात कधी कमी होत नाही. अहोरात्र गर्दी फुललेलीच असते. शारदीय नवरात्राचा हा सोहळा काही विलक्षण, देवीचे भुते, भोपे, गोंधळी सारे आपली हजेरी लावतात.

ललिता पंचमीची रात्र, प्रतापगडावर विलक्षण अनुभूती देऊन जाणारी रात्र आहे. देवीची रात्रीची आरती सुरू होते. त्या ललकारीत अक्षरश: शिवशाही साकारते. ढोल झांजाचा दणकेबाजा आवाज देवी भक्तीच वार सर्व भक्तांच्या अंत:करणात फुलवित असतो. तो आवाज जेव्हा शिगेला पोहोचतो तेव्हा साक्षात महिषासूरमर्दीनी शंखचक्र, गदा, त्रिशुल घेऊन दैत्यांच्या संहाराला निघाली आहे असा आभास निर्माण होतो. याच वातावरणात देखील देवीची फेरी होते. मध्य रात्र उलटून गेली तरी दर्शनाची रीघ संपत नाही. याची अनुभूती गडावर वावरल्याशिवाय कळणार नाही.

गंडकी नदीतून खास आणलेल्या शिळेपासून बनविलेली ही साक्षात तुळजेची प्रसन्न मूर्ती. पहाटेच्या वेळी अभिषेक होत असताना सुवर्ण रेखांनी युक्त असणाऱ्या त्या आदिशक्तीच दर्शन



घडत. देवीच प्रसन्न मंदिर आणि आजूबाजूचे प्रांगण सुद्धा भव्य व सुंदर आहे. याच देवीसमोर श्रीमंत शिवाजी राजे आपल्या लव्याजम्यानिशी आरतीला आहेत, असा आभास माझ्या मनाला होत असतो.

केदारेश्वराच्या मंदिरासमोरील दगडी कट्ट्यावर शिवाजी राजे बसलेले आहेत आणि उद्या खानाला भेटायला जायचे आहे. त्यावेळी बरोबर कोणाला घेऊन जायचे याची चर्चा पुढे बसलेल्या आपल्या जीवलगांशी राजे करताहेत, याचे साक्षात्कारी स्वरूप माझ्या पुढे उभे राहते.

त्या केदारेश्वराच्या पुढील दगडी कट्ट्याकडे मी एक टक पाहत असतो. तो कानात मोत्याचे चौकडे असणारा, कपाळी सुंदर शिवगंध रेखलेला, डोईवर जिरेटोप असणारा अन् त्या टोपात रूळणारा मोत्यांचा तुरा-वाऱ्याबरोबर हिंदळतोय असं रूप साकारत अन् राजा शिवाजी डोळ्यापुढे दिसतो. मी वेळेच भान हरवून, वेड्यासारखा उभा असतो. त्या राजाच्या समोर बसलेले त्यांचे जीवलग सवंगडी येसाजी कंक, तानाजी मालुसरे, संभाजी कावजी कोंढाळकर, जिवू महाल्या, संभाजी करवर, संभाजी मुरूंबक इत्यादी माणसे पुढे पुढे दिसू लागतात आणि शिवशाही साकारते. मन पुलकित होतं. वास्तवाचे आणि वर्तमानाचे भान हरपते. प्रत्येक गडाशी अस माझं नातं जोडलं गेलय. महाराष्ट्रातल्या प्रत्येक गडावर अन् तेथील दगडा दगडात राजा शिवाजींचा चैतन्याने भारलेला इतिहास आजही साक्षित्वाने दिसतो. फक्त पाहणाऱ्याला दिव्यदृष्टी असावी लागते.

प्रतापगडावर वावरत असताना सर्वात महत्त्वाचा माणूस दिसतो तो जिवू महाल्या. जोरखोऱ्यात राहणारा हा एक शिवाजीराजांचा सामान्य सेवक दोन्ही हातात पट्टे घेवून चैतन्याने नाचतोय आणि राजांच्या पाठीशी उभा आहे असं दृश्य प्रतापगडावर भावत.

प्रतापगडसारखाच पन्हाळ्याशी माझा जिव्हाळ्याचा संबंध आहे. प्रत्येक ऋतूत पन्हाळ्याच आगळ दर्शन मला घडलेले आहे. प्रतापगडाच्या संग्रामानंतर शिवाजीराजे स्वराज्याचा विस्तार करत करवीर नगरीपर्यंत पोहचले आणि लगेच पन्हाळा काबीज केला. युद्धशास्त्रात निपुण असणाऱ्या आणि गनिमी काव्यात तरबेज असणाऱ्या राजा शिवाजीनं पन्हाळ्याचं महत्त्व ताबडतोब ओळखल. पन्हाळा राजांचा अत्यंत आवडता किल्ला झाला. पन्हाळ्याचा विस्तारही फार मोठा आहे. पन्हाळ्याला लागूनच असणारा पावनगड आणि समृद्ध कासारी नदीपासून तो उत्तरेच्या वारणे खोऱ्यापर्यंत अथांग पसरलेला पन्हाळ्याचा प्रदेश अनेक लहान मोठ्या ऐतिहासिक घटनांनी समृद्ध झालेला आहे. किल्ले पन्हाळा भोज राजाने १०५२ ला बांधला. पण या किल्ल्याला अनेक नावे आहेत. अतिप्राचीन काळी पराशर ऋषी येथे राहायचे म्हणून याला 'पराशर गड' असेही म्हणतात. या गडावर नागांचा वावर मोठा असल्यामुळे याला 'पन्नगालय' असेही म्हणतात. शिवपूर्व काळातल्या अनेक शिलहार राजांच्या कर्तबगारीचा इतिहास पन्हाळ्याच्या परिसरात दडलेला आहे. त्या पन्हाळ्यावर मला माझ्या भाग्यानं महारूद्र बाजीप्रभूंच्या अभ्यासाच्या निमित्तानं तीन महिने राहण्याचा योग आला आणि मग मात्र पन्हाळ्यातील प्रत्येक वास्तू माझ्याशी बोलू लागली आणि पन्हाळ्याच्या अंतरंगापर्यंत मी जाऊन इतिहासाची उकल करू लागलो.

पन्हाळ्याचा दगड संबंध जांभ्या खडकांनी तयार झालेला आहे. त्यात लोहाच प्रमाण जास्त असल्यामुळे त्याचे तट भक्कम आहेत. ही गोष्ट राजा शिवाजींना अत्यंत भावली. त्यांनी बाजींना बोलून दाखवले. ''तोफेचे गोळे ही भिंत भेदू शकत नाहीत बाजी. म्हणून पन्हाळ्यावर सिद्धीचा मारा यशस्वी होणार नाही.'' गडावर असणाऱ्या अनेक वास्तू शिवाजी राजांच्या चैतन्याच्या इतिहासाशी निगडीत आहेत. पावनतीर्थ, हरिहरेश्वराच मंदिर या परिसरात राजे अनेकवेळा एकांतात, विचारमग्न अवस्थेत राहत असत. हा प्रदेशच मुळात अतिशय शांत आणि निसर्गसंपन्न आहे. कधीकधी महाराज पश्चिमेच्या बाजूला तीन दरवाजापर्यंत फेरफटका मारत असत आणि बाजींच्या समवेत किल्ल्यांची संरक्षणात्मक जडणघडण कशी आहे, याची चर्चा करत असत. वाघ दरवाजापाशी मी तासनतास त्याची रचना पाहत उभा असे. त्या वाघ दरवाजाच्या भव्य, उंच प्रवेशद्वारावर राजा शिवाजी आणि बाजी उभे आहेत असा भास मला व्हायचा. तिथून दिसणार संपूर्ण वारणेच खोरं, दूरपर्यंत पसरलेला विशाल मुलूक ते न्याहाळतायत आणि बाजींना म्हणताहेत, ''पाहिलंत बाजी, कोकण आणि देश यांच्या सीमा रेषेवर उभा असणारा हा पन्हाळा या मुलखाचा रखवालदार आहे असं मला वाटतं. पाहिलात खाली असणारा वाघ दरवाजा कसा वाघाच्या जबड्यासारखा शत्रूला आत खेचून घेतल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळेच गडावर असणाऱ्या आपल्या कमी शिबंदीला अफाट शत्रूला तोंड देता येणं शक्य आहे. म्हणूनच सिद्धी जोहर गडावर हल्ला करू शकणार नाही.'' पन्हाळ्याच्या प्रत्येक वास्तुत राजे उभे आहेत आणि बाजींशी ते हितगुज करताहेत अशी अनुभूती तीन - साडेतीन महिन्याच्या कालावधीत मला अनेकवेळा जाणवली.

सज्जा कोटीच्या परिसरात राजे उभे आहेत. त्यांच्या आजूबाजूला गंगाधर पंत आहेत. बाजीप्रभू आहेत आणि सज्जा कोटीच्या खालच्या भागात, डोंगराळ बेचक्यात नेबापूर नावाच छोटसं गाव पाहत आहेत आणि त्याच गावचा शिवा काशिद, राजांचा जिवलग सेवक राजांच्या पाठीमागे उभा आहे. राजे त्याच्याकडे बघत सारखे हसताहेत असा मला भास व्हायचा. बालेकिल्ल्याच्या ईशान्य बाजूला असणार महालक्ष्मीचं मंदिर, ही महालक्ष्मी शिलेदारांची कुलस्वामिनी. पण राजांनी सुद्धा या देवीची मनोभावे पूजा केली. राजे पन्हाळ्यावर असताना न

चुकता या देवीच्या दर्शनाला जात असत. ही देवी दाक्षिणात्य पद्धतीची असून, नवसाला पावणारी आहे, अशी आजही पन्हाळ्यावरील लोकांची श्रद्धा आहे. याच देवीनं राजाला पन्हाळा सोडण्याचा साक्षात्कारानं आदेश दिला. या मंदिराच्या परिसरात आदेश दिल्यानंतर राजे विचारमग्न अवस्थेत बालेकिल्ल्यात गेले. त्यावेळी त्यांच्याबरोबर शिवा काशिद होता. त्याचही रूप राजा शिवाजीसारखच होत आणि मग निसटताना शिवाजी काशिदला राजांच्या रूपानं उभा करून दुसऱ्या पालखीतून त्याला पाठवायचा ही योजना निश्‍चित झाली. हा इतिहास कल्पनेचा नाही, सत्याचा आहे. कल्पनेन सत्यावर मात केलेला आहे. ज्या ज्या वेळी मी पन्हाळ्यावर असतो, त्या त्या वेळी माझे डोळे पाझरतात आणि शिवा काशिद व शिवाजी राजे माझ्या डोळ्यापुढून हालत नाहीत. पावलापावलावर आजही माणस वावरतायत अशी अनुभूती मी पन्हाळ्यावर घेत गेलो. राजे ज्या काळात पन्हाळ्यावर होते त्या काळातील हवामान, थंडी, वारा, पाऊस याची अनुभूती त्या त्या वेळेला जावून मी घेतली. दगडधोंड्यातून, जंगलातून, पावसातून मी हिंडलो. पन्हाळ्यावर पडणाऱ्या प्रचंड पावसाची अनुभूती घेतली आणि अशा धुवांधार पावसातून राजे, बाजीप्रभू आणि बांदलांच्या वज्रतुल्य कड्यातून गड सोडताहेत हे पावसाच्या धारातून मला दिसत होतं. त्या पडत्या पावसात प्रचंड मोठ्या काळ्या इंगळ्या वेगवेगळ्या ठिकाणी धावताना मला दिसत होत्या. सळसळणारे नाग मी पाहत होतो आणि अंत:करणात चर्र.. होत होते. आजही या इंगळ्या, हे नाग पडत्या पावसात हिंडताहेत. मग राजाला पालखीतून नेताना त्या काळात किती इंगळ्या आणि नाग पायाखालून गेल्या असतील, या विचारानेच अंगावर काटा येतो. पन्हाळ्याच्या परिसरातल्या मातीत अनेक ठिकाणी जळवा आहेत. या जळवा लगेच माणसांना चिकटतात. या सर्व गोष्टींचा विचार केला असता या कशाचीही तमा न बाळगता धर्मरक्षणासाठी, राष्ट्र उभारणीसाठी केवढ्या निर्धाराने या आमच्या पूर्वजांनी पावले टाकली असतील, हे आज फक्त कल्पनेने जाणायचे.

आजही पन्हाळ्यावर इतिहासाचे दाखले देणारे अनेक दगड आणि मोडकळीला आलेल्या अनेक इमारती उभ्या आहेत. पण दु:ख होत ते या गोष्टींचा विचार न करता माणसं पन्हाळ्यावरच्या पंचतारांकीत हॉटेलात राहायला येतात आणि आमचा पवित्र इतिहास, पवित्र वास्तू आणि पवित्र भावना याचा विचार न करता वावरत असतात.


## दोन कर्ज योजना
केवळ फायद्याच्या

### विश्वेश्वर सुवर्ण खरेदी कर्ज योजना
शुध्द सोने किंवा सुवर्ण अलंकार खरेदीसाठी आकर्षक अटींवर कर्ज उपलब्ध.
जामीनदार नाहीत, कमी व्याज दर, परतफ़ेडीचा सोयीस्कर कालावधी.

### विश्वेश्वर स्थावर मिळकत तारण कर्ज योजना
गरज कोणतीही असो, स्थावर मिळकतीवर कर्ज घ्या आणि सुलभ हप्त्याने परत करा.

सर्व आर्थिक निकषांवर नेत्रदीपक प्रगतीचा आलेख

*ठेवीला सुरक्षा, कर्जाला दिलासा आणि*
*वसुलीला माणुसकीचा स्पर्श देणारी बँक*

**दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे**
मुख्य कार्यालय: 471/472, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे 411 037
संपर्क फोन– 2426 1755/2426 2745



- नारायण ज. शेळके
'उष:काल' २३, महालक्ष्मी हौ. सोसा.,
आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे - ५१.
भ्रमणध्वनी : ९४२२५३४००६.

# सुखी दांपत्याचे रहस्य
## (कथा)

कोकण चार दिवसाची सहल. नुकताच पावसाळा संपलेला. हवेत गारठा जाणवू लागला. कोकण म्हटले की, भरपूर पाऊस. नद्या-नाले दुथडी भरून वाहणारी. डोंगर दऱ्यामध्ये धुक्याच साम्राज्य. ठिकठिकाणी खळाळणारे लहान मोठे धबधबे. त्यांचे धो-धो पडणारे पाणी आणि अंगावर उडणारे तुषार. संपूर्ण सृष्टी ताजीतवानी होऊन, हिरवागार शालू नेसून तुमच्या स्वागताला उभी आहे. हे सर्व वातावरण उत्साहवर्धक, रोमहर्षक आणि धुंद करणारे. त्यामुळे सहलीतील आठ जोडपी आपलं वय विसरून मनमुराद धम्माल करीत होती. तरूणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह पाहून टूर मॅनेजर सोमनाथला आश्चर्य मिश्रीत कौतुक वाटले तर नवल नाही आणि तोही खुश होता.



या वेळचा ग्रुप तसा तरूण नव्हता आणि ज्येष्ठांचाही नव्हता. पण चाळीशीच्या आसपासचा होता. बहुतेक मोठ्या हुद्यावर नोकरी करणारे असावेत आणि त्यांच्या सहचारीणीही नोकरी करणाऱ्या दिसत होत्या. पण सोमनाथचा आतापर्यंतचा अनुभव फारसा चांगला नव्हता. त्याच त्याच तक्रारी, बसमध्ये मागे-पुढे बसण्यावरून होणारे वादविवाद ''आम्ही पैसे भरलेत, काही फुकट आलो नाहीत, तेव्हा प्रत्येक वेळी ते पुढे बसतात. आम्ही सदा मागे.''

''अहो त्यांना स्पाँडिलेसिसचा त्रास आहे, म्हणून बसत असतील पुढे.'' त्यांचा कैवारी.

''अहो काकू! तुम्ही पुढच्या सीटवर बसा!'' भांडता कशाला, सोमनाथ.

''कसे बसणार? जागा पकडण्यासाठी सर्वांच्या पुढे पळतात, त्यावेळी त्यांचा स्पाँडिलेसिस कुठे जातो? पुढची जागा बळकावल्यानंतर आम्ही कसे बसणार?''

''वास्तविक पाहता रोटेशनप्रमाणे बसवायला पाहिजे, पण नाही, पार्सिलिटी दुसरे काय?''

या आणि अशा असंख्य तक्रारी. शेजाऱ्याला अंघोळीला गरमपाणी मिळाले. पण आम्हाला मात्र गार मिळाले. आम्हाला चहा उशीरा मिळतो. समोरच्याची रूम मोठी असून, हवेशीर आहे. आमची अंधारी आणि मागच्या बाजूला - आमच्या रूममधला टी.व्ही. बंद आहे, त्यामुळे सोमनाथ त्रस्त होई. पण गेंड्याच कातडं पांघरून हसून वेळ मारून नेत असे.

या तक्रारीखेरीज, दिलेल्या वेळा न पाळणारे, न सांगता कोठेही गायब होणारे, दिसल मार्केट की घुसणारे असे असंख्य प्रकारचे नमुने. त्यांना सांभाळून घेणे, त्यांचे रूसवे फुगवे काढणे आणि ही सर्कस मुक्कामी आणावी लागे. अर्थात हा धंद्याचा भाग असल्यामुळे सोमनाथच्या सवयीचा होता.

कंपनीची सहल म्हटले की, त्यात तरूण -तरूणी ऐवजी वयस्क व ज्येष्ठ जोडप्यांचा भरणा असणार हे ओघाने आलेच. घरी कुणाशी न पटणारे, सदा त्रास देणारे, अशांना सरळ कंपनीच्या ताब्यात देऊन चार दिवस स्वत:ची सुटका करून घेणारी मुले, सुना हे झेंगट सहल कंपनीच्या गळ्यात मारतात आणि चार दिवस निवांत श्वास आणि सुखाचा घास खातात. त्यातल्या त्यात अशी जोडपी अशा सहलीला आली की, पहायलाच नको. वास्तविक पाहता चार दिवस एकमेकांच्या सहवासात राहायला मिळते. एकमेकांची दु:ख समजावून घेणे, एकमेकाला योग्य सल्ला देणे, आपली मनं एकमेकांसमोर उघडी करणे किंवा तारूण्यातील मंतरलेले दिवस आठवणे हे सोडून एकमेकांशी वैऱ्याप्रमाणे भांडत असतात. कदाचित मुलां-सुनासमोर भांडता येत नसेल म्हणून ''आता बरी सापडलीस'' किंवा ''बरा सापडलास'' असे समजून खदखदणाऱ्या

शब्दांना वाट करून देत असावेत आणि तेच तेच डायलॉग सोमनाथच्या तोंडपाठ झाले होते.

जसे-

''अग लवकर आवर! मॅनेजरने सकाळी आठ वाजता तयार व्हायला सांगितले आणि तू मात्र निवांत, अग तू घरातल्या गोठ्यात नाहीस, तिथे कसेही चालते आपण ट्रीपला आलो आहोत.''

''मग काय ट्रीप पळून चाललीय काय? आपल्याला घेतल्याशिवाय ते कसे जातील? तुम्हीच म्हणता ना आपण ट्रीप बरोबर आहोत तर चांगल नको का दिसायला.''

''अगं आता या वयात तुझ्याकडे कोण पाहणार आहे? काय पण तो अवतार, अगं तुझ्या माहेरी पिठाची गिरणी आहे म्हणून तू तशीच दिसायला नको! केवढी ती पावडर लावली. संन्यासीनी आहेस की गोसावी? पूस ती पावडर आणि त्या वाळलेल्या ओठावर कसला रंग फासतेस? अगं वयाच तरी भान ठेव. स्वत:ला काय ऐश्वर्या समजतेस काय? अगं तुझ्यापेक्षा ती टुनटुन बरी!''

''अहो, तुम्हाला आजपर्यंत माझं काही आवडलं का? मी आहे अशी आहे! लग्नाच्या वेळी काय डोळे झाकून माझ्या गळ्यात माळ घातलीत का? अहो, मी आवडत नव्हते तर कशाला केलत लग्न माझ्याशी?''

''अग त्यावेळी तू चवळीची शेंग होतीस, आता काशीफळ भोपळा झालीस. कधी आरशात पाहिलस का?''

''तुम्हाला मी म्हणाले ना! मी आहे ही अशी आहे!''

''बरे चला आता लवकर! पायघड्या घातल्यासारख चालू नकोस! ते पातळ किती वर धरलस? सोड ते खाली. जमीन कोरडीच आहे.''

''अहो, मी आवडत नव्हते तर कशाला बरोबर आणलत? दोन शब्द प्रेमाचे नाहीत. सदा मेलं कुचकं पादरं बोलणं, शेजारची इंदू येऊ द्या नाहीतर वरच्या फ्लॅटमधली सिंधू, मग पहा कसं कात टाकल्यासारखं, तारूण्य अंगात संचारतय ते. किती बोलू आणि किती नाही, हास्य, विनोद, कोट्यांना कसा उत येतो ते.''

''बस झालं! त्या शिळ्या कढीला पुन्हा पुन्हा उकळणं. चला, इतर लोक गाडीत बसले सुद्धा!''

''इतर लोक पहा आपल्या बायकांना कसे जपतात ते, तुमचं आपलं सदा पिसाळलेले कुत्रे मागं लागल्यासारखं.''

कमी जास्त प्रमाणात अशा प्रकारचे प्रेमाचे संवाद निर्माण झाले की त्यातून धुसफूस, भांडणे, रडणे, जागणे, उपोषण सुरू व्हायचे आणि ते मिटविण्याचे आणखी एक काम सोमनाथला करावे लागे.

मात्र, या सहलीतला अनुभव अगदी त्याच्या उलट आला. इतके आनंदी, रोमँटिक, उत्साही जोडपी असू शकतात, याचा त्याला साक्षात्कार झाला. त्यांचे संवाद कानावर पडल्यानंतर तर त्याची खात्रीच पटली.

''वा! फारच सुंदर! आमच्या राणीला हा पिंक कलर फारच खुलून दिसतो, तुझं हे सौंदर्य पाहून बिचारे गुलाब माना खाली घालतील.'' तो.

''अहो, या वयात कसली माझी स्तुती करताय?'' ती लाजून म्हणते.

''कसं ग हे मेंटेन केलंस? नाहीतर चाळीशी ओलांडलेल्या साठीच्या दिसतात. अगं, तुझं वय काही का असेना मात्र पंचवीशीची दिसतेस. काही टू टायर तर काही थ्री टायर शीऽऽ बघवत नाही त्यांच्याकडे.'' तो.

''मग कशाला बघता?''

''आता तुझ्या सारखं सळसळत आणि उसळत मूर्तीमंत तारूण्य माझ्यासमोर असताना मी कशाला पाहू कुणाकडे?'' पुन्हा तोच म्हणाला.

''खरं सांगू, कालचा तो ब्ल्यू ड्रेस तुला फारच छान दिसत होता. तुझ्या चॉईसला मानला बुवा!''

''अहो तो माझा नाही! सुनेचा आणला होता.''

''बघ! मी म्हणतो ते खरे आहे की नाही? आता तुला आणि सुनेला शेजारी उभे केले तर पाहणाऱ्याला प्रश्न पडेल यातली सून कोणती आणि सासू कोणती?'' - तो.

''पुष्कळ झालं हरबऱ्याच्या झाडावर चढविणं'' - ती आरक्त होत म्हणाली.

आणि अशाच प्रकारचे संवाद इतर जोडप्यात ऐकायला मिळत होते. बाप्ये बायांना जपत होते. वेळप्रसंगी हात देत होते. त्यांच्या शाली, पर्स प्रेमाने सांभाळत होते. पाण्यातून जाताना त्यांच्या चपला हातात घेत होते. हे सर्व पाहिले म्हणजे मूर्तिमंत आणि आत्यंतिक प्रेम या सम दुसरे नाही. जोडपी असावी तर अशी. सहजीवनाचा खरा अर्थ यांनाच समजला असावा आणि हाच आदर्श जर सर्व विवाहितांनी वैवाहिक जीवनात ठेवला तर भूलोकीवर स्वर्ग अवतरायला वेळ लागणार नाही.

मात्र एक गोष्ट सोमनाथला खटकत होती. त्यांनी हे सौख्याचे सुवर्ण क्षण कॅमेऱ्यात बंदिस्त करायला हवे होते. पण प्रत्येक जण कॅमेरा आणायला विसरला होता.

अंबोली, सिंधुदुर्ग, मालवण, रत्नागिरी, पावस, डेरवण, चिपळूण असे करत सहल चौथ्या दिवशी पुण्यात पोहचली. सोमनाथने सर्वांना निरोप दिला. त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान पाहून सोमनाथला आपल्या ट्रीपचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

''काय सोमनाथ, काय म्हणतोय कोकण दौरा?'' कंपनीच्या मालकाने विचारले.

''साहेब, आतापर्यंत मी कोकणात एकवीस ट्रीपा केल्या पण या वेळचा अनुभव मात्र अविस्मरणीय आहे. पर्यटक अत्यंत रोमँटिक मुडमध्ये होते. भांडण नाही, कटकट नाही, केटरिंगमधल्या चुका नाहीत. आपण काय खातो याच्याकडे त्यांचं लक्ष नसायचं. त्यांनी

ट्रीप मनसोक्त एन्जॉय केली. कोठे उशीर नाही, मार्केटींग फारसं नव्हतं. दिलेल्या वेळेआधी सर्वजण हजर असायचे. त्यामुळे मला अजिबात त्रास झाला नाही.'' सोमनाथ मोठ्या उत्साहाने सांगत होता.

''अरे सोमनाथ! हे आपल्या ट्रॅव्हलिंग कंपनीचं क्रेडिट आहे. इतकी आनंददायी सहल आपण आयोजित करू शकलो, हा आनंद त्यांच्यापुरता मर्यादित न राहता कर्णोपकर्णी सगळीकडे दरवळेल आणि आपल्याकडे पर्यटक आकर्षित होतील. तेव्हा मला वाटते, त्यांना आपण आभाराचं पत्र पाठवू या.'' मालक उत्तेजित होत म्हणाले.

''पाठवू या, जरूर पाठवू. आपण मला मजकूर लिहून द्या. मी ती पत्र टाईप करून पोस्ट करतो, त्यांचे पत्ते आपल्याकडे आहेत.'' सोमनाथ उत्साहाने म्हणाला.

''पण मला वाटते सोमनाथ, हे पत्र आपण 'अहो'च्या नावाने पाठविण्याऐवजी 'सौ'च्या नावाने पाठवू या!''

''पण माझी एक शंका आहे, 'अहो'च्या नावाने पाठविण्याऐवजी 'सौ'च्या नावानेच का?'' सोमनाथ साशंकपणे म्हणाला.

''अरे सोमनाथ, जसे प्रत्येक यशस्वी पुरूषामागे स्त्री असते तसे प्रत्येक आनंदी पुरूषामागे स्त्रीच असते. त्यांच्या वागण्यावर सहलीचा आनंद अवलंबून असतो. तेव्हा सौ.च्या नावानेच आपण पत्र पाठवू या.'' मालक निर्णायक म्हणाले.

दुपारी बाराची वेळ, कल्पनाताई सगळं आवरून आता कोठे मोकळ्या झाल्या होत्या. इतक्यात 'पोस्टमन', म्हणून हाक ऐकू आली आणि दाराच्या फटीतून एक लिफाफा आत सरकला गेला. कल्पनाताईंनी पदराला हात पुसून तो लिफाफा उचलला. पाहते तर ते त्यांच्याच नावाचे होते. 'कुणाचे बरे हे पत्र असावे?' अक्षरही ओळखीचे वाटत नव्हते. त्या संभ्रमात पडल्या. कारण अलीकडे फोन आणि मोबाईलच्या जमान्यामध्ये पत्रव्यवहार बंद पडला होता. त्यांच्याच नावावर ते पत्र असल्यामुळे त्यांनी ते फोडले. त्यातील मजकूर असा होता.

**स.न.वि.वि.**

आपण उभयंता आमच्या कंपनीच्या कोकण सहलीत सहभागी झालात त्याबद्दल आपण आणि आपले पतिदेव यांचे आम्ही शतशः आभारी आहोत. पति-पत्नीचं निखळ प्रेम, या वयात वाहणारा उत्साहाचा झरा, त्यातून आनंदाची उधळण हे सर्व पाहिले म्हणजे आम्ही सहल यशस्वीपणे पार पाडण्यात सफल झालो आहोत. ही गोष्ट आम्हाला भूषणावह आहे. तेव्हा वारंवार असेच आमच्या सहलीत सहभागी होऊन, आम्हाला आपली सेवा करण्याची संधी द्यावी ही नम्र विनंती. पुनःश्च आभार.

आपला

**संचालक**

आनंद पर्यटन कंपनी, पुणे.

कल्पनाताई गोंधळात पडल्या. आपण या ट्रीपला गेलोच नाही, तर हे पत्र आले कसे? नावाच्या साधर्म्यामुळे म्हणावे तर पत्ता अचूक होता. हा काय प्रकार आहे हे त्यांच्या लक्षात येईना. कोण ते भाग्यवान असतील की या वयातही त्यांच्यात प्रेमाचा अखंड झरा वाहतो आहे. इथेतर लग्नानंतर दोन वर्षातच प्रेमाचा झरा आटून पात्र पार कोरडं ठणठणीत पडलं आहे.

आठ दिवसांपूर्वी हे कंपनीच्या कामासाठी चार दिवस बाहेरगावी गेले होते. अलीकडे त्यांच्या कंपनीत खूप काम वाढलंय म्हणे! रोज तर उशीरा येतातच शिवाय सुट्टीच्या दिवशी बाहेर असतात आणि अधून मधून कंपनीची टूर. तेव्हा त्यांना मला घेऊन ट्रीपला जायला वेळ हवा ना? आणि असला तरी मला घेऊन जाण्याऐवढी त्यांच्यात रसिकता हवी ना? त्यांच्याबरोबर मी फक्त हनिमुनला गेल्याच आठवंत. त्यानंतर फक्त सासर-माहेरचा प्रवास. तेव्हा अशा अरसिक नवऱ्याबरोबर सहलीला जाण्याएवढी मी भाग्यवान कुठे आहे?

शिवाय हे पत्र त्यांना दाखविल्यास मीच कुणाबरोबर तरी ट्रीपला गेले असा अर्थ काढतील. त्यापेक्षा हे पत्र फाडून टाकून गप्प बसावे हे उत्तम.

इकडे सोमनाथच्या पर्यटन कंपनीमध्ये एकाच टाईपच्या मजकुराची सात पत्र आली.

**स.न.वि.वि.**


आपण पाठविलेले पत्र मिळाले, पण क्षमस्व आपण म्हणता त्याप्रमाणे आम्ही उभयंता त्या सहलीस आलो नव्हतो. आपला काहीतरी घोटाळा झालेला दिसतो. त्याची नोंद घ्यावी.

म्हणजे एक जोडपे सोडता बाकी सर्व 'स्टेफनी'धारक होते हे सोमनाथला समजले. त्याचबरोबर सुखी दांपत्याचं रहस्यही त्याला कळले व त्याने कपाळावर हात मारला.

सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर
साहित्य चपराक
बॉबीपासून ब्रह्मापर्यंत आणि शेंडीपासून शॅम्पेनपर्यंत सर्व विषयांचा खुसखुशीत परामर्श घेणारे मराठीतील एकमेव परिपूर्ण आणि प्रभावी मासिक...

'साहित्य चपराक'च्या
सर्व वाचकांना
दिवाळीच्या हार्दिक
शुभेच्छा!





## श्री. गणेशशेठ उत्तमराव भिंताडे



श्री. नितीन पायगुडे



श्री. सुभाष पोमण





सौजन्य **निलेश एन्टरप्रायजेस**

३७/३, बी. गुरुप्रसाद अपार्टमेंट, धनकवडी, पुणे - ४३.

मो. ९९६०७०५०५७, ९४२२००५०५७, ९८२२०३२०६४, ९४२२५००६२१



- आश्लेषा महाजन
'मंजिरी', २३० चित्ररेखा सोसा.,
सहकारनगर नं. १, पुणे - ४११ ००९
भ्रमणध्वनी - ९८६०३८७१२३

# बालगीतांच्या मजेदार दुनियेत

उज्ज्वल राष्ट्राच्या भवितव्यासाठी संस्कारशील नागरिक घडविणे गरजेचे असते. बालपणीच मनावर चांगले संस्कार बिंबवले गेले तर असे नागरिक घडतात. असे संस्कार सहजगत्या घडविण्याचे अफाट सामर्थ्य बालसाहित्यात असते. त्यातही बालगीतं म्हणजे मोठी पर्वणीच. संत ज्ञानेश्वरांपासून चालत आलेल्या या परंपरेच्या पाईक असलेल्या सुप्रसिद्ध कवयित्री, बालसाहित्यिक सौ. आश्लेषा महाजन यांनी बालगीतांच्या मजेदार दुनियेची घडविलेली ही सफर!

**- संपादक**

बालगीत म्हणजे बालांचे मनोविश्व, भावविश्व, त्यांचे आकलन आणि विचारकक्षा यात मावणारे गाणे. पण मग 'बाल' म्हणजे नेमका कोणता वयोगट? तो वयोगट म्हणावा की प्रवृत्ती? मला वाटतं, व्यावहारिक अर्थानं विचार केल्यास 'बाल' म्हणजे ० ते १५ वर्षांपर्यंतची मुले-मुली. (मतिमंद मुले वगळून) 'बाल' असणे ही एक प्रवृत्ती आहे, असे मानल्यास मात्र 'बाल' ह्या प्रकारात आणखीही अनेक लोकांना घ्यावे लागेल. बालगीत म्हणजे बालांसाठी लिहिले गेलेले आणि संगीतबद्ध केले गेलेले कदाचित बालांनीच लिहिलेले किंवा बालप्रवृत्तीच्या मोठ्या कवीने लिहिलेले गाणे, असे म्हणणे योग्य ठरेल.

मुलांविषयीच्या आपुलकीतून, कुतूहलातून आणि तळमळीतून अनेक कवींनी बालगीते रचली आहेत. काही हेतुपुरस्सर लिहिलेली बालगीतं आहेत तर काही बालगीतांत मोडणारी गीतेही आहेत. संत ज्ञानेश्वर माऊलींनी एक बोबडे गाणे लिहिले आहे. (बोबडी ओवी म्हणूया!) बालगीतांचा इतिहास-मराठीपुरता- इतका मागे जातो. ती बोबडी ओवी अशी आहे-

''काय थांगु तूतें बाई । काय थांगुं तूतें?।।
जात होते पानीया तेथे भेतला सावळा।
दोयवल तोपि मयुलपिछाची खांद्यावली कांबला।।
काय थांगुं.....।।१।।
धुलगें माझे फुतले मग मी ललत बैसलें।
कुनिकुन आला सालंगपानी मला पोतासी धलीले।।
काय थांगुं....।।२।।
मला पोतासी धलीलें सुख मोतें वाटले।
निवलुतीचे कलपेकलुनी ज्ञानदेवा लाधले।।
काय थांगुं...।।३।।

(शब्दार्थ - थांगु- सांगू. दोयवल - डोईवर. निवलुतीचे - निवृत्तीचे. कलपेकलुनी - कृपेकरून. सालंगपानी - शारंगपाणी - कृष्ण.)

आजच्या किंवा २०व्या शतकातील बालगीतांच्या संदर्भात सांगायचे झाले तर मराठीमध्ये विपुल बालगीते लिहिली गेली. कवी विनायक, कवी भा. रा. तांबे, कवी यशवंत, बालकवी ठोंबरे, बा. भ. बोरकर, माधव ज्युलियन, ना. गं. लिमये, केशवकुमार (आचार्य अत्रे), गोपीनाथ तळवळकर, वि. म. कुलकर्णी, ना. वा. टिळक, साने गुरूजी, इंदिरा संत, ग. दि. माडगूळकर, शांता शेळके, मंगेश पाडगावकर, ग. ह. पाटील, वसंत बापट अशा कितीतरी कवींचे अतिशय भरीव भरघोस योगदान आहे.

'शाळेस रोज जाताना। मज विघ्ने येती नाना।।' हे ना. गं. लिमये यांचे बालगीत खूप बोलके आहे. तर गोपीनाथ तळवळकर यांचे 'किती मौज दिसे ही पहा तरी। हे विमान फिरते अधांतरी।' हे गीत बालांच्या मनातील शंका व्यक्त करणारे आहे. कवी ग. ह. पाटील यांची 'देवा, तुझे किती। सुंदर आकाश' हे गीत आणि 'ही आवडते मज मनापासुनी शाळा' हे केशवकुमार यांचे गाणे मुलांना अगदी आपले वाटते. कवी अनिल (आत्माराम रावजी देशपांडे) यांची 'मला आवडते वाट वळणाची। दाट झाडीची, नागमोडीची' ही निसर्ग - मानवाचे नाते सांगणारी सुबोध कविता, तर 'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे' ही बालकवी ठोंबरे यांची कविता मुलांचे भावविश्व रेखाटते. 'आली दीपवाळी। गड्यांनो आली दीपवाळी रोज रोज शाळा पुरे तो आला कंटाळा' हे माधवानुज (डॉ. काशिनाथ हरी मोडक) यांचे गाणे सहज गुणगुणावे असे आहे. 'रंगरंगुल्या सानसानुल्या गवतफुला रे गवतफुला' हे इंदिरा संतांचे गाणे तसेच 'टपटप पडती अंगावरती प्राजक्ताची फुले' हे मंगेश

पाडगावकरांचे बालगीत त्यातील अनुप्रासामुळे आणि शब्दलालित्यामुळे ओठांवर सहजपणे रूंजी घालते. कवी वि. म. कुलकर्णींचे 'नवीन पाणी, झुळझुळवाणी। नव्या युगाची गाते गाणी' हे गाणे बालांना थोडासा विचारही करायला लावते. तर 'एकदा काय झाले, गणपतीचा मुकुट घालून उंदिरमामा आले' हे विंदा करंदीकरांचे बालगाणे त्यांची चमत्कृतीपूर्ण प्रसंगाने मुलांना आकर्षित करते. 'ऊठ ऊठ चिऊताई, सारीकडे उजाडले' ही कवी कुसुमाग्रजांची कविता अतिशय रसाळ व सुबोध आहे.

बालगीतांचा प्रवास तसा बराच मोठा आणि रंजक आहे. आजही अनेक कवी आवर्जुन बालांसाठी काव्यलेखन करत आहेत आणि काही संगीतकार त्यांना संगीतबद्ध करत आहेत. कवी सुधीर मोघे, शंकर वैद्य, लीलावती भागवत, डॉ. अरूणा ढेरे, डॉ. संगीता बर्वे, संजीवनी बोकील, रेणू पाचपोर, प्रा. इंद्रजित भालेराव, अंजली कुलकर्णी, फ. मु. शिंदे, सुखदा ऋषी, दत्ता हलसगीकर, डॉ. नीलिमा गुंडी, किशोर पाठक हे कवी निष्ठेने व सातत्याने अतिशय दर्जेदार बालकविता लिहित आहेत.

मुलांसाठी काव्य लिहिण्यासाठी एक विशिष्ट प्रकारची दृष्टी आणि प्रवृत्ती लागते. मुलांच्या निरागस भावविश्वात डोकावण्याची क्षमता लागते. मुलांशी मूल होऊन, त्यांचे विचार जाणून घेण्याचे कुतूहल आणि ते त्यांच्याच सोप्या शब्दांत मांडण्याचे कसबही आवश्यक ठरते. नुसते यमक जुळवले किंवा 'भरभर', 'गरगर' सारखे अनुप्रासयुक्त शब्द मांडले की बालगाणे झाले, असे मात्र नाही. बालगाणे लिहिण्यासाठी कवीचे मनही तसेच शोधक असायला हवे. कवीचीही ज्ञानेंद्रिये नवं काही जाणून घ्यायला उत्सुक हवीत आणि त्या अनुभवांना शब्दांत उतरण्याची अनिवार ओढही हवी. ह्या सगळ्याच गोष्टींच्या साफल्यपूर्ण सहयोगातून अतिशय सुंदर, सुलग-साजिरे, सुरेल आणि मनमोहक बालगीत घडते. ह्या बालगीतांतून मुलांच्या जाणिवा बहरून यायला हव्यात. आपलेच अनुभव शब्द सुरांतून गुंफल्यामुळे मुलांना ते बालगीत आपल्याच दुनियेचे प्रतिबिंब वाटायला हवे. सुदैवाने अशी नितांत सुंदर बालगीतं मराठीत लिहिली गेली आहेत, लिहिली जात आहेत. मराठी मुलांचे हे मोठे भाग्य आहे.

मराठी बालगीतांच्या प्रांतात काही संस्था, बाल-मासिके आणि वृत्तपत्रांच्या पुरवण्या आणि दिवाळी अंक यांचाही वाटा महत्त्वाचा आहे. 'आनंद', 'छावा', 'मुलांचे मासिक', 'टॉनिक', 'निर्मळ रानवारा' 'किशोर', 'कुमार' ही मासिके - दिवाळी अंक सातत्याने बालकविता प्रकाशित करतात. 'छात्र प्रबोधन', 'मामू', 'पालकनीती', 'जडणघडण', 'आपडी- थापडी' इत्यादी अंकांमधून अतिशय दर्जेदार बालकुमार, कविता प्रकाशित होते. 'बालभारती'सारखी सरकारी संस्थाही उत्तम बालकवितांचा अंतर्भाव पाठ्यपुस्तकात करत असते. डॉ. लीला दीक्षितांनी 'शतकातली बालकविता' हे पुस्तक संपादित केले आहे. तर 'आठवणीतील कविता'चे खंड रसिकांना माहीत आहेतच. वृत्तपत्रांच्या पुरवण्याही बालकवितांना स्थान देतात. या सर्वांचे योगदान मोलाचे आहे. असे असले तरी ही बालगीतं मुलांपर्यंत पोहोचत नाहीत. कारण वाचनसंस्कृती फारशी राहिलेली नाही. सिनेमा, टी.व्ही., केबलवरील विविध वाहिन्यांच्या गदारोळात जे जे कानावर व डोळ्यांवर पडेल ते ते मुले टिपत असतात. कविता किंवा गाणं वाचून, अनुभवून त्यांचा आनंद लुटण्याचे दिवस आता इतिहासजमा झाले आहेत. दृक-श्राव्य माध्यमांच्या धबडग्यात गरगर फिरून अनेक गोष्टींचा चोथा बाहेर चिरकाळ टिकणारं फारसं काही नसतं.

ह्या आजच्या पार्श्वभूमीवर गेल्या शतकाच्या मध्यावर व उत्तरार्धात घडलेली काही बालगीतं आजही चिरंतन आहेत. ज्या काळात रेडिओ आवर्जुन ऐकला जात होता आणि चित्रपटातही काही बालांचे विषय हाताळले जात होते, त्या काळात अतिशय सुरेल - श्रवणीय बालगीते तयार झाली. 'छान छान छान, मनीमाऊचे बाळ कसे गोरे गोरे पान' हे गाणं आम्ही रेडिओवर अतिशय उत्सुकतेने ऐकत असू. 'नाच रे मोरा', 'गोरी गोरी पान फुलासारखी छान' ही ग. दि. माडगूळकरांची बालगाणी सहज पाठ झाली होती. 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख' हे


।। श्री सोमेश्वर प्रसन्न ।।

**मे. संजय चिंतामण निम्हण**



**ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टर व सॅन्ड सप्लायर्स**

सर्वे नं. १०, सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे-८

दूरध्वनी : ०२०-२५८९९८१६

भ्रमणध्वनी : ९९२३०११३७७

**प्रोप्रा. राजेश निम्हण, संजय निम्हण**

गाणे ऐकून आजही त्या बिचाऱ्या कुरूप, वेड्या बदकाच्या पिलाची (अर्थात राजहंसाची) आठवण व्याकूळ करते. 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम' हे 'श्यामची आई' ह्या सिनेमातलं केशवकुमारां (आचार्य अत्रे) चं बालगीत आजही त्यातील गंमतीदार वास्तव्यामुळे आणि शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील शीतयुद्धातील धमाल उडवून देते. 'शेपटीवाल्या प्राण्यांची पूर्वी भरली सभा' आणि 'लबाड लांडगं ढ्वांग करतंय' ही प्राण्यांची गाणी माणसातील प्राणी आणि प्राण्यांतील माणुसकी दाखवतात. 'गंमाडी गंमत, जंमाडी जंमत?' करत मांजरीला इवलीशी पिलं झाली हे गोड गुपीत सांगणारं गोंडस गाणं मुलांना खूपच आनंद देत. 'खोडी माझी काढाल तर' हे शांताबाई शेळकेंचं गाणं, मुलांमधील बंडखोरी आणि अन्यायाला विरोध करण्याची धाडसीवृत्ती दाखवते तर 'अस्सावा सुंदर चॉकलेटचा बंगला' हे गोडगोड गाणे तोंडाला पाणी सुटेल असेच आहे. 'सांग सांग भोलानाथ', 'टपटप पडती अंगावरती प्राजक्ताची फुले' ही मंगेश पाडगावकरांची गाणी मनात रूंजी घालतात. इतिहासजमा झालेला भोलानाथ कवितेतून का होईना मुलांना भेटतो. 'रविवार माझ्या आवडीचा' ह्या गाण्यातून शाळेविषयीची नाराजी व्यक्त होऊन काहीसा नकारात्मक संदेश पोहोचतो. तर 'आई आणिक बाबा यातील कोण आवडे अधिक तुला' ह्या गाण्यातून आईला (स्त्रीला) गौण मानून बाबाला (पुरूषाला) श्रेष्ठ समजण्याची चुकीची दृष्टी मुलांना मिळू शकते. मुले अतिशय संवेदनशील असतात. त्यामुळे त्यांना जे द्यायचे ते सकारात्मक, सुंदर आणि उदात्त - मंगल असावे असे वाटते. म्हणूनच 'पाखरांची शाळा भरे पिंपळावरती' हे कवी ग. ह. पाटील यांचे धमाल गाणे असो की 'कोणास ठाऊक कसा पण शाळेत गेला ससा' हे चमत्कृतीपूर्ण गाणे असो, त्यातून निखळ आनंद लुटता येतो. 'झुकझुक झुकझुक अगीनगाडी' आता कालबाह्य झाली तरी रेल्वे आजही आहे आणि 'पळती झाडे' पाहण्यातली मजाही आज आहे. 'मामाच्या गावाला' जाण्याचे प्रसंग मात्र विरळ होत आहेत. कारण हल्ली एकुलते एक मूल असते. त्यामुळे ना मामा, ना काका, ना मावशी, ना आत्या! 'तुझ्या गळा माझ्या गळा गुंफू मोत्याच्या माळा' असे म्हणणारे बहीण -भाऊ सुद्धा फारसे दिसणार नाहीत. सख्खी भावंडे नसली तरी इतर भावंडे किंवा मित्र-मंडळी हेच आताच्या मुलांचे सखेसोबती ठरत आहेत. 'पुस्तक नंतर वाचा, आता खेळा नाचा, खेळा नाचा' हे पाडगावकरांचे गाणे काहीसे बंडखोर म्हणूनच मुलांना आपलेसे वाटते. 'चमचम निळं पाण्याचं तळं' (शांता शेळके) आणि 'हसरा नाचरा, जरासा लाजरा, श्रावण आला' (कवी कुसुमाग्रज) ही गाणी त्यातील नादमाधुर्यामुळे निसर्गाच्या जवळ नेतात. 'डराँव डराँव, का ओरडता उगाच राव' (कवी ग. ह. पाटील) आणि 'गुणी गुणी गोगलगाय, देवान् दिले पोटात पाय' (कवी विंदा करंदीकर) ही बाळगाणी निसर्गातील वास्तवाचे चित्रदर्शी वर्णन करतात. परिसरातील प्राणी-पक्षी-कीटक-फुले-पाने यांच्याविषयीचं सजग भान देणारी आणखीही बरीच गाणी मराठी बालकवितांमधून वेचता येतात. 'अस्वलाच्या केसात झाल्या उवा, काढायच्या कशा, सांगा बुवा' (कवी - वसंत बापट) आणि 'एका माकडाने टाकले दुकान' (कवी विंदा करंदीकर) अशा प्रकारची बालगीते मुलांचे प्राण्यांशी असलेले भावबंध तर स्पष्ट करतातच पण प्राण्यांच्या विशिष्ट सवयी, स्वभाव-वैशिष्ट्येही स्पष्ट करतात. पंचतंत्र कथांवर आधारित अशी ही बाळगाणी मुलांना शहाणंही करतात.

मुलांचा आणि देशभक्तीपर गाण्यांचाही गहिरा संबंध आहे. शाळेमध्ये विविध औचित्यपूर्ण प्रसंगी मुले जी देशभक्तीपर गाणी म्हणतात त्यामुळे त्यांच्या मनात चैतन्याचे स्फुलिंग चेतवले जाते. आपला देश, परंपरा, चालीरीती, सण, उत्सव यांचे ज्ञान आणि भान अशा गीतांतून होते. देशभक्ती, स्वार्थ, त्याग, निस्पृहता, सामाजिक जाणिवा या आदर्श मूल्यांची पेरणी ह्या गाण्यांतून होते. त्यामुळे रुढ अर्थाने ही बालगीतं नसली तरी मुलांच्या जडणघडणीत ही गाणी अतिशय मोलांची भूमिका पार पाडतात. 'हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे' तसेच 'वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्' तसेच 'सैनिक हो तुमच्यासाठी' ही कविवर्य ग. दि. माडगूळकरांची गाणी त्यादृष्टीने अतिशय प्रेरक ठरतात. 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो' तसेच 'मंगल मंगल त्रिवार वंदन' ही पूज्य साने गुरूजींच्या लेखणीतून उतरलेली गीतं मराठी शाळांमधून आणि मुलांच्या भावविश्वातून विहार करत असतात. 'जगी घुमवा रे, दुमदुमवा रे, भारत गौरव गान' आणि 'उत्तुंग आमुची उत्तरसीमा, इंच इंच लढवू' ही कविवर्य वसंत बापट यांची स्फूर्तीगीतं मुलांच्याच काय प्रौढांच्याही मनात चैतन्य निर्माण करतात. 'आओ बच्चों तुम्हे दिखाये झाँकी हिंदुस्थान की' आणि 'ऐ मेरे वतन के लोगों' तसेच 'मेरे देस की धरती, सोना उगले, उगले हिरे मोती' व 'ऐ वतन, ऐ वतन, तुझको मेरी कसम' अशी हिंदी फिल्मी व गैरफिल्मी गाणी सुद्धा मुलांचे संवेदनशील भावविश्व अधिक प्रगल्भ आणि समृद्ध करतात. 'लगान' ह्या सिनेमातील बहुतेक सर्व गाणी तसेच 'स्वदेस' ह्या चित्रपटातील काही गाणी सुद्धा स्फूर्तीदायी असून, विचारांची निगराणी करणारी आहेत. 'हम होंगे कामयाब', 'ज्योत से ज्योत जगाते चलो', 'इतनी शक्ती हमे देना दाता', 'ऐ मालिक तेरे बंदे हम', 'तू प्यार का सागर है, तेरे इक बूँद के प्यासे हम' यासारखी शाश्वत मूल्यं देणारी संस्कारक्षम गाणी मुलांच्या मनाला स्पर्शून जातात आणि त्यांच्या अंतरंगात सकारात्मक लहरी उठवतात. अशा प्रकारची गाणी गायली जाणं, ऐकली जाणं आणि त्यातील सूर-शब्दांची गोडी अनुभवून ती प्रत्यक्ष जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करणं ही एक

सुंदर प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया शालेय जीवनात आवर्जुन आणि अतिशय निष्ठेने घडायला हवी. गाणारी, नाचणारी मुलं खूप सुंदर दिसतात. जे बालपणी पेरलं जातं तेच प्रौढपणी उगवतं. त्यामुळे सकस पेरणी फार महत्त्वाची ठरते. बालगीतांची पेरणी ही बाळसंगोपनातील अतिशय मनोहर, साजिरी आणि सखोल कामगिरी आहे. आई-वडील आणि शिक्षकांनी मुलांना बालगीतांची ही सुरेल- सखोल शिदोरी आवश्य द्यायला हवी.


कुठलंही गाणं आपल्यापर्यंत पोहोचतं ते संगीताच्या माध्यमातून. शब्दांना सुरांचे पंख फुटले की, त्या शब्दांचं गाणं होतं. हे गाणं मग आपल्या मनाच्या आकाशात विहार करू लागतं. त्यामुळे ह्या सर्व प्रवासात संगीतकारांचं आणि गायकांचं योगदानही फार मोलाचं ठरतं. कवीने लिहिलेल्या शब्दांना स्वरसाज चढवल्यावर त्यातील सौंदर्य आरस्पानी होतं आणि ते जनमानसात - ओठाओठावर विराजमान होतं. आपले लाडके लेखक कै. पु. ल. देशपांडे यांनी 'देवबाप्पा' ह्या चित्रपटाची गाणी संगीतबद्ध केली. 'नाच रे मोरा' हे अजरामर गीत पु. लं.च्या सांगितिक प्रतिभेची झलकच सांगते. संगीतकार सी. रामचंद्र यांनीही काही बालगीतं केली आहेत. 'या टोपीखाली दडलंय काय' हे त्यांचेच गाणे आहे. संगीतकार कै. दत्ता डावजेकर उर्फ डी. डी. यांनी अतिशय सजगतेने काही बालगीत केली आहे. कवी कै. ग. ह. पाटील यांच्या बालगीतांची 'पाखरांची शाळा' ही ध्वनीफीत दत्ता डावजेकरांनीच संगीतबद्ध केली आहेत. ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांनी सुद्धा काही चिरस्मरणीय बालगीतं केली आहेत. संगीतकार आनंद मोडक यांनी 'कळत-नकळत' ह्या चित्रपटात 'नाकावरच्या रागाला औषध काय?' हे धमाल गाणे केले आहे. 'हासती मुले जिथे' ह्या ध्वनीफितीसाठीही यशवंत देव आणि आनंद मोडक यांनी संयुक्तपणे संगीत दिग्दर्शन केले आहे. याखेरीज पांडुरंग दीक्षित यांनी लीलावती भागवतांच्या बालगाण्यांना संगीतबद्ध करून 'घोडा चालालाय टप टप टप' ही ध्वनिफीत तयार केली आहे. संगीतकार नंदू होनप यांनी राणी वर्माकडून काही पारंपरिक बडबडगीतं गाऊन घेतली आहेत. हा परंपरेतील ठेवा त्यामुळे नव्या पिढीतील मुलांना खजिन्यासारखाच भासेल. त्यात 'लहान माझी बाहुली', 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या', 'करंगळी मरंगळी', 'आंबा पिकतो', 'माकडा माकडा हुप', 'अक्कण माती, चिक्कण माती' इत्यादी मजेदार धमाल गाणी आहेत. पुर्वीच्या काळी गायली जाणारी ही गाणी घरातील आजी -आई- आत्या - मावशी मुलांना शिकवत असे. हल्ली मात्र ही गाणी भूतकाळाच्या दरीत लुप्त होऊ घातलीत. ह्या गाण्यांना ऊर्जितावस्था आणण्याचं काम त्यामुळेच फार मोलाचं आहे.

संगीतकार म. ना. कुलकर्णी यांनी मुलांवरील प्रेमाखातर दोन ध्वनिफीती केल्या आहेत. 'मुलाफुलांची गाणी' आणि 'सायसाखरेची गाणी' ह्या त्यांच्या लोकप्रिय कॅसेटसमध्ये संगीता बर्वे, कवी मंगेश पाडगावकर, गंगाधर महांबरे आणि माझ्याही रचना आहेत. ह्या गाण्यांचे रंगमंचीय प्रयोग करून म. ना. कुलकर्णी नव्या गाण्यांची रूजवाई करण्याचे मोलाचे काम करत आहेत. आजचे आघाडीचे संगीतकार डॉ. सलील कुलकर्णींनी केलेली 'एकदा काय झाले' ही बालगीतांची ध्वनिफीतही मजेदार असून, त्यात कवी संदीप खरे यांच्या रचना आहेत. संगीतकार शरद करमरकर, अरविंद काडगावकर, अजय पराड, धनंजय खरवंडीकर इत्यादींनी बालगीते, स्फूर्तिगीते संगीतबद्ध केली आहेत. युवा संगीतकार अजय गाडगीळ याने माझ्या 'गाणी बारा महिन्यांची' ह्या पुस्तकातील बाल-कुमार गीते केली आहेत. त्यांचा 'गीतोत्सव' हा कार्यक्रम बाल-कुमारांमध्ये विशेष लोकप्रिय ठरला आहे. माधुरी पुरंदरे यांनीही कवी संदीप खरेंसह काही बालगाण्यासाठी काम केले आहे. डॉ. संगीता बर्वेंच्या लेखनातून तयार झालेल्या काही ऑडिओ-व्हिज्युअल सी. डी.ज बाजारात आल्या आहेत. तर नव्या बालगीतांचा ऑर्केस्ट्रा 'सुरेल स्वप्न' आश्लेषा महाजन आणि कंपनी यांनी रंगमंचावर आणला आहे. नव्या गाण्यांचे स्वागत चांगल्या प्रकारे होत आहे. नाविन्य, नव्या गायकांना स्थान, नव्या प्रतिभेचे धुमारे आणि नव्या संगीतकारांचे योगदान ह्यामुळे नवी बालगीत मुलांना आवडू लागली आहेत. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे 'गीतमंच बालगीते' ही ध्वनिफीत निर्माण केली आहे. 'सर्व शिक्षा अभियान'साठी ही गाणी महाराष्ट्रभरातील शाळांमधून गायली जातात. 'बालचित्रवाणी पुणे'तर्फे 'भारत गौरव गान' ही स्फूर्तिगीतांची ध्वनिफीत तयार करण्यात आली आहे. ह्या नव्या गाण्यांचा प्रचार आणि प्रसार होणे फार गरजेचे आहे. नावीन्याचा ध्यास सर्वांनाच असतो. मुलांना नवे काही गायला, अनुभवायला मिळणे हा त्यांचा हक्क आहे. पालक-शिक्षकांनी ह्या नव्या गाण्यांचा शोध जरूर घ्यायला हवा. आजकाल दूरचित्रवाणीच्या वेगवेगळ्या वाहिन्यांवर गाण्यांचे खूप-सारे कार्यक्रम चालू असतात. लहान गायक मंडळी आपली कला तिथे सादर करताना पाहून छान वाटते. काही सजग मुले नवी गाणी सादर करून सुखद धक्काही देतात. विविध प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध होत असल्याने बालगायकांना आपल्या कलेचे प्रदर्शन करण्याची संधी मिळत आहे. त्या संधीचे त्यांनी सोने करावे. स्वत: बरोबरच रसिकांनाही शब्द-सुरांनी श्रीमंत करावे.

संगीत ही श्रृति परंपरा आहे. संगीत गुरूंकडूनच शिकावे लागते. पुस्तक वाचून संगीताचे धडे गिरवता येत नाहीत. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला मिळणारी ही सुंदर देणगी आहे. त्यामुळे संगीत मुलांमध्ये त्यांच्या कोवळ्या संस्कारक्षम वयात रूजवले तर ते चिरस्मरणीय ठरते आणि आनंददायी सुद्धा! बालगीत हा त्याचा पाया आहे. तो पाया जेवढा पक्का आणि सखोल तेवढी त्यांची नंतरच्या काळातील परिणती सुंदर आणि सुस्वर!

- प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर
नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.
भ्रमणध्वनी : ९४२२२८९५८०

# खेळ हुंड्याचा
## (विनोदी एकांकिका)



बाजारात उत्तम किंमत मिळणाऱ्या बैलोबांनी हुंडा पद्धती चालूच ठेवली आहे. हुंड्याच्या लोभानं डोळ्यावर झापडं चढलेल्यांना विनोदी एकांकिकेच्या माध्यमातून 'चपराक' दिली आहे लेखक, कवी, प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर यांनी !

**-संपादक**

(शाहीर -सोंगाड्या आणि दोन सुरते (झिलकरी) स्टेजच्या मध्यभागी अर्धवर्तुळाकार उभे. पडदा वर जाताच गण सुरू होतो.)

***विघ्नेश्वरा श्रीगणराया***
***ज्ञानदाता नमितो माथा***
***हात जोडितो सत्वर या या***
***स्मरून हाकेला या यश द्याया***
***कन्या म्हणजे गळ्यात धोंडा***
***गळा कापितो म्हणून हुंडा***
***इहलोकीचे ऐसे चित्र***
***पहाया सभेस सत्वर या या***
***विघ्नेश्वर गणराया पडतो पाया***
***खेळ मांडिला यावे पहाया***

(सुरते विंगेत जातात. शाहीर रंगमंचावर फेऱ्या घालतो. विरूद्ध दिशेने सोंगाड्या येतो. दोघांची धडक. परस्परांना पाहून)

शाहीर : ''काय मित्रा.....''

सोंगाड्या : ''भित्रा? कोण भित्रा, मी?''

शाहीर : ''अरे मित्रा म्हणालो मी, भित्रा नाही.''

सोंगाड्या : ''आस व्हय.''

शाहीर : ''तर मित्रा, फार दिवसांनी गाठ पडली बघ.''
(सोंगाड्या खाली-वर, इकडे तिकडे बघू लागतो)
''अरे काय बघतोय?''

सोंगाड्या : ''नाही, तू म्हनलास गाठ पडली. कुठं पडली ते बघतो.''

शाहीर : ''अरे तशी गाठ नाही. भेट म्हणतोय मी.''

सोंगाड्या : ''मग आस सांग की सोप्या मराठीत.''

शाहीर : ''तर मित्रा, गण तर झाला. आता गौळण झाली पायजेल झक्कास. समोरची मंडळी गवळणींसाठी उत्सुक आहेत.''

सोंगाड्या : ''आसनारच, आसनारच. तेवढ्यासाठीच तर आपापली मंडळी घरी टाकून आलेत समदे. आन त्यांच बराबर हाय. गवळणींसाठी उत्सुक व्हनार नाही तर काय गवळ्यांसाठी व्हतील?''

शाहीर : ''अरे तसं नाही. बर जाऊ दे.''

सोंगाड्या : ''काय जाऊ देऊ?''

शाहीर : ''म्हणजे सोड की मित्रा''

सोंगाड्या : ''नालायक, फाजिल, बेशरम... खुशाल एवढ्या पब्लिकसमोर सांगतो सोड म्हणून.''

शाहीर : ''तो विषय सोडून दे असं म्हणालो मी. बर असं करू

या, गौळण सुरू करण्यापूर्वी खुशाली विचारून घेऊ मंडळींची.''

सोंगाड्या : ''तुझ्या मंडळीची की माझ्या?''

शाहीर : ''समोरच्या मंडळींची. म्हणजे लोकांची''

सोंगाड्या : ''हां, म्हणजे लोकांच्या मंडळींची. विचारा - विचारा.''

शाहीर : ''नमस्कार रसिक मंडळी।''

सोंगाड्या : ''रामराम सोशिक मंडळी''

शाहीर : ''अरे अरे म्हणतोस काय?''

सोंगाड्या : ''काय म्हनलो?''

शाहीर : ''मंडळी इतक्या रसिकतेने आपला खेळ बघायला आली म्हणून मी त्यांना रसिक म्हणालो. तर तू....''

सोंगाड्या : ''सोशिक म्हनलो (प्रेक्षकांना उद्देशून) आता तुम्हीच सांगा मंडळी काय वावगं बोललो? तुमच्यापैकी असा एक तरी माणूस हाय का जो सोशिक न्हायी? महागाई भडकली सोसताहे. गुंडगिरी दारात येऊन थडकली सोसताय. तुमचंच लोनी तुमच्याच टाळूवरून ओरबाडून खाणारे खाताहेत तरी सोसताय. भाषेवरून, जातीवरून, धर्मावरून कुठं कुठं दंगली होताहेत, बंद, दगडफेक, मोर्चे, घेराव, संप. असा संताप संताप व्हतोय पन काय नाय. लोक आपलं गुमान सोसताय. म्हणून सोशिक म्हनलो. काही चुकलं का?''

शाहीर : ''शहाणा आहेस.''

सोंगाड्या : ''व्हय तर. माझ्या व्हनाऱ्या बायकोचं पन हेच मत हाय.''

शाहीर : ''बरं हे बघ, आज आपण रसिकांना हुंड्याचा खेळ म्हणजेच हुंड्यावरील वगनाट्य दाखवणार आहोत.''

सोंगाड्या : ''दाखवा, दाखवा, त्यांना सवय झालीय. ह्या कानाने ऐकायची अन् त्या कानानं सोडायची.''

शाहीर : ''छे छे अरे समोर सगळी जंटलमन पब्लिक आहे. ते असं करणार नाहीत.

सोंगाड्या : ''तसं त्यांना ग म्हनता गनपती आन. म. म्हनता मारोती कळतो पन कळत तर वळत का न्हायी.''

शाहीर : ''असं कसं म्हणतो मित्रा?''

सोंगाड्या : ''तर काय हो. एवढं जर त्यांना कळतं तर हु म्हणजे हुंडा जो लई इपरीत हाय, घेताना कळतं का आपुन भाड घेतोय म्हणून''

शाहीर : (मारायला धावत) ''मुर्ख, बेअक्कल, काहीतरीच बोलतो.''

सोंगाड्या : ''काय गैर बोललो. तुकोबा रोखठोक बोलतात ते चालतं. आन आमी म्हनलं तर म्हने वावगं बोलता. तुम्हीच सांगा मंडळी काय वावगं बोललो का?''

शाहीर : ''मित्रा ही मंडळी त्यातली नाहीत.''

सोंगाड्या : ''अरेरे, ही मंडळी ह्यातली न्हाईत आन् त्यातली पन न्हाईत?''

शाहीर : ''म्हणजे नेमकं तुला काय म्हणायचय?''

सोंगाड्या : ''मला म्हनायचय, त्यातले न्हाईत म्हणजे मानसातले न्हाईत अन् बाईमानसातलेपन न्हाईत का?''

शाहीर : ''लेका काहीपण बरळू नकोस. अरे त्यातले नाहीत म्हणजे हुंडा वगैरे घेणाऱ्यातले नाहीत.''

सोंगाड्या : ''असं म्हनता, मग होऊन जाऊ द्या गौळण.''

शाहीर : ''पण एक अडचण आहे मित्रा.''

सोंगाड्या : ''कशाची अडचण?''

शाहीर : ''गवळणींची अडचण''

सोंगाड्या : ''गवळणींची कोनचीपन अडचन आसली तर मी हाय ना.''

शाहीर : ''कशाला?''

सोंगाड्या : ''सोडवायला, अडचन.... अडचन''

शाहीर : ''अरे बाबा, आजकाल गवळणी मथुरेच्या बाजाराला येत नाहीत.''

सोंगाड्या : ''का बुवा? आपल्या गावीच सहकारी दूधडेअरी टाकली की काय त्यांनी?''

शाहीर : ''तसं नाही रे. सध्या गवळणी संपावर आहेत.''

सोंगाड्या : ''गवळणी आणि संपावर? नक्कीच ह्यात कृष्णाचा हात असला पाहिजे.''

शाहीर : ''अरे कृष्णाचा हात कसा असेल? त्यात त्याचेच नुकसान नाही का? दूध-तूप, लोणीची मजा, वरून गवळणीकडून कर म्हणजे टॅक्स वसूल करण्याची मजा संपण्याच नुकसान आहे.''

सोंगाड्या : ''त्याचा न्हाई! मग एखाद्या कामगार पुढाऱ्याचा किंवा सोशलवर्करचा यात हात दिसतो. गवळनींचं म्हननं तरी काय?''

शाहीर : ''त्यांचं म्हणणं असं की नेहमी नेहमी आम्हीच काय म्हणून रोज मथुरेच्या बाजाराला जायचं? स्त्री-पुरुष

समतेचं हे युग आहे. स्त्रीवादी चळवळ जोरात आहे. शहरात सुशिक्षित मंडळीत पुरुषच आता बाजारात जातात.''

सोंगाड्या : (प्रेक्षकांना) ''काय मंडळी, हे खरं हाय का? आरारा, पुरुषाचा पार भाजीपालाच झाला म्हनायचा.''

शाहीर : ''असं म्हणून चालणार नाही मित्रा. खरोखरच हे समतेचं युग आहे. म्हणूनच गवळणींचा आग्रह आहे की यापुढे आमचे पुरुष म्हणजे गवळी हेच मथुरेच्या बाजाराला जातील.''

सोंगाड्या : ''आता आली का पंचाईत?''

शाहीर : ''कशी''

सोंगाड्या : ''मथुरेच्या बाजाराला गवळी जातील. त्यांना अडवणार कोन? किसनदेव? काही फायदा?''

शाहीर : ''फाजिलपणा करू नको. अरे आज नाक्यावर जकातकर घेता ना तसा कर प्रतिकात्मक रूपात किसनदेव घ्यायचा. फक्त तो गौळणीच्या अध्यात्मिक अर्थरूपात कर मागे. भावरूप - प्रेमरूप. जीवशीव एकात्मतारूप असा तो दिव्य प्रकार. तिथे लिंग वचन- पुरुष भेद कशाचा? पूर्वी गवळणींकडून कर घ्यायचा, आता गवळ्यांकडून घेईल. त्यात काय फरक?''

सोंगाड्या : ''काय फरक? बाई अन् बुवा सारखाच? आसल आसल. देवाला काय समदे सारखेच. मग येऊ द्या गवळ्यांना'' (शाहीर विंगेत जातो. सोंगाड्या बाजूला उभा राहतो. ३ गवळी डोक्यावर माठ ठेवल्याचा अभिनय करीत नाचत येतात.)

गवळी १ : ''ए, मावसा कुठं गेला रे?''

गवळी २ : ''(विंगेत पाहून) अरे एऽऽ मावशा...''

गवळी ३ : ''अरे चल की, बाजाराला उशीर होतोय.''

गवळी १ : ''चल की रे मावशा...'' (मावसा धोतराचा सोगा खांद्यावर टाकत धडपडत रंगमंचावर येतो)

गवळी २ : ''मावशा, उशिर का रे झाला?''

गवळी ३ : ''मावशी सोडत नसेल.''

मावसा : ''नाही, तिनं कवाच सोडलं.''

गवळी १ : ''गावदेवीला बोकड सोडतात तसा.''

गवळी २ : ''आरं मग उशिर का झाला?''

मावसा : ''सांगू?''

गवळी ३ : ''अरे सांग की लेका''

मावसा : ''मेव्हणी सोडत नव्हती''

गवळी १ : ''भले शाबास, मेव्हणी....''

मावसा : ''म्हनली, मथुरेत गुंडगिरी फार झाली. काही करता काही झालं तर ताई उघडी पडलच पडल पर माझं कसं व्हईल?''

गवळी २ : ''कसं व्हईल म्हणजे?''

मावसा : ''लगीन रे. यंदा पोर लग्नाला आलीय. आमच्या बिगर तिला कोन हाय.''

गवळी ३ : ''हात तिच्या, मी हायना येळप्रसंगी.''

मावसा : ''म्हणजे?''

गवळी ३ : ''म्हणजे येळप्रसंगी मदतीला रे. तू काय आन् मी काय, पोरीला आपल्या शिवाय कोन हाय.''

गवळी १ : ''गंमत बास झाली. चला चला. बाजाराला उशिर होईल.'' (सगळे घाईघाईने वळण घेऊन पुढे येतात.)

सोंगाड्या : ''इसस्टाप .... बसस्टाप..... एकदम फुल स्टाप..''

मावसा : ''कोन रे बाबा तू?''

सोंगाड्या : ''तोंड सांभाळून बोल. अजून लगीनसुदीक झालं नाही माझं आन खुशाल बाबा म्हणतोस? मी किसनदेवाचा नाकेकारकून... मिस्टर पेंडे. मराठीत मला पेंद्या म्हणतात. आन् तू रे कोन?''

मावसा : ''मी मावसा''

सोंगाड्या : ''मावसा? कुनाचा?''

मावसा : ''तुझ्या मावशीचा''

सोंगाड्या : ''तोंड आवर, तोंड आवर. म्हणे मावसा. तोंडावर पदर घे.''

मावसा : ''म्हणजे?''

सोंगाड्या : ''अरे हा, तुला पदर कुठून असणार म्हणा. मावशा, तोंडावर उपरनं घे.''

मावसा : ''कशाला?''

सोंगाड्या : ''समोरची पब्लिक पहातेय ना तुझ्या मुखचंद्राकडं''

गवळी २ : ''ओ पेंदोबा. या मावशाचं तोंड म्हणजे मुखचंद्र का? थोबाडाला मुखचंद्र म्हनतो, डोळेबिळे आलेत काय तुझे?''

सोंगाड्या : ''आरं येडया. इनोद तरी कळतो का तुला? याच्या थोबाड्यावरचे हे खाचखळगे, देवीचे वण पाहून मी मुद्दाम मुखचंद्र म्हनलो. उगाच पब्लिकला हे चंद्रग्रहण दिसाया नको.''

मावसा : ''काय चेष्टा करता राव अडलेल्या गवळ्यांची''

सोंगाड्या : ''आता घ्या - आडलेली

बाई म्हाईत हाय बुवा आपल्याला. तू रे कशापायी आडला?''

गवळी ३ : ''जाऊ द्या की आम्हाला. उशिर होतोय बाजाराला.''

सोंगाड्या : ''न्हाई जाऊ देणार''

गवळी ३ : ''आता तुमच्या म्होरं काही म्हणून काय उपेग म्हना. खरच सांगा तुम्ही बापेच हात ना, का टॅक्स चुकवण्यासाठी पुरूषाचं सोंग घेतलेल्या गवळनी हात. काय भरोसा न्हाई. आजकाल बाई का बुवा हे लवकर वळीखता येत न्हाई.''

मावसा : ''आनखी काही तपासनी राहिली असल तर ती बी घ्या करून''

गवळी ३ : ''इतक्या येळात तर कस्टमवाल्यांनी पन दिलं असतं सोडून''

सोंगाड्या : ''ए गवळीच्या, कस्टमची सिस्टम दावू नको. काय रे बायामानसांना बाजाराला पाठवायचं सोडून तुम्ही का आलात? आमच्या किसनदेवाची झाली का पंचाईत.''

गवळी १ : ''कर्म आमचं दुसरं काय. लगीन केलं तेव्हा हुंडा घेतला. जास्त न्हाई फकस्त दोन म्हशी. आता आमची ही....''

सोंगाड्या : ''म्हैस का?''

गवळी १ : ''नाही. बायको. म्हनते कशी. कायदा बदलला आता. हुंडा घेता काय. आता हुंड्यातल्या म्हशीचं सर्व तुम्हीच करा.''

सोंगाड्या : ''सर्व म्हनजे?''

गवळी १ : ''शेण-गोठा-चारा-पाणी-दुधाची इक्री हे सर्वहो.''

(सोंगाड्या त्याच्या माठात पाहण्याचा अभिनय करीत)

सोंगाड्या : ''काय आहे रे ह्यात?''

गवळी १ : ''दूध''

सोंगाड्या : ''फॅट काढलेलं दिसतय. म्हैस भरपूर दूध देती ना?''

गवळी १ : ''हुंडयाची कृपा हाय.''


सोंगाड्या : ''चला एकेक जन माल दाखवा. आन टॅक्स द्या. सद्या किसनदेव सरकारी दौऱ्यावर गेले आहेत. मीच हाफिस इनचार्ज हाय.''


गवळी २ : ''सद्या दूधाचा धंदा मंदा हाये. अजून पैची इक्री न्हाई. टॅक्स कसा देनार?''

गवळी ३ : ''आमच्या बायका म्हनायच्या तसं आम्ही गानं म्हटलं तर चालंल का?''

गवळी १ : ''म्हणाल तसं गानं म्हनू. रागात पाहिजे तर रागात


PROJECTS & SYSTEM ENGINEERS





■ PLENUM CHAMBER ■ DRIED TRAY ■ SUGARAT85C71.2%M ■ EXHAUST HOOD■ HEAT EXCHANGER ■ BLOWER ■ I.D. FAN ■ SUGAR AT 65° C/0.08% M ■ AIR-SUGAR DUST ■ SCRUBBER SYSTEM ■ SUGAR 42° C/0.03%M

**OUR OTHER PRODUCTS INCLUDE :** HEAVY DUTY HOPPERS, DUST COLLECTION SYSTEMS, BELT CONVEYORS, SUGAR ELEVATORS, CHILLER UNITS, AIR FILTERS, SUGAR SILOS, INDUSTRIAL BLOWERS, HEAT EXCHANGERS, & WATER COOLERS, BAG FILTERS, CYCLONES, PRESSURE VESSELS & many more...

SERVING THE SUGAR INDUSTRY FOR OVER
18 YEARS
With over 110 installations sucessfully running in India & abroad and a range of capacities from 5 TPH to 50TPH and a capability to handle all grades of sugar crystals

SALIENT FEATURES OF THE FBDC

| | | |
|---|---|---|
| Assures Sugar @ 0.04% moisture & 40 deg C temperature | Capable of handling Raw, Refined & white plantation sugar | Baggable sugar at the outlet, Drying & cooling in a 12m span |
| Dust free sugar in bags 99.5% dust recovery | | High Efficiency blowers ensure min. power consumption |
| Can conveniently handle any crystal size (300 - 1200 microns) | | ICUMSA index is lower than any Conventional Dryer |
| Sugar Crystal have superior luster & whiteness | Capable of handling high moisture sugar (0.8% -1.0%) | Minimal breakage of sugar crystal due to gentle treatment |

PASE

Address: 1 Anant Niwas, Lane no.10, Dahanukar Colony, Kothrud, Pune - 411038
Phone:+9120-32922739 | Fax: +9120-25396507 Cell: +919371051829 OR +919850188389,
email: pasefbdc@gmail.com | url: www.paseindia.com

म्हनू, वांझोट्या रागात म्हनू की झिंजोटया रागात म्हनू बोला, कसं?''

सोंगाड्या : ''काही म्हनू नको. न्हाईतर माझा ए टू झेड राग तुझ्यावरच काढीन. गवळयाचं गानं तेही रागात? म्हनजे आधीच श्रावणी त्यात तीर्थ म्हनून वरून गोमित्रच घेन्यावानी.''

गवळी २ : ''नाही नाही. मी लई बेस्ट गानं म्हनतो बघा. ऐका''-

***'वरून कीर्तन आतून तमाशा***
***वरून सोज्वळ अजून वळवळ***
***अशी माणसं विपरीत केवळ***
***कृती-उक्तीचा नाहीच मेळ***
***भले-भले ही येता येळ***
***हुंड्यासाठी टाकती गळ***
***देवा, ऐसी लावा कळ***
***हुंड्या विरोधी वाढीव बळ'***

सोंगाड्या : ''लई बेस. जा सर्वांना टॅक्स माफ''

(सगळे जातात. शाहीर रंगमंचावर येतो)

शाहीर : (वगाची लावणी म्हणतो)

***शहर अमरावती,***
***नार गरतीची राहत होती.***
***लेक तिची न्हाती धुती,***
***केस भुरभुरती वाऱ्यावरती,***
***राहिना पदर थाऱ्यावरती,***
***अशी नवतीची पहा भरती,***
***ओढ सासरची,***
***सख्याच्या घरची लागली तिला,***
***आले पाहुणे, झाले पाहणे,***
***बहु चिडवणे सखींचे तिला,***
***जाहलं लगीन***
***दैवानं ठेवलं काय मांडून,***
***घडल्या सत्यकथेला,***
***ऐका चित्त देऊन***
***जीऽ जी, जी रं र र दाजी.***

(शाहीर जातो. राधा तांदळाचं ताट घेऊन रंगमंचाच्या मध्यभागी येऊन निसत बसते. ती नुकतेच लग्न होऊन या घरात आलेली सून आहे. मागून बयाबाई तरातरा पदर कमरेला खोचत प्रवेश करते)

बयाबाई : ''मी म्हणते जनाची नसली तरी निदान मनाची काही लाज? अगदीच भीकेचे डोहाळे मेले. लग्नाच्या वेळी विहिणबाई मोठ्या तोऱ्यात म्हणाल्या होत्या, 'मला काय दहा पोरी आहेत, जावईबापूंचे सर्व करीन हो' केलं ना पहिल्याच दिवाळसणाला. रंगपंचमी सारखा गेला आणि शिमगा करीत असाच परत आला. निदान लग्नाच्या वेळी कबूल केलेले पन्नास हजार रूपये तरी द्यायचे? तरी मी त्याला म्हणत होते, कृष्णा बाबारे, एकवेळ पावसाचा भरोसा धरावा पण सासू-सासऱ्याचा भरोसा धरू नये हो।''

राधा : ''पण आत्याबाई, आईनं आधीच सांगितलं होतं की यावर्षी अडचण आहे. दिवाळसण जमणार नाही. बाबाचं जीवावरचं दुखणं गेलं. होतं नव्हतं सगळं ऑपरेशन - औषधपाण्यात खर्च झाले. त्यामुळं हुंड्याची कबूल केलेली - खरं म्हणजे कबूल करवून घेतलेली रक्कमही ते देऊ शकत नाहीत.

बयाबाई : ''तुझं बरोबर आहे ग. इतके हात टेकून उठले होते तर मग केलच कशाला लग्न? आणि तू तरी उतावळी नवरी गुडघ्याला बाशिंग. आपल्या आई-वडिलांची ऐपत पाहूनच मुलगा पसंत करायला हवा होता. माझा कृष्णा काही वाटेवर पडला नव्हता आणि का ग, माहेरच्या वतीने तूच नन्नाचा पाढा कशाला वाचतेय? अडचण कुणाला नसते. आमचे हे आता असते तर त्यांचीच साक्ष काढली असती. हुंड्याची सर्व रक्कम बोहल्यावर चढण्यापूर्वीच दिली होती माझ्या वडिलांनी शिवाय पहिल्या दिवाळसणाला स्कूटर.''

राधा : ''अहो पण तुमच्या वडिलांनी तर त्यांच्या सासऱ्याकडून फियाट घेतली होती म्हणे. तुमच्या मातोश्रीच सांगत होत्या.''

बयाबाई : ''बरोबरच आहे. घ्यायला नको?''

राधा : ''एका पिढीत ही परंपरा मोडली तर नाही का चालणार?''

बयाबाई : ''शहाणीच आहेस. कंबर मोडून काम करता येत नाही. आणि चालली परंपरा मोडायला. आधीच मेल्या चांगल्या परंपरा नाहीशा होताहेत. सगळाच उठवळपणा मेला. संस्कृतीची -रीतीभातीची चाड म्हणून राहिलीच नाही. म्हणे परंपरा मोडली तर नाही का चालणार?''

(दारावर बेल वाजते. राधा जाऊ लागते.)

''थांब, तू आपलं काम कर. कामचुकार मेली. सकाळपासून एकच काम

धरून बसते.''
(बयाबाई जाऊन दार उघडते. कृष्णा येतो)
''आलास बाबा. पैशाची काही व्यवस्था झाली का?''

कृष्णा : ''नाही. मित्रांकडे मागून पाहिलेत पण सगळे म्हणताहेत, हुंड्याचे एवढे पैसे घेतले काय केले?''

बयाबाई : ''हंड्यात पुरून ठेवलेत म्हणावं. चहाटळ मेले. कर्म आपलं. चांगली हाता तोंडाशी आलेली नोकरी. ५० हजार रुपयांचा जामीन दिला नाही तर घरीच बसायचास. पैशांची व्यवस्था व्हावी म्हणून लग्न केलं तर हे असं। फसले रे बाबा...।''
(सुदाम येतो)

सुदाम : ''फसले रे नंदलाला.... फसले रे नंदलाला. काय मित्रा कृष्णा, हाऊ इज लाईफ. कुठं कुठं जायाचं हनीमुनला?''

कृष्णा : ''करा थट्टा''

सुदाम : ''बरी नव्हे ही थट्टा. लागेल अशानं बट्टा''

कृष्णा : ''तू पन्नास हजार रूपयांची काही व्यवस्था करू शकतो का रे?''

सुदाम : ''फक्त पन्नास हजार? दोन महिने थांब. माझी लॉटरी लागली की देतोच.''

राधा : ''म्हंजी काय भाऊजी?''

सुदाम : ''नाही कळलं? अहो वहिनी अस्मादिकाचं लग्न ठरतयं. थोडं अडलयं. मनासारखा हुंड्याचा आकडा मिळत नाहीय आमच्या तीर्थरूपांना. मी माझ्या वतीने त्यांना फूल गॅरंटी दिलीय. म्हटलं बैल उमदा आहे. विकाऊ आहे. टिकावू आहे. बाप नावाच्या मालकाच्या आज्ञा पाळणारा आहे. बाजारात उत्तम किंमत मिळायला काहीच हरकत नाही.''

बयाबाई : ''काहीतरीच काय रे बोलतोस? चांगला शिकला सवरला आहेस. बापाचा एकुलता एक लेक. मुलीच्या बापाने दिलाच पाहिजे हवा तेवढा हुंडा.''

सुदाम : ''म्हणून तर आमच्या तीर्थरूपांनी बोलावलाय आमच्यासाठी मुलींचा तांडा. हुंड्याची रक्कम नोकरी ठरवता यावी म्हणून कॅल्क्युलेटरच घेऊन बसलेत.''

बयाबाई : ''विनोद पुरे. मुलाला एवढं शिकवावं, मिळवता करावा आणि दुसऱ्याच मुलीच्या स्वाधीन करावा. त्याबद्दल फुल ना फुलाची पाकळी म्हणून मुलीकडच्यांनी काही द्यायला नको?''

राधा : ''अहो पाकळीचं काय आख्खं फुलच घ्या. पण काही आख्खं झाडच लाटायला पाहतात ना.''

बयाबाई : ''सुनेनं अलंकारीक अन् उपरोधानं बोलण्याची प्रथा नाही हो आमच्या घराण्यात.''

राधा : ''कशी असणार? लग्नात घातलेले अलंकारही गृहप्रवेश करताच ज्या घरात काढून घेतले जातात तिथं अलंकारीक बोलण्याचा हक्क तरी कसा शिल्लक ठेवणार?''

कृष्णा : ''थोबाड चालवतेस? चालती हो आत.'' (राधा रागारागाने विंगेत जाते)

सुदाम : ''बापरे पुन्हा कुरूक्षेत्र । कृष्णाची भूमिका तेवढी बदलली.''

कृष्णा : ''सुद्या, तुला नाही कळत ह्या बायका म्हणजे.....''

बयाबाई : ''मोठ्या बेरकी असतात रे बाबा. नावारूपाला भाळून मोठ्या हौसेनं लग्न केलं तर....''

कृष्णा : ''आई, बडबड बंद कर बघू. थोडा निवांतपणा लाभू दे. घरी-दारी सारखा डोक्याला ताण. आठ दिवसात पैसे मिळाले नाहीत तर हातची नोकरी जाईल.''

बयाबाई : ''मी म्हणते, तुझ्या सासऱ्याकडूनच का नाही मागत पैसे? तुझ्या हक्काचेच आहेत ते.''

सुदाम : ''अरे माग - माग. एक बेकार, लाचार नवरदेवको छोकरीके नामपे ५०,००० दे दे. दे दे नवरीके बाबा हुंडेके नामपे दे दे. देव तुझं भलं करील.''

बयाबाई : ''चहाटळ मेला. जाते मी. पाहते राणीसाहेबांचं आत काय चाललय ते.'' (जाते)

कृष्णा : ''सुद्या, कर टिंगल. पण घोडा मैदान जवळ आहे. तुझ्या लग्नात तू क्रांतीकारी बंडाचे काय दिवे लावतोस ते दिसेलच. म्हणे हुंडा घेणं चूक आहे!''

सुदाम : ''अरे पहाच तू. कालच मी आमच्या तीर्थरूपांना लौकीकाची वेसण घालून मला बाजारात उभे करू नका. माझ्या एका मित्राने घोड्यावर बसताना गाढवपणा केला. हुंडा न

घेण्याचा शहाणपणा तुम्ही दाखवला नाही तर हा सुदामा आजन्म ब्रह्मचारी राहील.''

कृष्णा : ''काहीतरीच काय बोलतोस?''

सुदाम : ''सॉरी मित्रा, सुदामाला या कलीयुगात कृष्णाचा मित्र म्हणवून घ्यायला लाज वाटते. वहिनींचा तुझ्या आईने चालवलेला छळ फार भयंकर आहे.''

कृष्णा : ''अरे पण मी काय करू?''

सुदामा : ''मातृभक्तीची बासरी वाजव. मी चाललोय पितृभक्तीचा म्हणजे त्यांच्या हुंडासक्तीचा ढोल बडवायला. आज गोंधळ आणि जागरण एकदमच करावं लागणार असं दिसतयं. बंडाचा झेंडा उभारल्याशिवाय आता हुंड्याचा प्लेग संपणार नाही.''

कृष्णा : ''तुला काय वाटतं मित्रा, मला हे सर्व पटत नाही? हुंडा मलाही नकोच होता. पण वडिलांच्या मृत्युनंतर आईनंच सगळं केलं. वडील अकालीच वारल्यामुळं तिची मानसिकताही बिघडली. राधाशी तिचं वागणं अनेकदा मलाही आवडत नाही. पण इच्छा असूनही मी तिला बोलू शकत नाही. राधाचं म्हणणं पुष्कळदा खरं असूनही मी राधालाच दोष देतो. तुच सांग करणार काय?''

सुदाम : ''सांगितलं तर करशील?''

कृष्णा : ''काय?''

सुदाम : ''एक कौटुंबीक मेलोड्रामा करायचा.''

कृष्णा : ''म्हणजे काय?''

सुदाम : ''राधा वहिनींनी तुझ्या आईच्या छळाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असं भासवायचं.''

कृष्णा : ''बापरे। ते कसं शक्य आहे?''

सुदाम : ''सगळं शक्य आहे. सर सलामत तो आयडिया पचास. माझा एक मित्र आहे. सामाजिक कार्यकर्ता वगैरे आहे. कुठल्याशा हुंडाविरोधी मंडळाचा अध्यक्ष आहे. त्याच्या मंडळातील कार्यकर्त्यांची मदत घेऊ आणि एक फर्मास फार्स घडवून आणू.''

कृष्णा : ''यातून काही भलतच...''

सुदाम : ''काहीही होत नाही. गोळी योग्य जागी बसली की सर्व खुलासा करू.''

कृष्णा : ''पण राधा या नाटकाला तयार होईल का?''

सुदाम : ''नो प्रॉब्लेम. आपण त्यांना या नाटकात घ्यायचेच नाही.''

कृष्णा : ''म्हणजे काय?''

सुदाम : ''माझा तो मित्र आहे ना, मोठा बहुरूपी कलाकार आहे. त्यालाच आपण तेवढ्यापुरतं राधा बनवू.''

कृष्णा : ''काहीतरीच काय? आईने ओळखलं तर?''

सुदाम : ''ते शक्य नाही. तुझ्या आईला फक्त नोटा ओळखता येतात. माणसं नाही. तू काळजी करू नको. चल, वहिनींना बोलाव बरं.''

कृष्णा : ''का? तिला तर....''

सुदाम : ''तू बोलाव तर. आपल्या नाटकातील अनावश्यक पात्रांची काहीतरी व्यवस्था केलीच पाहिजे ना.''

कृष्णा : ''राधा... ए राधा...'' (राधा येते)

सुदाम : ''सॉरी वहिनी, खरं तर मघाशीच मी तो तातडीचा निरोप द्यायला हवा होता.''

राधा : ''कोणता निरोप भावोजी?''

सुदाम : ''तसं काही सीरीयस नाही पण तुम्ही भेटून यावं हे बरं.''

राधा : ''भेटून यावं? कुणाला?''

सुदाम : ''तुमच्या वडिलांना. सकाळी भाजी आणायला म्हणून तिकडे गेलो होतो. म्हटलं जाता जाता आप्पांच्या तब्यतेची विचारपूस करावी. सहज डोकावलो तर...''

राधा : ''तर काय? काय झालं पुन्हा आप्पांना?''

सुदाम : ''तसं काही गंभीर नाही. तब्येत थोडी बरी नाही. राधाला पाठवून द्या असा निरोप आहे त्यांचा.''

कृष्णा : ''राधा, तू लगेच नीघ बरे. मीही येतोच नंतर.''

राधा : ''पण आत्याबाईंना....''

कृष्णा : ''त्याची काळजी नको. मी सांगतो आईला. तू नीघ बरं लवकर'' (राधा घाईघाईने जाते)

सुदाम : ''गावात सासुरवाडी असली की असा फायदा होतो.''

कृष्णा : ''बरं बरं. आता काय करायचं सूत्रधार महाराज?''

सुदाम : ''सांगतो? तसं सगळं आधीच रेडी करून ठेवलय मी. आता तुला खरं सांगतो मित्रा. या लोकनाट्याची मी आधीच तयारी करून ठेवली होती. गरज पडली असती तर तुला सुद्धा अनावश्यक

पात्र केलं असतं पण तू तयार झालास. आता नाटक नक्कीच यशस्वी होणार बघ.''

कृष्णा : ''छान, म्हणजे नायिका नाही तर नाही नायकाशिवायही तुम्ही प्रयोग रंगवणार होता तर.''

सुदाम : ''बरं ते जाऊ दे. हाताशी वेळ फार थोडा आहे. माझा तो मित्र कोपऱ्यावर थांबलाय. बाकीच्या पात्रांचेही प्रवेश ठरलेले आहेत. तुझ्या मातोश्री काय करताहेत आत?''

कृष्णा : ''देवळात जायची तयारी.''

सुदाम : ''व्हेरी गुड. त्या देवळात गेल्या की मी येतोच'' (सुदाम जातो. बयाबाई येतात. हातात पुजेचं साहित्य)

बयाबाई : ''काय मेल्या हल्लीच्या सुना। आमच्या काळी १०-१२ पोरांचं सगळं सगळं करून, १५-२० माणसांचा स्वयंपाक, धुणं, भांडी सगळं करीत हो. हिला मेलीला धुणं धुवायला सांगितलं तर म्हणते कशी, धुणंभांड्याला बाई नाही का मिळणार? खायला काळ अन् भुईला भार मेली.''

कृष्णा : ''कुठं निघालीस आई?''

बयाबाई : ''देवळात जाऊन येते बाबा. महाराणीला म्हणावं सांगितलेली कामं नीट करून ठेव. मी आलेच (बयाबाई जाते)''

कृष्णा : ''नावात काय आहे असं म्हणतात. खरंच एक तो कृष्ण होता ज्याच्या हाती महाभारताची सर्व सूत्रं होती. इथं? आमच्या घरात जे काही महाभारत घडणार आहे त्यात हा नावाचा कृष्ण कळसूत्री बाहुल्याप्रमाणे ठरतोय. बघू या आमचे आधुनिक सूत्रधार सुदामा काय करतात ते'' (सुदाम आणि सामाजिक कार्यकर्ता घाईघाईने येतात. कार्यकर्त्यांने साडी गुंडाळलेली आहे.)

सुदाम : ''ही टेंपररी राधावहिनी. म्हणजे खरा दिवाकर बापट. तर दिव्या. तुला सांगितलं तसं करायचं.''

कृष्णा : ''म्हणजे काय करणार हा, म्हणजे ही?''

सुदाम : ''आत्महत्येचा प्रयत्न. म्हणजे खोटाच. दिव्या गोळ्यांची बाटली कुठय?''

दिवाकर : ''ही घे. पण सुद्या, यातनं खरच काही भलतीच भानगड नाही ना होणार?''


## तरुण-तरुणींच्या गळ्यामधला ताईत चोरून वाचण्यासाठी बुढ्ढेमियाँ घाईत...

**विविध वयोगटातील वाचकांना आकर्षून घेणारे, त्यांना नवी आशा, नवी दिशा, नवे स्वप्न देणारे खट्याळ, खेळकर, खवचट मासिक...**

- ☐ चतुरस्त्र
- ☐ परखड
- ☐ सडेतोड
- ☐ कर्तव्यदक्ष

साहित्य चपराक

- अनेक विषयांवरचा चटपटीत मजकूर
- अनुरुप चित्रे, छायाचित्रे, व्यंगचित्रे
- उत्तम कागद, उत्कृष्ट छपाई
- वाजवी किंमत आणि 'जरा हटके' संपादनाची दुर्मिळ हिंमत

संपादक : घनश्याम पाटील

(सलाम आलेकूम!)

सुदाम : ''काहीही होत नाही. मी आहे ना. तू घाबरतोस कशाला? चल आटप लवकर. तू इथं असं बेशुद्धावस्थेत पडायचं. ही बाटली इथ अशी ठेव आणि झोपेचं सोंग घे. पण नेहमीसारखा खरोखर झोपू नको बरं का? नाहीतर लागशील घोरायला. हलायचं नाही. चल कृष्णा, तुझ्या मातोश्री येतीलच आता.'' (दोघे जातात. दिवाकर झोपेचं सोंग घेतो. बयाबाई येते)

बयाबाई : ''हे काय? कामं आटपायला सांगितलस तर चक्क बैठकीतच झोपल्या बाईसाहेब. हद्द झाली ग बाई. अहो महाराणी, उठा'' (उठवण्यासाठी जवळ जाऊ लागते. इतक्यात एक पोलीस व एक डॉक्टर दोघं धीरगंभीर चेहरा करीत येतात.)

डॉक्टर : ''फोनवरून कळलेल्या पत्त्याप्रमाणे हेच ते घर दिसते.''

पोलीस : ''तुम्ही राधाबाईंच्या सासू का?''

बयाबाई : ''मग तुम्हाला काय मीच राधा वाटते? आणि कोण तुम्ही? अन् आमच्या घरात कसे?''

पोलीस : ''कोण आम्ही? आम्ही कोण? कोण बरं आम्ही?''

डॉक्टर : ''हं हे पोलीस आणि मी.. मी..''

पोलीस : ''हे डॉक्टर''

बयाबाई : ''ते दिसतय हो मला. पण इथं कशाला आलात?''

पोलीस : ''कशाला म्हणजे? प... प.... पंचनामा करायला''

डॉक्टर : ''अहो पण आधी बॉडी तपासायला नको का?''

पोलीस : ''पंचनामा केल्याशिवाय बॉडीला हात लावायचा नाही हं डॉक्टर, सांगून ठेवतो आधीच.''

डॉक्टर : ''कमाल आहे तुमची. अहो केस दगावली की जिवंत आहे हे न पाहताच पंचनामा?''

पोलीस : ''आम्ही पंचनामा सुरू केला की केस जिवंत असली तरी आपोआप दगावते.''

बयाबाई : ''अहो मघापासनं काय बडबडताय तुम्ही? कुठली केस. कुणाची बॉडी? कसला पंचनामा? काय झालय काय सुनबाईला पाहू'' (राधाजवळ जाऊ लागते)

पोलीस : ''खबरदार - दूर व्हा. हात लावू नका. म्हणजे इथं काय भानगड झाली, काय भयंकर प्रकार घडला तुम्हाला माहीत नाही? प्रत्येक गुन्हेगार गुन्हा करून वर असाच साळसूदपणा करतो. पण कलम एक्स...वाय...झेड... पोट कलम ४२० प्रमाणे हा फार सीरीयस गुन्हा आहे.''

डॉक्टर : ''हो ना, सासूनं सुनेचा अमानुष छळ करून आत्महत्येस प्रवृत्त करणं म्हणजे...''

पोलीस : ''एक प्रकारचा मर्डरचा मर्डर म्हणजे काय गंमत समजता?''

डॉक्टर : ''हो ना. काय गंमत समजता? दूर व्हा. मला आधी केस पाहू द्या'' (जवळ जाऊ लागतो.)

पोलीस : ''डॉक्टर, केसाला हात लावायचा नाही.

डॉक्टर : ''अहो हात न लावता केस हाती येण्यासारखी आहे की नाही हे कसं कळणार?''

पोलीस : ''काही कळायची गरज नाही. सगळं हाताबाहेर गेलंय आता. मला करू द्या आधी पंचनामा मग वारन्ट. मग अटक, मग तुरूंग. ह्या बाईला सक्तमजुरीच ठोकतो.''

बयाबाई : ''मी... मला... मी काय केलय हो?''

पोलीस : ''काय केलं? काय केलं बरं?''

डॉक्टर : ''छळ.... छळ.... पाशवी छळ!''

पोलीस : ''हो. मयत स्त्रीचा छळ केलाय तुम्ही.''

डॉक्टर : ''मयत स्त्रीचा. तेवढं मात्र मला मान्य नाही. अद्याप मी डेथ सर्टिफिकेट दिलेलं नाही.''

बयाबाई : ''अहो पण ती मरेल कशी? मेलीला साधं झुरळ मारता येत नाही.''

डॉक्टर : ''मग तुम्ही मारत असाल, झुरळ?''

बयाबाई : ''पुरे झाली बाष्फळ बडबड. कोण कुठले आलात. छळ काय, आत्महत्या काय. मला तर काहीच कळत नाहीये.''

डॉक्टर : ''कळेल कळेल. हातात बेड्या पडल्या की सर्व कळेल.

पोलीस : ''ए बया.''

बयाबाई : ''तोंड सांभाळून बोला. माझं नाव बया नाही. चांगलं बयाबाई आहे.''

डॉक्टर : ''अहो बाई.''

बयाबाई : ''पुन्हा तेच. सांगितलं ना

माझं नाव बया किंवा बाई नाही. बयाबाई आहे म्हणून''

पोलीस : ''तेच हो. काय बला आहे बुवा. डिक्टो आमच्या सासूबाईंची कॉपी. आमच्या सासूबाईसुद्धा...''

डॉक्टर : ''अहो पोलीसराव, तुमच्या सासूबाईचं सोडा. या केसचं काय करायचं?''

पोलीस : ''दाबून टाकायची का?''

डॉक्टर : ''म्हणजे?''

पोलीस : ''नाही म्हणजे या बयाबाईची इच्छा असेल तर आपसात मिटवून टाकू. नाहीतर आहेच आपला पंचनामा, वॉरंट, अटक, सक्तमजुरी...''

डॉक्टर : ''हो ना. मग पेपरला फोटो. नाव आणि पत्त्यासकट हातात हातकड्या. हुंड्यासाठी सुनेचा अघोरी बळी. सासूला सक्तमजुरी. नाही तर फाशीसुद्धा.

बयाबाई : ''नको... नको... अहो असं काय करता. असं कसं झालं बाई, काय भलतच करून बसली ही पोरगी. अहो काहीतरी यातून मार्ग काढा हो. एकदा बघा तरी कदाचित सुनबाई जिवंतसुद्धा असेल.

पोलीस : ''असेल? तुम्ही इतका छळ केल्यावर त्यांनी जिवंत का रहावं?''

डॉक्टर : ''प्रश्न आहे की त्या जिवंत असताना यांनी त्यांचा इतका छळ तरी का करावा?''

बयाबाई : ''नाही हो. ती असं काही भलतच करील हे मला तरी मेलीला काय माहीत?''

डॉक्टर : ''असं म्हणता? तुम्हाला सक्तमजुरी होणार की फाशी हे आम्हालाही माहीत नाही. पण यातलं काहीतरी होणार. जमल्यास दोन्ही होणार.

बयाबाई : ''असं म्हणू नका हो डॉक्टर. माणूस जिवंत आहे त्यापेक्षा मेलेलाच डॉक्टरांना जास्त कळतो. बघा तरी एकदा तिला. बेशुद्ध वगैरे पडली असेल. मी पाहू का? ती मेली तर माझं मेलीचं कसं होणार?''

पोलीस : ''कसं होणार? तुम्हीही मरणारच. वारन्ट, अटक, फाशी....''

बयाबाई : ''नको नको. पुन्हा पुन्हा असं म्हणू नका हो. एकदा खात्री तरी करा. ती जिवंतच असेल. मी पाहू का?''

पोलीस : ''हात लावायचा नाही. कायद्याने सक्त गुन्हा आहे. कायदेशीर प्रोसिजर म्हटली की ती कायदेशीर लोकांकडूनच पूर्ण व्हायला पाहिजे.''

डॉक्टर : ''हो. प्रोसिजरप्रमाणे मला आधी केस तपासली पाहिजे. सरकारी फी १५,००० रूपये. पण माझा खासगी रेट २५,००० रूपये आहे.''

पोलीस : ''आपला रेट सरकारी आणि खासगी असा वेगळा नाही. विषमता आपल्याला मान्यच नाही. सरळ २५,००० रूपये आहे. तोही रोख. हप्त्याहप्त्याने नाही.''

बयाबाई : ''म्हणजे एकूण पन्नास हजार रूपये? इतके पैसे?''

पोलीस : ''ते तुमचं तुम्ही बघा. एक तर असली दाबादाबीची कामं आम्ही करत नाही आणि करायचीच तर स्वस्तात करून कसं चालेल? आम्हालाही वर कुणी मागणारे असतात की नाही? महागाईच्या काळात न्याय्यतत्त्वाप्रमाणे वाटायचं तर परवडायला नको का?''

डॉक्टर : ''मग काय ठरलं? असेल कबूल तर लावतो हात. हो नाहीतर हात लावून अवलक्षण नको, काय? मग तुमचं तुम्ही बघा, साक्षात मरण.''

बयाबाई : ''अहो पण एवढे पैसे आणायचे कुठून?''

डॉक्टर : ''नवऱ्याचे प्राव्हीडंड फंड, ग्रॅच्युईटीचे पैसे असतीलच ना?''

बयाबाई : ''थांबा हं. पाहते काही जमतंय का. थोडे कमी जास्त नाही का करता येणार. एवढे पैसे म्हणजे...''

पोलीस : ''कमीचं बोलूच नका. पण लवकर निर्णय घेतला नाही तर मिटरप्रमाणे पैसे वाढत जातील.''

बयाबाई : ''नको नको. आणते हं पैसे. पण एकदा ही केस मिटवली की मग मी सुनबाईला पाहू शकते ना?''

पोलीस : ''तुम्ही पाहणार?''

डॉक्टर : ''पण आधी ते पैशाचं पहा.''

बयाबाई : ''आणते हं'' (बयाबाई विंगेत जातात. दिवाकर बापट उठून बसतो.)

दिवाकर : ''बापरे किती वेळ माझा मुडदा पाडला. आणखी थोडा वेळ तुमचा घोळ असाच सुरू असता तर खरोखरच माझा मुडदा पडला असता. आणि त्या

बयेनं खरंच पाहिलं असतं मला तर? आपल्या लोकनाट्याचं पार शोकनाट्य झालं असतं. बरं आता काय करायचं मित्रांनो, पैसे दिल्यावर तर ती बया पाहणारच. मला वाटतं झालं तेवढं नाटक पुरे झालं, ही बया इतकी चिवट आणि चिकट असेल हे आपण लक्षातच घेतलं नव्हतं. आता आपण इथून पळून जाण्यातच शहाणपणा आहे'' (इतक्यात बाहेरून राधा येते)

राधा : ''कोण आपण?''

दिवाकर : ''आम्ही... आम्ही.... मी.... मी...''

पोलीस : ''आम्ही हुंडाबंदी मंडळाचे कार्यकर्ते कम हौशी नट आहोत. तुम्ही राधावहिनी तर नाहीत?''

राधा : ''हो मीच राधा. का?''

दिवाकर : (राधेपुढे साष्टांग नमस्कार घालून) ''कृपा करून आम्हाला मदत करा. खरं म्हणजे तुम्हाला मदत करण्यासाठीच आम्ही आलो होतो. पण तुमच्या सासूबाई म्हणजे ग्रेटच. आता आमच्या म्हणजे तुमच्याही नाटकाची सर्व सूत्रे तुमच्याच हाती आहेत.''

राधा : ''म्हणजे काय? मला काहीच कळत नाहीय. तुम्ही...''

दिवाकर : ''ते सगळं नंतर सांगतो. आधी या इथं बेशुद्ध पडल्याचं सोंग करा बरं प्लीज.''

राधा : ''अहो पण सासूबाई....''

पोलीस : ''आता येतीलच.''

डॉक्टर : ''कृपा करून आमच ऐका हो.''

राधा : ''ठीक आहे.'' (राधा बेशुद्ध पडल्याचा अभिनय करते. बापट बाहेर जातो. बयाबाई पैसे घेऊन येतात.)

बयाबाई : ''हे घ्या पैसे.''

डॉक्टर : ''वा. छान. आता काळजीच नको. आता केस वाचलीच म्हणून समजा'' (पैसे घेतो)

पोलीस : ''हो तर. मिटवायला काय लागतं. मिटवून टाकू. पण एक अडचण आहे.''

बयाबाई : ''आता आणखीन कसली अडचण?''

पोलीस : ''सांगतो. डॉक्टर, आधी केस तपासा बरं.''

डॉक्टर : ''मी न पाहताच सांगतो ना. म्हणजे मी फॉरीन रिटर्न डॉक्टर आहे. असा तसा नाही. इनडायरेक्ट रोगी तपासतो मी.''

बयाबाई : ''म्हणजे कसा काय?''

डॉक्टर : ''दाखवतो हं. असं इकडे या. तुम्ही तुमच्या सुनेचा हात धरा. (बयाबाई राधाचा हात धरते.) ''छान. आता तुमचा हात पाहू.''

बयाबाई : ''काय म्हणालात?''

डॉक्टर : ''नाही. तसं काही नाही. रोगी तपासायची ही आधुनिक पद्धत आहे. ज्याच्यापासून रोग्याला रोग झाला असेल त्याची परीक्षा करणे.''

पोलीस : ''वा काय छान परीक्षा आहे. चालू द्या. चालू द्या, परीक्षा.

डॉक्टर : (बयाबाईच्या हाताची नाडी पाहत) ''आहे. चालते आहे. रोग्याची नाडी चालते आहे. श्वास घ्या, हं, सोडा.... छान. डोळे मिटा.'' (बयाबाई डोळे उघडते. राधा जिवंत आहे हे पाहून)

बयाबाई : ''राधा तू जिवंत आहेस? बरं झालं ग बाई. माझा तर प्राणच जायची पाळी आली होती. केवढं महाभारत घडवलंस ग बाई.''

पोलीस : ''हा. इथंच तर आता खरी अडचण आहे. बयाबाई, तुमच्या सुनेनं जर जबाबात असं म्हटलं की तुम्ही तिचा छळ करीत होता तर पंचनामा करावाच लागेल. मग केस मिटवता येणार नाही. काय राधाबाई, तुम्ही आत्महत्या करण्याचा प्रयत्न का केला ते सांगू शकाल?''

राधा : ''(गोंधळून) आत्महत्या?''

डॉक्टर : ''(इशारा करीत) हो. हो आत्महत्या. तुम्ही झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्येचा अयशस्वी प्रयत्न केलाय.''

पोलीस : ''तुम्हाला कोणी भाग पाडलं होतं का? म्हणजे कुणी छळ वगैरे?''

राधा : ''नाही. मला कुणीही भाग पाडलं नाही. माझा कुणीही छळही केलेला नाही. मला निद्रानाशाचा थोडा विकार आहे. म्हणून अधून-मधून मी झोपेच्या गोळ्या घेते. आज झोपच येत नव्हती म्हणून थोड्या जास्त..... जास्त म्हणजे दीड गोळी घेतली. आत्याबाई हा काय प्रकार आहे?''

बयाबाई : ''किती मोठ्या मनाची ग माझी बाय. मी तुला एवढं छळलं तरी तू मला.... खरंच, माझंच मेलीच चुकलं. उगाच तुला...''

राधा : ''जाऊ द्या आत्याबाई, विसरा सगळं.''

बयाबाई : "खरच. मला क्षमा कर बाळा. हुंड्याच्या लोभानं माझ्या डोळ्यांवर झापडं चढली होती." (सुदाम व कृष्णा येतो)

कृष्णा : "कुणाची क्षमा मागतेस आई?"

बयाबाई : "माझ्या लाडक्या सुनेची. फार गुणाची पोर आहे हो!"

सुदाम : "लाडकी सुन काय? खरंय, खरय. (हळूच खाजगी सुरात पोलीसाला विचारतो) काय सगळं व्यवस्थित झालं ना? (पैशांची खूण करीत) केस व्यवस्थित मिटवली ना? (डॉक्टर होकारार्थी इशारा करतो) छान छान । तर कृष्णा तू म्हणाला होतास ना पन्नास हजार रूपयांबद्दल, पैशांची व्यवस्था झालीय. उद्या सकाळी देतो."

बयाबाई : "काही नको. मीच करीन व्यवस्था माझ्या मुलासाठी"

सुदाम : "अरे वा. हंड्यात पुरलेले हुंड्याचे पैसे आता बाहेर निघणार म्हणायचे? माझे पैसे हनीमूनला वापर रे."

बयाबाई : "चहाटळ मेल्या." (सुदामला मारायला धावते. तो रंगमंचावर वर्तुळाकार पळतो. कृष्णा, राधा, पोलीस, डॉक्टर हसतात. सर्व पात्र स्थिरावतात. हळूहळू पडदा पडतो.

# आजची तरुणाई...

## विधायकतेकडे की विध्वंसाकडे?

भारत हा जगातील सर्वाधिक तरुणांची संख्या असलेला देश आहे. काही तरुण ध्येयवादी आहेत तर काही दिशाहीन. दोन्ही प्रकारातील तरुणांचे प्रमाण लक्षवेधी. अफाट क्षमतेचे काही युवक आपल्या सामर्थ्याने 'समर्थ भारत' घडविण्याच्या प्रयत्नात आहेत; तर काहींना त्यांच्या शक्तीची जाणीवच नसल्याने ते भरकटत चालले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रत्येक क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन घडत असतानाच आजच्या तरुणाईविषयी आपल्याला काय वाटते? तरुणाईची वाटचाल विधायकतेकडे आहे की विध्वंसाकडे?

याबाबतचे आपले अनुभव, मत, निरिक्षण आमच्याकडे पाठवा. निवडक साहित्यास 'चपराक'च्या आगामी 'युवक दिन' विशेषांकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**संपर्क : संपादक, 'साहित्य चपराक',**
१३६०, शुक्रवार पेठ, काळा हौद चौक, पुणे ४११००२
**E-mail : info@chaprak.com**

With Best Compliments From...


**THORAT**
**VALVES PVT. LTD**

**Manufacturer of all kinds of Industrial Valve**

Get No. 12 A - 1/4, Jakatwadi,
Tal. Dist. Satara (Maharashtra)

Tele. (02162) 239229 - 231664

मिळालं का मंत्रीपद?




मंत्रीपद तर सोड! "पक्ष म्हणजे काही
धर्मशाळा किंवा अनाथाश्रम नाही!
पटत नसेल तर चालते व्हा" असे साहेब म्हणाले.



- मंजिरी धामणकर
हेमदीप, आनंदबाग, नवीपेठ, पुणे
भ्रमणध्वनी - ९८२२०१६२४२
www.manjiri-dhamankar.com

# अजब सरकार; गजब सरकार!

न्याय-आपल्याकडचा आणि परदेशातला! सुप्रसिद्ध निवेदिका, साहित्यिक मंजिरी धामणकर यांनी उभी केलेली बोलकी अनुभवचित्रे....

**-संपादक**

**प्रसंग-१-दि. ८ नोव्हेंबर २००७, वेळ सकाळी-१० दिवाळीचा पहिला दिवस.**

माझी मुलगी जान्हवी (वय २१) गाडी चालवत होती. सकाळची वेळ, दिवाळी-रस्त्यावर बराच ट्रॅफिक होता. जान्हवीचं ड्रायव्हींग अतिशय सावध आणि नियमाबरहुकूम आहे. सीट बेल्ट लावलेला होता, वेग मर्यादेत होता. समोरची गाडी अचानक थांबली, अर्थातच जान्हवीने ब्रेक दाबला. तिचं गाडीवर पूर्ण नियंत्रण होतं. पण तिच्यामागे एक मोटारसायकल होती. ते तिघं होते, त्याला वेग आवरता आला नाही. तो जान्हवीच्या गाडीवर मागून इतक्या जोरात आदळला की गाडीची मागची काच फुटली, त्याला लागलं, रक्त येऊ लागलं, संपूर्णपणे त्याची चूक होती पण माणुसकी जपणाऱ्या जान्हवीने स्वत:च्या गाडीतून त्याला, त्याने सांगितलेल्या हॉस्पिटलमध्ये नेलं. त्याला टाके घालेपर्यंत थांबली. तोपर्यंत तिचे बाबाही तिथे पोचले.

टाके घालून झाल्यावर त्याला कंठ फुटला. 'ट्रीटमेंटचे पैसे द्या' म्हणायला लागला. माझे पती अर्थातच म्हणाले, ''आम्ही पैसे द्यायचा संबंधच येत नाही. उलट, तुम्हीच आमच्या गाडीचं झालेलं नुकसान भरून दिलं पाहिजे.''

आमच्या दुर्दैवाने त्याचा बाप रिटायर्ड पोलीस इन्स्पेक्टर होता. ती ओळख वापरून त्याने हवालदाराला हॉस्पिटलमध्ये बोलावून घेतलं. फिर्याद दाखल केली. जान्हवी बिचारी तोपर्यंत रडवेली झाली होती.

आमची घोडचूक अशी झाली की, आम्ही त्याच्यावर उलट फिर्याद घालायला हवी होती ती घातली नाही. एकतर दिवाळीची गडबड होती आणि दुसरं म्हणजे आम्ही ओळखीच्या पोलीस, वकिलांना विचारलं, तेव्हा सगळेच म्हणाले, ''मागच्या बाजूने तो गाडीवर आदळला आहे. तुम्हाला काळजी करण्याचं काहीच कारण नाही. काहीही होणार नाही. तुम्ही निश्चिंत रहा.''

ह्या घटनेला एक वर्ष लोटलं. आम्ही त्याबद्दल विसरूनही गेलो. जानेवारी २०१० मधे, माझ्या मोठ्या मुलीचं - तन्मयीचं - लग्न होतं. लग्न दोन दिवसांवर आलेलं. दारात मांडव पडलेला आणि संध्याकाळी दोन पोलीस दारात हजर झाले. ''जान्हवी धामणकर कोण आहे? सकाळी चौकीत ये, तुला अटक करायची आहे.'' माझ्या पायातलं बळच गेलं. मी कसंबसं त्यांना सांगितलं, ''आमच्या घरात लग्न आहे. ते झालं की आम्ही येतो.'' नशिबाने त्यांनी ऐकलं आणि ते निघून गेले.

लग्नाची गडबड संपल्यावर मी जान्हवीला घेऊन पोलीस चौकीत गेले. तिला कागदोपत्री अटक केली. वाटेल ती कलम लावली. क्रिमिनल केस घातली. आम्ही कोर्टात जाऊन जामीन घेतला. केस सुरू झाली. आणखी विचित्रपणा म्हणजे, 'स्टेट विरूद्ध जान्हवी' अशी केस होती. तो आदळलेला माणूस स्टेटतर्फे साक्षीदार होता. दर महिन्याला तारखा पडत होत्या. आम्ही कोर्टात हजर राहत होतो. मुळातच केसमध्ये काही दम नव्हता आणि आमच्या वकिलांनी अत्यंत हुशारीने उलट तपासणी घेऊन त्या साक्षीदाराला त्याच्याच बोलण्यात अडकवलं. एक वर्ष केस चालली. एप्रिल २०१० मध्ये न्यायाधीशांनी तिची निर्दोष सुटका केली.

इतर खटले अनेक वर्ष चालतात, त्या मानाने एका वर्षात निकाल लागला, तोही आमच्या बाजूने, हे जरी खरं असलं, तरी माझ्या मनात असंख्य प्रश्न उभे राहतात. त्यांची उत्तरं किंवा प्रतिक्रिया मला वाचकांकडून हव्या आहेत. (जमलं तर, पोलीस, मंत्र्यांकडूनही)

१) पांढरपेशे लोक 'अटक, खटला, कोर्ट' ह्या शब्दांना घाबरून पैसे देऊन मामला मिटवून टाकतील, ह्या हेतूने पोलिसांनी हा उद्योग केला असावा का?

२) एक वर्ष मनस्ताप भोगण्यापेक्षा आम्ही पैसे देऊन मिटवायला हवं होतं का? तसा सल्ला आम्हाला अनेकांनी दिला होता.

शेवटी न्याय मिळाला, त्यामुळे आपल्या न्याय व्यवस्थेवर विश्वास बसला हे जरी खरं असलं तरी

३) आरोपपत्र वाचून, मुळात तिची चूकच नाही आहे,

आणि त्यातून क्रिमिनल केस तर मुळीच नाही, त्यामुळे कोर्टाचा वेळ वाया घालवू नये, हे न्यायाधीशांना सांगता आलं नसतं का?

४) केस चालू असल्यामुळे, जान्हवीला एम. फिल्मसाठी बेल्जियमच्या युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळूनही जाता आलं नाही. त्या नुकसानाला आणि झालेल्या प्रचंड मनस्तापाला जबाबदार कोण?

५) दुसऱ्याला मदत केल्याचं हे फळ भोगायला लागल्यावर माणुसकीवरचा जान्हवीचा विश्वास उडाला तर तिची काय चूक आहे?

६) न्यायाधीशांनी निकालपत्रात स्पष्ट म्हटलं आहे. 'समोर आलेल्या पुराव्यांवरून सिद्ध होतं आहे की जान्हवीने वाहतुकीचा एकही नियम मोडलेला नाही. तिला लावलेलं एकही कलम सिद्ध होत नाही. उलट मागचा माणूसच वेगात असल्यामुळे त्याच्या चुकीनेच तो तिच्या गाडीवर आदळला. हेल्मेट नसल्यामुळे त्याला इजा झाली. मोटारसायकलवर तिघंजण बसले होते.''

हे जर सिद्ध झालं तर स्टेट त्याच्यावर का खटला घालणार नाही आणि त्याच्या चुकीची त्याला का शिक्षा मिळणार नाही?

७) कुणाच्या अध्यात मध्यात नसलेल्या, वशिले, लाच यांच्या वाऱ्याला सुद्धा उभे न राहणाऱ्या आमच्यासारख्या सामान्य माणसांना भारतात सुखासमाधानाने राहणे शक्य आहे का?

**प्रसंग - २ - स्थळ - हाँगकाँग.**

माझी एक मैत्रीण हाँगकाँगमध्ये गाडी चालवत होती. पुढच्या गाडीला ओव्हरटेक करताना, एका मिनिटाच्या आत ओव्हरटेक करून पुन्हा आपल्या लेनमध्ये परत आलं पाहिजे हा तिथला नियम.

माझी मैत्रीण अरूणा, ओव्हरटेक करत असताना तिला आरशात दिसलं, की तिच्या मागे पोलीस आहे. तिचं लक्ष त्यामुळे जरा विचलित झालं. शेजारी बसलेल्या मैत्रिणीला ती म्हणाली, ''हा आपल्या गाडीला का फॉलो करतोय? मी तर व्यवस्थित चालवते आहे.'' ह्या सगळ्या भानगडीत तिच्या गाडीचा वेग जरा कमी झाला आणि परत स्वत:च्या लेनमध्ये यायला तिला ६० सेकंदापेक्षा काही सेकंद जास्त लागले.

मागच्या पोलिसाने लगेच तिला थांबायला सांगून ४५० हाँगकाँग डॉलर्स दंड भरायला सांगितला. ती म्हणाली, ''माझी काहीही चूक नसताना तू मला फॉलो करत होतास म्हणून माझं लक्ष विचलित झालं आणि त्यामुळे काही सेकंद जास्त गेले. मी का दंड भरायचा?'' तो म्हणाला, ''दंड तर तुम्हाला भरावाच लागेल. नंतर तुम्ही कोर्टात आव्हान देऊ शकता.''

त्याप्रमाणे नंतर तिने ह्या घटनेला कोर्टात आव्हान दिलं. निकाल तिच्या बाजूने लागला. तिने भरलेली ४५० डॉलर्सची दंडाची रक्कम तर तिला परत मिळालीच पण त्याशिवाय भरपाई म्हणून आणखी ४५० डॉलर्स स्टेटकडून मिळाले.

**मेरा भारत महान!!!**









- डॉ. माधव रा. पोतदार
'स्वप्न पराग' फ्लॅट नं. ३८,
अक्षयनगर, धनकवडी, पुणे-४३.
दूरध्वनी : ०२०-२४३७५४५४

# कारुण्याचे शाहीर विनोदकार दत्तू बांदेकर

दत्तू बांदेकर यांचा विनोद हा नेहमीच्या पठडीतला नाही. ना तो केवळ मध्यमवर्गीय ना तो केवळ काल्पनिकतेवर आधारलेला. कोल्हटकर, गडकरी यासारखे मातब्बर लेखक विनोदकार म्हणून ख्यातनाम पावले असले तरी त्यांनी काव्य, नाटक अशासारख्या वाङमय प्रकारातून विनोदनिर्मिती केली आहे. स्वतंत्र विनोदासाठी त्यांनी निषेध या प्रकाराचा उपयोगही करून घेतला आहे. पु.लं.चा विनोद हा जरी पूर्णत: मध्यमवर्गीय नसला तरी त्याची निर्मिती ही बौद्धिकतेवरच अधिकांशाने झालेली आहे. त्यांनीही निबंध कथा या प्रकारांचा उपयोग करून घेतला आहे.

विनोदाचा बादशहा म्हणून ज्यांना गौरविले जाते ते आचार्य अत्रे यांनी मात्र निबंध, कथा, काव्य, नाटक या सर्व प्रकारातून संचार केला असून, आणखी एका महत्त्वपूर्ण गोष्टीची भर घातली आहे, ती वक्तृत्वातून निर्माण केलेल्या विनोदाची. अत्रे लेखक होतेच पण त्याबरोबर पत्रकारही होते. त्यामुळे दत्तू बांदेकरांच्या व अत्रे यांच्या विनोदाची जातकुळी एकाच प्रकारची म्हणायला हरकत नाही. तरीपण दत्तू बांदेकर अधिकांशाने रमले ते पत्रकारितेत, त्यामुळे त्यांचा विनोद पूर्वसूरीपेक्षा वेगळा असाच होत राहीला. पत्रकार या नात्याने विपुल विनोद निर्मिती करणारे दत्तू बांदेकर हे एकमेव असेच ठरतात. या पत्रकारितेत त्यांनी थोडी थोडकी नव्हे तर आपल्या आयुष्यातील पस्तीस वर्षे घालवली होती.

दत्तू बांदेकर यांच्या विनोद निर्मितीला दोन पंख होते. एक होता गद्याचा तर दुसरा होता पद्याचा. विषयानुरूप त्यांनी हे दोन्ही प्रकार हाताळलेले आहेत. प्रामुख्याने आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग'मध्ये १९३९ ते १९५९ असे ते वीस वर्षे होते. तेही अखंड होते. मात्र, त्यापूर्वी पत्रकारितेत असूनही त्यांची भ्रमंतीच सुरू होती. 'नवयुग'मध्ये 'रविवारचा मोरावळा' लिहून त्यांनी गद्य व पद्य या दोन्ही गोष्टी लेखनासाठी एकत्रित केल्या होत्या.

सहानुभूती आणि कारूण्य या दोन गोष्टींवर दत्तू बांदेकर यांनी आपल्या विनोदाची उभारणी केलेली आहे. मुळात तेच फूटपाथवरील जीवन जगून आलेले आणि त्यांनी माणसाच्या दलदलीतले दलित जीवन डोळा भरून पाहिलेले. या उपेक्षित जीवनाचे ते खरे भाष्यकार ठरले आहेत. त्यांनी ज्या दलित, पीडित जीवनावर विनोद माध्यमातून भाष्य केले आहे तसे पूर्वसुरीपैकी कुणीही केले नसल्यामुळेच आचार्य अत्रे यांनी त्यांना 'कारूण्याचे शाहीर' या शब्दात गौरविले आहे.

दत्तू बांदेकर यांनी सार्वजनिक जीवनापासून अलिप्त राहूनच जीवनाचा कानोसा घेतला आहे. दु:खी, अंपग, अनाथ जीवनाच्या अंत:करणाचा ठाव घेऊन ते अशांनाच दिलासा देत राहिलेले आहेत. निशाचर बनून 'मौज मजाह' या गुजराती पत्रातून 'मुंबई-रात्रीचे जीवन' म्हणून लेखमाला लिहिली. त्यांना जेवढी गुन्हेगारी जगताची माहिती होती तेवढी क्वचितच एखाद्या पत्रकाराला माहिती असावी. त्यांनी कित्येक वेश्यांच्या कथा कानाने ऐकल्या आहेत. त्या ऐकूनच ते दु:खी कष्टी होत. त्यांनी त्या व्यथा सांगण्याचे धाडस दाखवले होते. इथे त्यांच्यातला सहानुभूतीकार नेहमीच जागा राहत होता. त्यांच्या विनोदात एकाच वेळी डोळ्यात अश्रू निर्माण करण्याचे व ओठात हसू निर्माण करण्याचे जे सामर्थ्य आले त्याचे कारण वास्तव जीवनाचा विशेषत: दलित, उपेक्षित जीवनाचा त्यांनी घेतलेला वेध हेच होते. अशा तऱ्हेचे दलित, उपेक्षित जीवन आमच्या कोणत्याही विनोदकाराने निर्मितीसाठी वापरलेले नाही. इथेच बांदेकर इतर विनोदी लेखकांपेक्षा पूर्णत: वेगळेच ठरतात.

विनोदाला वास्तवाची भक्कम बैठक देणाऱ्या दत्तू बांदेकरांनी विसंगतीवर आधारलेला व माणुसकीने भारलेला असाच विनोद निर्माण केला आणि हा विनोद सहानुभूतीवर उभा होता. कारूण्याने थबथबलेला होता. मानवी यातनांवर अश्रूंचे शिंपण करून विनोदाचा बगीचा फुलवणारे दत्तू बांदेकर हे एकमेव असे विनोदकार होते. जगातून जी जी दु:खे अनुभवली ती ती दु:खे साहित्याचा विषय करून त्यांनी विनोद माध्यमातून मांडलेली आहेत. जिथे अन्याय, जिथे विषमता त्यांना तीव्रतेने जाणवली तिथे तिथे त्यांनी उपहासातून आपली विनोदनिर्मिती केलेली आहे. आमच्या बहुतेक विनोदकारांनी केवळ व्यंगावर, सामाजिक व्यंगावर विनोदाचे हत्यार चालवले पण बांदेकरांनी मानवताहीन जगणाऱ्या जीवनाचा वेध घेऊन आपले विनोदी हत्यार चालवले. हा माणूस फार मोठा होता, ते जगातून पाहत होते आणि भावनेच्या कंठातून सांगत होते.

साहित्याकडे पाहण्याची मुळातूनच दत्तू बांदेकरांची दृष्टी वेगळी होती. त्यामागे त्यांचे स्वत:चे असे तत्त्वज्ञान होते. विनोदासाठी विनोद निर्माण करणारे किंवा कल्पनेचे पंख लावून

विनोदाच्या घागरी उपसणारे ते विनोदकार नव्हते. वाङमय रक्ताने लिहावे असे म्हणतात पण ते अश्रूंनी लिहावे लागते. या जगात अश्रूच जास्त पवित्र. अश्रू ही निर्मळ गंगा आहे, हे तत्त्वज्ञान उराशी कवटाळूनच दत्तू बांदेकरांनी विनोदनिर्मिती केली. त्यामुळेच त्यांचा विनोद हा विशिष्ट पठडीतला न होता तो स्व-तंत्र असाच निर्माण झाला. बांदेकर हे फक्त बांदेकरच होते. जगात असूनही नसल्यासारखे, एकटेपणा भोगणारे व एकाकी अशी अंतर्मुखीवृत्ती सांभाळणारे.

पुण्याच्या वास्तव्यास त्यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या डेक्कन स्पार्क्स नावाच्या नाटक कंपनीत काम केले. ती बंद होताच दोन दिवसाचा उपवास सहन केला. तेव्हा संगीत दिग्दर्शक शांताराम मांजरेकरांनी त्यांना उचलून किर्लोस्कर थिएटरमध्ये आणले. पुढे रांगणेकरांच्या 'वसुंधरा'त ते गेले. 'संकार'ची कचेरीही त्यांनी अनुभवली. मो. ग. रांगणेकर व अनंत काणेकर त्यांनी सुरू केलेल्या 'चित्रा' मध्येच त्यांच्या पत्रकारितेच्या जीवनाला सुरूवात झाली. त्यांचा अतिशय गाजलेला जो 'सख्याहरी' तो 'चित्रा'तच जन्म पावला.

'सख्याहरी' हा वृत्तपत्र क्षेत्रातला व साहित्यनिर्मितीतला वेगळा असा प्रकार ठरला. शिवाय तो खळबळजनकही झाला. उपरोध, विनोद, टवाळी, कोट्या, शृंगार, लाडिकपणा, नखरा, भाषाशैली या विविध गुणांनी सख्याहरी भारला होता. त्याने स्वत:चा असा खास वाचकवर्ग तयार केला. आणखी वैशिष्ट्य हे की तो सामान्यांपासून विद्वानांपर्यंत संचार करीत गेला. पतिपत्नींना तर दैनंदिन जीवनातल्या कितीतरी गमती सख्याहरीमुळे अनुभवता आल्या. त्यामुळे दत्तू बांदेकरांचा 'सख्याहरी' घराघरात शिरला. हे त्यांच्या विशिष्ट अशा शक्तीचे यश होते आणि पत्रकारितेचेही होते. वृत्तपत्र वाचनाची एक वेगळीच अभिरूची बांदेकरांनी सर्वसामान्यांची अशी तयार केली.

दत्तू बांदेकर 'सख्याहरी' कसे सजवीत होते त्याचे काही नमुने :-

१) गुंडप्रियकरा, पुणे शहरात सायकलवर बसून निरनिराळ्या बोळात फिरतोस. ब्रेक नसल्याने तुझी सायकल म्हशीवर किंवा बैलावर आदळीपर्यंत थांबत नाहीस. सायकलीवर बसून मंडईतली भाजी आणतोस. द्यावी कुणाला? या प्रश्नाने हताश होतोस. शेवटी गाई म्हशींना चारतोस. शोक करू नकोस. भाजी म्हणजे काय कोण झाडाचा पाला. ती म्हशीने खाल्ली काय किंवा बायकोने खाल्ली काय दोन्ही सारखेच.

२) माझ्या राया, तू मुंबईत नसल्याने शुन्य वाटते. भर पावसाळ्यात माझा जीव कोरडा होतो. तनू सुकत चालली आहे. बांगड्या गळू लागल्यात, पोलकाही सैल होऊ लागला. याचा अर्थ हृदयपालट झाला आहे असे नाही. तुझ्यासाठी प्रेमाने तयार केलेली पानपट्टी पोलक्यात सुकली. माझी पानपट्टी खाऊनच तू पट्टीचा लेखक झालास. पुण्याला तुला पानपट्टी कोण देणार? उलट हकालपट्टी मात्र होईल.

३) प्रियकरा, पुण्यात तू उपरणे घालून पेरू खात फिरतोस. एकादशीला उपवास केलास आणि शुचिर्भूत होऊन एका सत्शील गाईला भक्तिभावाने घास घातलास. राया, गोमातेला घास घालणारा नवरा मला आवडतो. लग्नाच्या वेळी घास देणार असल्याने सवय आतापासून हवी. काहीजण बायकोला घास देताना आढेवेढे घेतात. घास देण्याच्या कामात इतकी घासाघीस कशाला? विवाहेच्छु तरुणाने ऐनवेळी अवसानघात होऊ नये म्हणून गाईला घास देण्यास शिकले पाहिजे.

४) माझ्या गुलाबाच्या फुला, मी विरहाने अन्नपाणी वर्ज्य केले आहे. तुझ्या आवडी आठवून डोळ्यात अश्रू उभे राहतात. तुला आवडणारे चार पदार्थ चॉकलेट, आमलेट, लिमलेट आणि घासलेट तुला कोण पुरवणार?

५) प्रीतिवल्लभा, 'झंकार' कचेरीत गंभीर लेखन करण्यासाठी सराव म्हणून सुतकी चेहरा करून फिरतोस. प्रो. फडके यांच्या टाकाच्या फेकीप्रमाणे 'नवटाकाच्या फेकी' तू सुरू करणार. हे सदर लिहिण्यास तू अत्यंत लायक आहेस. निरनिराळ्या गुत्त्यात नवटाक घेऊन तू फेकाफेकी करीत असतोस. त्यालाच नवटाकाच्या फेकी म्हणावे काय? तुझे नवीन सदर 'सोटा व कासोटा' या सदराकडे मी लक्ष लावून बसले आहे.

TÜV NABCB QM 002
AN ISO-001:2008 CERTIFIED COMPANY
SE
SPREJA
ENGINEERING
S. D. SONAVANE (Proprietor)

IBR Approved Boiler Repairer,
H. P. & L. P. Pipeline,
S. S. M. S. Fabricator,
Machining Facility, Sugar & Process Equipment Manufacturer
WORKS
Plot No. 18 B. U. Bhandari Industrial Estate
At Sanaswadi, Near L & T Phata,
Tal. Shirur, Dist Pune, Pin - 412 208
Mobile: 9325504354 / 9689887062/64/65
sprejaengineering@rediffmail.com

६) प्राणेश्वर, 'झंकार' साप्ताहिकात तू उपसंपादक होणार. भीतीच वाटली. मुख्य संपादकापेक्षा उपसंपादक वाईट असतो. मुख्य संपादक जी टीका करतो त्याला देश म्हटले तर उपसंपादकाच्या टीकेला उपदेश म्हणायला हरकत नाही. सख्याहरी, झंकार कचेरीत उपदेश कर. पण उपसंपादक झालास म्हणून उपपत्नी करण्याच्या मात्र भानगडीत पडू नकोस.

दत्तू बांदेकरांच्या या अशा नर्म विनोदात जसा द्वेष नाही तसाच देशही नाही. त्यांची बालवाचनमालाही लोकप्रिय झाली होती. काही नमुने - १) मुरलीधरा, पाटावर बैस. ही घे तुला पुरी. नुसती कशी खाऊ? सगुणा दुधाची वाटी आण. मला साखर हवी. मालवणचे पाटील काका म्हणतात, साखर खाल्ली की चरबी वाढते. मग मी काय खाऊ? दिवाळीला साखर कशी मिळेल याची खंत खा. म्हणजे चरबीही नाहीशी होईल.

२) आमची आई लेखिका आहे. तिच्या कविता मासिकात छापून येतात. सगळ्या कविता बाबाच लिहून देतात.

३) आमची आई गोरी पण कधी कधी काळी दिसते. घरातली पावडर संपते. मग बाबा आणून देतात. आई पुन्हा गोरी होते.

४) आमची आई काटकसरी आहे. ती बाबांना सिनेमा पाहू देत नाही. सिगारेट ओढून देत नाही. एकटीच सिनेमा पाहून येते व बाबांना कथानक सांगते.

५) बाबांना आईची भीती वाटते. बाबा उपवास करतात पण गुपचूप चिवडा खातात. आईला सांगू नये म्हणून आम्हालाही देतात.

६) बाबा उशिरा घरी येतात. उशीरा येताच खिडकीतून उडी मारतात आणि रामनामाचा जप करीत झोपी जातात.

७) आमची ताई गुणाची आहे. छान चित्रे काढते पण चित्र माणसाचे की गाढवाचे ते ओळखायला येत नाही.

८) ती नृत्यकलेत हुशार आहे. स्नेहसंमेलनात नाच झाला. तेव्हा शाळेची इमारत भूकंपासारखी हलू लागली. पहिला मजला कोसळून पडला. तेव्हापासून तिचा नाच कायद्याने बंद करण्यात आला.

९) मामा बडबडे, विनोदी, गोड गोड गोष्टी सांगतात. अनुभव सांगतात. एकदा रानात काठीने आपण वाघ मारला म्हणतात. मामा इंग्लंडला गेले तेव्हा चर्चिलने चिरूट टाकून मामाजवळ विडी मागितली.

आचार्य अत्रे यांच्या नवयुगात आल्यावर बांदेकरांच्या काव्यशक्तीला मोठाच बहर आला. अधिकाधिक विडंबने त्यांनी याच काळात लिहिली. आचार्य अत्रे यांच्या 'अत्रेउवाच' बरोबर बांदेकरांचा 'रविवारचा मोरावळा' लोकांना सुखावू लागला. आज काय लिहायचे एवढा प्रश्न बांदेकर विचारत. अत्रे विषय सांगत. बांदेकरांची प्रतिभा जागी होऊन चमत्कृतीपूर्ण रचना ओसंडून बाहेर येत. विशेषत: संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात बांदेकरांच्या विनोदाला वेगळीच धार आली. त्यांना काव्याची समज फार होती. त्यांचे वाचन मुळीच कमी नव्हते. पत्रकाराला विषयात ताजेपणा आणण्यासाठी अफाट वाचन करावेच लागते. बांदेकर ते करीत असत. म्हणूनच त्यांची प्रतिभा कधीही आडली नाही. शिवाय ते माणसे वाचीत असत. त्यांच्यासमोर माणसांच्या रूपाने जिवंत ग्रंथ उघडे असत.

पत्रपंडित पां. वा. गाडगीळ यांनी बांदेकरी विनोदाबाबत म्हटले आहे, 'समाज जीवनातील ढोंग पाखंड दोषांची चिरफाड करणे, दलितांची कड घेणे हे त्यांच्या उपरोध, उपहासाचे वैशिष्ट्य होते. गुंडांच्या अंत:करणातूनही गंगा कशी पाझरते हे बांदेकरांनीच चितारावे.'

याच गाडगीळांवर संयुक्त महाराष्ट्राच्या काळात दत्तू बांदेकरांनी जे विडंबन लिहिले ते खरोखरच अद्वितीय ठरले. त्यांनी लिहिले होते.

***'पांडोबा पांडोबा, भागलास का?***
***शेटजीच्या डगल्याखाली लपलास का?***
***शेटजीचा डगला गुजराती। मंत्र्यांचा वाडा चिकणमाती***
***मंत्र्याचा वाडा पाहून जा। तूप रोटी खाऊन जा***
***तुपात पडला 'मामा'। पांडोबा देई राजीनामा***
***पण***
***दुसऱ्याच दिवशी जाई कामा'***

संयुक्त महाराष्ट्राचा लढा पेटला होता. अत्र्यांनी तो भडकवला होता. बांदेकर एका एका काँग्रेसवाल्याचा बुरखा टराटर फाडत होते. विडंबनांनी नुसते घायाळ करीत होते. काही नमुनेच बघा-

१) नको नको मंत्र्या। गुंतू मायाजळी ।
काळ आला जवळी ग्रासावया
सह्याद्रीचा सिंह आला खवळून।
टाकील फाडून द्विभाषिक
काका आणि मामा दिल्या घेतल्याचे।
बा अंत काळीचे कोणी नाही
बाळोबा भारदे, आणिक मालोजी।
करतील जी जी स्वार्थासाठी।

२) द्विभाषिक काँग्रेसवाले । जगी त्यांचे हसे झाले। काय करिती एकादशी। अति खादाड अधाशी। मुखी विठ्ठलाचे नाम। खाती चोरून बदाम। टिळा टोपी (तुळशी माळ) घरच्या म्हातारीचे काळ। भाव मुखावर भोळा। थालीपीठावर डोळा। मंत्री संत्री सारे ढोंगी। चित्त नाही पांडुरंगी।।

३) फलटणच्या मोरा।
सासवडच्या चोरा। नाशिकच्या फितुरा
साताऱ्याच्या मुजोरा। बांगड्या भरा अहो बांगड्या भरा।।

४) त्रिंबकमामा त्रिंबकमामा । खाई थालीपीठ फुटाणा कुंथत कुंथत जाई विमाना। दिल्लीत जाऊन पडे उताणा।।

अनेक विनोदी कवितांना दत्तू बांदेकरांनी जन्म दिला आहे. स्वत:च्या व्यंगावरही त्यांनी विनोद केला आहे.

मेलो आता मला वाटले। महाभयंकर भूत भेटले
बघू लागले मला न्याहाळून। पाहून माझी मुद्रा भीषण
वळली त्याची बोबडीच पण। 'भूत भूत' ते म्हणू लागले
मलाच पाहून भूत पळाले।।

सामाजिक व्यंगात्मक कवितांची तर रासच पाडली होती. उदा.

'शाळेमध्ये रांग लागली। प्रवेश नाही हाऊसफूल्ल।
वर्गा वर्गामध्ये गर्दी। मास्तर म्हणती हाऊसफूल्ल।
पोरे आणिक पालक सारे। रखडत फिरती हाऊसफूल्ल।
*शाळांताचे विजयी बच्चे। मुर्च्छित पडले हाऊसफूल्ल।*
*अभ्यासाला पुस्तक नाही। पुस्तक विक्री हाऊसफूल्ल।*
*एक मिळे तर एक मिळेना। गडबड गोंधळ हाऊसफूल्ल।*
*बेकारीचे संकट वाटे। नसे नोकरी हाऊसफूल्ल।*
*मंत्री संत्री उदंड झाले। सचिवालयात हाऊसफूल्ल।*
*कोटीकोटी प्रजा वाढली। भारत झाला हाऊसफूल्ल।*
*अवनी गगनी विजनी आणि। सोनापुरात हाऊसफूल।।''*

दत्तू बांदेकरांची अनेक भाषिते लक्ष वेधक ठरली आहेत. त्यातून व्यंगदर्शनाबरोबर त्यांच्या निरीक्षण शक्तीचेही दर्शन घडते.

१) देवळात आणि हॉटेलात स्त्रिया आणि छत्र्या नेहमीच हरवतात.

२) बायकांना बरोबर नेल्याशिवाय गर्दीत तिकीट मिळत नाही.

३) कुरूप वेश्या आणि खोटी नाणी रात्रीच चालतात.

४) प्रेम हे एखाद्या चित्रपटासारखे आठवड्यापेक्षा जास्त काळ टिकत नाही.

५) पोलीसापेक्षा बायकोचे ऐकावे. सुरक्षितपणाच्या दृष्टीने अधिक शहाणपणाचे असते.

६) स्त्री ही इस्त्रीसारखी आहे. एकदा बिघडली की कायमची बिघडली.

७) मोटार ही स्त्रीसारखी असते. क्षणाक्षणात तिचा तोल सुटतो आणि कितीही आवरले तरी काबूत राहत नाही.

८) लग्नाच्या बायकोला घेऊन कोणी टॅक्सी उडवीत नसतो.

९) बेकारी ही स्त्रीसारखी आहे. आज आहे उद्या नाही.

१०) तीन तोंडाचा दत्त, दहा तोंडाचा रावण पण एकापेक्षा जास्त तोंडाची (स्त्री) बाई असल्याचा दाखला कुठेही नाही.

११) बाप कोळसेवाला म्हणून मुलगी काही काळी निघत नाही.


१२) रडगाण्याला आधुनिक मोफत भावगीत म्हणतात.

**काही बांदेकरी व्याख्या पहा-**

१) सण - कर्ज काढण्याचा दिवस २) पगार - वेळेवर न मिळणारी वस्तू, ३) हुंडा - ज्यामुळे कुरूप मुलींची लग्ने होतात. ४) रस्ता - मोटारीखाली मरण्याची जागा. ५) घर - बायकोला अधून-मधून भेटण्याचे स्थळ.

४ ऑक्टोबर १९५९ पर्यंत विनोदाचा हा यज्ञ धगधगत होता. आचार्य अत्रे यांचे साथी म्हणून दत्तू बांदेकर (गौरविले गेले यातच केवढे मोठेपण आहे. 'पंचगव्य' या विडंबनात्मक संग्रहात आचार्य अत्रे यांच्या बरोबरीने त्यांची ३५ विडंबने समाविष्ट केलेली आहेत. पत्रकारितेतील ३५ वर्षे आणि विडंबनात्मक कवितांचे संकलनही तेवढेच हा बांदेकरी आयुष्याचा योगायोग नव्हे काय?





- प्रकाश पारखी
शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२
भ्रमणध्वनी- ९४२२३०३३०३

# ‘दुर्लक्षित बालरंगभूमी’

हॅलो! कोण, मोहन जोशी का?’’

‘‘होय! मी मोहन जोशी बोलतोय!’’

‘‘नमस्कार! मी प्रकाश पारखी बोलतोय!’’

‘‘कोण बालनाट्यवाले का?’’

‘‘हो बाल नाट्यवालेच! मी अमेरिकेतून बोलतोय! यावर्षी अमेरिकेत नाट्य संमेलन होतय हे वाचून आनंद झाला! त्याबद्दल तुमचे अभिनंदन! योगायोगाने माझ्या वैयक्तिक कामाकरता मी अमेरिकेत आलो आहे. संमेलनात सहभागी होता आले तर आनंद होईल!

‘‘अमेरिकेत बालनाट्य वगैरे काही नाही. त्यामुळे इथे बालनाट्य वगैरे होणार नाही. याविषयी परीसंवादही नाही.’’

‘‘नाही. मला नाट्य परिषदेचा एक सदस्य म्हणून सहभागी व्हायला आवडेल. त्याकरिता काय करायला पाहिजे?’’

‘‘नाही, अजून ते सगळ नीट ठरायचय....???’’

अमेरिकेत न्यू जर्सी येथे नाट्य संमेलन झाले. त्याविषयी वर्तमानपत्र, व दूरचित्रवाणी वाहिन्यांवरून भरभरून वर्णनं आली. ते संमेलन कसे पार(?) पडले हे सर्वांनाच माहीत आहे. मी अमेरिकेत असूनही त्या संमेलनात एक प्रेक्षक म्हणूनही सहभागी होऊ शकलो नाही, त्याबद्दल ना खंत ना खेद. पण बाल रंगभूमीविषयी असलेली उदासीनता पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवली. १९७८ साली मी नाट्य संस्कारची स्थापना केली ती बालरंगभूमी समृद्ध व्हावी, विकसित व्हावी, या उद्देशाने. त्यासाठी नाट्य शिबिरे घेतली. व्यक्तिमत्त्व विकासालाही ती उपयुक्त ठरली आणि त्यामुळेच प्रतिसाद वाढत गेला.

अनेक बालनाट्ये सादर केली. त्यातही नवनवीन प्रयोग केले. त्यातून आजचे अनेक आघाडीचे कलाकार निर्माण झाले. तर काही डॉक्टर, इंजिनियर व उद्योगपतीही झाले. ही सर्व मंडळी भेटल्यावर नमस्कार करतात. आपल्या आजच्या यशामध्ये नाट्य संस्कारचा वाटा आहे, असा नम्रपणे उल्लेख करतात. पण फक्त एवढच! फक्त उल्लेख! त्याच्याशिवाय पुढे जाऊन ही बालरंगभूमी समृद्ध करण्याकरिता आर्थिक, शारीरिक योगदान देणे, निदान मानसिक तरी आधार देणे हेही यांना जमत नाही. बऱ्याच मोठ्या साहित्यिक, कलाकारांना भेटल्यावर त्यांचे संवाद ठरलेले असतात. ‘‘मुलांसाठी लिहिणे फार अवघड असते. त्यांच्याकडून करून घेणे तर फारच अवघड. खरंच तुमचं काम मोठं आहे.’’ वगैरे वगैरे! पण प्रत्यक्षात वेळ आल्यावर बालसाहित्य ना? हा किरकोळ प्रकार आहे. बक्षीसाच्या शासकीय रकमेतसुद्धा त्याचा शेवटी नंबर. गेली अनेक वर्षे बालरंगभूमीचे प्रश्न तेच आहेत. समस्याही त्याच आहेत. कारण सर्वांनीच केलेले दुर्लक्ष.

खरं तर ‘कला’ हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग. अनेक विचारवंतांनी यावर अनेक विचार मांडले आहेत. माणसाला फक्त दोन वेळेचे जेवण आणि कपडे आणि घर मिळालं की झालं! असे नाही! जंगलात राहणारा गरीब आदिवासी असो वा वातानुकुलीत फ्लॅटमधील शहरातील नागरिक असो. चांगले चित्र, चांगले संगीत याची त्याला ओढ असते. आवड असते. प्रत्यक्षात निर्मितीची किंवा आस्वादाची ही ओढ माणसाला स्वस्थ बसू देत नाही. मानवी जीवनातील हा एक महत्त्वाचा भाग आहे. त्याचे शिक्षण लहानपणापासून द्यायला नको का? आज दूरदर्शनच्या चॅनलच्या माध्यमातही आपण पाहतो की कितीतरी बाल कलाकार चमकतात. त्यांना व्यासपीठ मिळाले, मार्गदर्शन मिळाले तर मोठ्या कलाकारांपेक्षा ते लोकप्रिय होतात. असे असूनही शिक्षणात अभ्यासक्रमात त्याचा समावेश असूनही आपण सारे त्याकडे दुर्लक्ष करतो.

आता दुर्लक्ष कोण कोणत्या पातळीवर आणि कसे होते ते पाहू. अभ्यासक्रमात ६ कलांचा समावेश गेली अनेक वर्षे आहे. २००६ ते २००९ या चार वर्षात १ली ते ८ वी चा अभ्यासक्रम बदलला आहे. कला विषयाच्या समितीवर मी काम केले आहे. याविषयाच्या प्रत्येक इयत्तेच्या हस्त पुस्तिका बालभारतीने प्रकाशित केल्या आहेत. त्याचे नाव आहे ‘पालक शिक्षक हस्त पुस्तिका.’ इयत्ता १ली ते ८ वी त्यातील नाट्य विषयक उपक्रम मी सुचवलेले आहेत. प्रत्यक्षात अनेक शिक्षकांना व बहुसंख्य पालकांना अशा पुस्तिका काढल्या आहेत हे माहीतही नाही. मग त्यानुसार शाळेत शिकवणे हे तर ५ टक्के शाळेत सुद्धा नाही. शासनाच्या धोरणानुसार कला शिक्षणाला ४०% महत्त्व व

बाकी काही विषयांना ६०% महत्त्व असूनही प्रत्यक्षात १ टक्का सुद्धा विद्यार्थ्यांच्या पदरात पडत नाही. वार्षिक स्नेह संमेलनात ठराविक मुलांना मिळणारी संधी, काही शाळांत तर संमेलनही नाहीत. आंतर शाळेत नाट्यवाचन, नाट्य, गायन, वक्तृत्व, कथाकथन, पाठांतर स्पर्धा एवढेच काय ते सांस्कृतिक, त्यातही शाळेतील दोन तीन मुलेच स्पर्धेला पाठवतात. काही स्पर्धात संख्येला बंधन नसते तरीही शाळा मुलांना, पालकांना प्रवृत्त करत नाही आणि पालकही अभ्यास सोडून कशाला या गोष्टी हव्या म्हणून दुर्लक्ष करतात. हाही एक शिक्षणाचा भाग आहे. या कलामुळे त्याच्या अभ्यासालाही मदत होते हे पालकांच्या लक्षातच येत नाही.

शाळेबाहेर किती पालक आपल्या मुलांना कलास्वाद घ्यायला लावतात? चांगले सांस्कृतिक कार्यक्रम दाखवणे, चांगले विचार, नाटके, संगीताच्या मैफली, नृत्याचे कार्यक्रम मुलांना दाखवणे पालकांना का शक्य होत नाही? चांगली बालनाट्ये खरं तर पालकांनीही मुलांसोबत बघावी. मुले त्यावर कशी प्रतिक्रिया व्यक्त करतात, हे पाहणेही पालकांचे काम आहे. पालकांनी बालनाट्य पाहिल्यामुळे त्याबाबतचा दर्जा, मुलांनी पाहावे असे आहे का? त्याचा मुलांवर होणारा परिणाम होणारे संभाव्य धोके यापासून त्याला सावध राहता येते. परंतु नाटक पालक पाहत नाहीत. मुलांना पाठवतात आणि मोकळे होतात. त्यामुळे बालरंगभूमी दुर्लक्षित व उपेक्षित राहिली आहे. मोठ्या नाटकालाही प्रेक्षक कमी होऊ लागला आहे, अशी तक्रार ऐकू येते. पण मुळात लहानपणीच बालनाट्ये पाहिली नाही तर उद्याचा प्रेक्षक कसा तयार होणार? मोठ्या रंगभूमीला जसे अनेक कलाकार बालरंगभूमीने दिले आहेत तसा प्रेक्षक वर्ग तयार करण्याचे काम ही बालरंगभूमी करत असते. त्यामुळे बाल रंगभूमीकडे दुर्लक्ष झाल्यामुळेच आज मराठी नाटकाला प्रेक्षक वर्ग निर्माण झाला नाही असे वाटते. व्यक्तिमत्त्व विकासाला नाटकाचा उपयोग होतो आणि नाटक ही सर्व कलांना सामावून घेणारी कला आहे. त्यात साहित्य, संगीत, नृत्य आणि चित्र शिल्प सुद्धा सामावली जातात. बालनाट्य पाहूनही मुलांवर चांगले संस्कार होऊ शकतात. स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती यांची वाढ होते. मोठ्यांच्या नाटकाप्रमाणे, जाहिरात, नाट्यगृह भाडे, संगीत, प्रकाश योजना यांचा खर्च येतो पण तिकीट मात्र कमी ठेवावे लागते. त्यामुळे आर्थिक नुकसान सहन करून बालनाट्य प्रयोग करत राहणे सर्वांनाच परवडत नाही. शाळांनी खरं तर या उपक्रमाला सहकार्य केले पाहिजे. शाळेच्या सभागृहात काही बालनाट्य प्रयोग आयोजित केले तर सादरकर्त्यांनाही सोयीचे होईल व विद्यार्थी प्रेक्षकांनाही त्याचा आनंद घेता येईल. शाळेसाठी काही निधी पण उभा करता येईल, पण शाळाही त्याबाबत उदासीन दिसतात.

महाराष्ट्र शासनाने ९ वर्षांपूर्वी राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धा सुरू केली. स्पर्धेच्या माध्यमातून काही कलाकार निर्माण झाले. लेखनही झाले. पण स्पर्धेच्या वेळी ५ रू., ३रू. तिकीट असूनही नाट्यगृह रिकामे असते. भाग घेणारे बाल कलाकारही इतर बालनाटके पाहत नाहीत. राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धात खेळणाऱ्या विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेत १० टक्के मार्क अधिक मिळतात पण राज्यस्तरीय स्पर्धात काम नसून बक्षीस मिळालेल्या विद्यार्थ्यास कोणतेही प्रोत्साहन नाही. 'बेस्ट फाईव्ह' च्या सरकारी धोरणात सुद्धा कला विषयाचा समावेश नाही. अशा सर्व पातळीवर दुर्लक्षलेला कला विषय!

लेखाच्या वाचनानंतर कुणाला लक्ष घालावे वाटले तर त्याचे स्वागत आहे.





- डॉ. मधुसूदन घाणेकर
काळा हौद चौक, शुक्रवार पेठ पुणे २
भ्रमणध्वनी- ९४२२०३५१३६


# सिनेतारकांचा सुवर्णकाळ

१९५० नंतर हिंदी चित्रपटसृटीचा सुवर्णकाळच सुरू झाला. नुकतीच 'मुगले आझम' चित्रपटास ५० वर्षे पूर्ण झाली. 'मुगले आझम' चित्रपट हा हिंदी चित्रपटसृष्टीच्या तारांगणातील कोहिनूरच ठरला. मधुबाला, नर्गिस, वैजयंतीमाला, नूतन, मालासिन्हा, वहिदा रहेमान अशा हुकमी सिनेतारकांना प्रभावी ग्रहांचे अनुकूल असे नेमके वरदान कसे लाभले होते, यावर टाकलेला एक दृष्टिक्षेप!



## मधुबाला

मधुबालाच्या पत्रिकेत कुंभ लग्न, कन्या रास, राजयोगकारक शुक्र व्ययात लग्नेश - व्ययेश शनिच्या युतीत पंचमेश बुध, लग्नी, त्याची सप्तमेश रविशी युती, सोबत राहू, शनि मंगळ




**मधुबाला : जन्म दिनांक : १४/२/१९३३**

षडाष्ट, मंगळ वक्री, चंद्र अष्टमात, चंद्राच्या षण्णत आणि व्ययात पापग्रह त्यामुळे अल्पायु योग. वयाच्या अवघ्या ३६व्या वर्षी सिनेतारांगणातला हा चमचमता तेजस्वी तारा निखळला गेला.

मधुबालाच्या पत्रिकेत लग्नी बुध राहूयुक्त आणि त्यावर सप्तमातील वक्री गुरूची दृष्टी, अष्टमात चंद्र, त्यामुळे मधुबालाचे शिक्षण काहीच झाले नाही. जेमतेम ३-४ इयत्ता शिकली असेल, तिचे कुठे हस्ताक्षरही उपलब्ध होऊ शकले नाही. मधुबालाच्या पत्रिकेत रवि मंगळ प्रतियुती आणि चंद्र शुक्र त्रिकोण योग आणि यामुळेच अत्यंत अल्प कालावधीत मधुबाला साऱ्या चित्रपटसृष्टीवर स्वत:च्या लोभस रूपाची आणि सहजसुंदर अभिनयाची मोहिनी टाकू शकली. चंद्र शुक्र त्रिकोण योग शुक्र - राजयोगकारक आणि सप्तमेश रवि लग्नी त्यामुळे तिचा 'सबकुछ' किशोर कुमारशी (चंद्र हर्षल प्रतियुती) प्रेमविवाह झाला. रवि मंगळ प्रतियुती ह्या प्रतिकूल ग्रहमानामुळे अवघ्या ३६व्या वर्षी कॅन्सरने 'मधुबाला' नावाचे एक मादक - दिलखेचक पर्वच संपुष्टात आले.

राजयोगकारक शुक्र शनिसह (लग्नेश) व्ययात. त्यामुळे दुलारी, हावडा ब्रिज, मिस्टर अँड मिसेस ५५, चलती का नाम गाडी, मुगले आझम आदी चित्रपटातील मधुबालाची अदाकारी अजरामर ठरली.


## नर्गिस

नर्गिसच्या पत्रिकेत वृषभ लग्न, कुंभ रास. पंचमेश बुध लग्नी शुक्राच्या राशित आणि सप्तमेश मंगळाचा शुक्राशी केंद्र योग, शुक्र मंगळाच्या राशित - सिनेअभिनेते सुनील दत्तशी





प्रेमविवाह पंचमेश बुध लग्नी गुरुच्या शुभयोगात आणि गुरूची पंचमस्थानावर दृष्टी. चतुर्थात नेपच्युन तृतीयेश चंद्राच्या प्रतियोगात तसेच शुक्र- नेपच्युन शुभ त्रिकोण योग, त्यामुळे सुपुत्र संजय दत्तही चित्रपट क्षेत्रात झळकत आहे. चतुर्थात नेपच्युन शुक्राच्या शुभयोगात, लग्नी रवि गुरू युती त्यामुळे 'मदर इंडिया' चित्रपटातील चरित्र अभिनेत्री म्हणून वठवलेल्या आईच्या भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ठ अभिनयाचा पुरस्कार मिळाला. लग्नी रवि गुरू,शुक्र मंगळ केंद्र, चंद्र नेपच्युन प्रतियुती. यामुळे नर्गिसचे चोरी चोरी, श्री ४२०, अंदाज हे चित्रपट सुवर्णमहोत्सवी ठरले. पंचमेश बुध लग्नी आणि शुक्र मंगळ केंद्र योग. यामुळे नर्गिसच्या उदात्त प्रेमदृश्यांनी साऱ्या चित्रपट शौकिनांना वेड लावले. पूर्णपणे एका प्रदीर्घ कालखंडावर, नर्गिसचा प्रभाव राहिला.





**नर्गिस : जन्म दिनांक : १/६/१९२९**


## मीनाकुमारी

तूळ लग्न
कर्क रास
राजयोगकारक शनि
चतुर्थात स्वराशित वक्री
भाग्यात शुक्र मंगळ युती
चंद्र शनि प्रतियुती
त्यामुळे पडद्यावर दु:खी भूमिका।
अधिक प्रमाणात वठवल्या,
'ट्रॅफिक क्वीन' म्हणून नावलौकिक

मीनाकुमारीने दिल एक मंदिर, साहेब बिवी और गुलाम, काजल, 'दिल अपना और प्रीत पराई' यासारखे अनेक चित्रपट मीनाकुमारीच्या 'ट्रॅफिक'च्या प्रतिमेची ग्वाही देतात. मीनाकुमारीच्या पत्रिकेत दशमात अमावस्या आणि प्रतियोगात वक्री शनि असल्याने, तूळ लग्न व भाग्यात शुक्र मंगळ युती असूनही ती कधीच चित्रपट शौकिनांची दिलकी धडकन होऊ शकली नाही. पंचमात राहू आणि भाग्यातील हर्षलमुळे मीनाकुमारी सततच पडद्यावर अपयशी प्रेमिका म्हणूनच वावरली. दशमातील अमावस्येच्या प्रतियोगातील शनिमुळे, 'मेरे अपने' चित्रपटातील आयुष्याच्या उत्तरार्धातील कारकीर्दीत चरित्र अभिनेत्रीचा अंतही दुर्दैवी पद्धतीने झाला. भाग्येश बुध लाभात रविच्या राशित गुरूच्या शुभयोगात त्यामुळे मीनाकुमारीची शेरोशायरी गाजली.




**मीनाकुमारी : जन्म दिनांक : १/८/१९३२**




## वैजयंतीमाला

जन्मदिनांक १३-८-१९३३
कुंभ लग्न,
वृषभ रास,
सप्तमात भाग्येश शुक्र,
नेपच्युनसह

चंद्र गुरू शुभत्रिकोण, सुप्रसिद्ध सिनेतारका आणि नर्तकी

लग्नेश शनि व्ययात. स्वराशित वक्री आणि लग्नी राहू. यामुळे राजकारणातही यश. कुंभ लग्न, वृषभ रास, शुक्र हर्षल त्रिकोण. यामुळे नृत्याचे वरदान, मधुमती 'ज्वेलथीफ'मधील नृत्यगीते यांची प्रचिती देतात. पंचमेश, बुधाच्या प्रतियोगात लग्नेश शनि, जोडीला शुक्र त्रिकोण या अनुकूल ग्रहमानामुळे वैजयंतीमालास सिनेअभिनेत्री म्हणून घवघवीत यश मिळाले. शुक्राच्या दशमात वृषभेचा चंद्र. यामुळे वैजयंतीमालास लोभस रूप प्राप्त झाले. गंगा जमुना, मधुमती, सूरज, लीडर, ज्वेलथीफ, संगम, देवदास, नया दौर आदी चित्रपटातील भूमिकांनी वैजयंतीमालाने हिंदी चित्रपट सृष्टीचा एक प्रदीर्घ कालखंड गाजवला. दिलीपकुमार, राजेंद्रकुमार, राजकपूर, देवानंद आदी अभिनेत्यांबरोबर वैजयंतीमालाच्या भूमिका विशेष गाजल्या.





**वैजयंतीमाला : जन्म दिनांक : १३/८/१९३३**



## नूतन

जन्मतारीख ४-६-१९३६
कन्या लग्न, वृश्चिक रास, भाग्यात भाग्येश शुक्र
लाभेश चंद्राच्या प्रतियोगात, सप्तमेश गुरूच्या प्रतियोगात
रवि मंगळ युती भाग्यात

अभिनयातील निखळ सौंदर्याने या अभिनेत्रीने हिंदी चित्रपटसृष्टीचा काळ गाजवला. नूतनच्या पत्रिकेत कन्या लग्न, वृश्चिक रास, वक्री गुरूच्या प्रतियोगात भाग्यात शुक्र, मंगळ त्यामुळे व्यक्तीमत्त्व सोज्वळ, सात्विक, सहजसुंदर अभिनय. कुठलीही भूमिका जिवंतपणे वठवण्याची क्षमता. प्रत्येक भूमिकेत नूतन अगदी सहजपणे आत शिरायची, त्या त्या भूमिकेशी समरस व्हायची. नूतन म्हणजे मध्यमवर्गीय स्त्रीचे एक मूर्तीमंत असे प्रतिनिधीत्व होते. रवि गुरूच्या प्रतियोगाने नूतनचे कर्तृत्व सिनेसृष्टीत देदिप्यमान ठरले. नूतनने भम्रणभूषण, राजकपुर, देवआनंद, सुनील दत्तपासून पार सरस्वतीचंद्रमधील मनीषबरोबर आणि शेवटी सौदागरमधील अमिताभपर्यंत प्रत्येक भूमिका मोठ्या ताकदीने साकार केली. सीमा, सुजाता, बंदिनी, मीलनमधील भूमिका ह्या केवळ तिच्यासाठीच होत्या इतक्या तिने त्या भूमिका जीवंतपणे साकार केल्या.




**नूतन : जन्म दिनांक : ४/६/१९३६**

नूतनच्या पत्रिकेत तृतीयस्थानी वृश्चिक रास तर तृतीयेत बुध, मंगळ भाग्यात भाग्येश शुक्रासह त्यामुळे तिच्या संवादफेकीत सहजता आणि वेळेचे अचूक प्रभावी तंत्र होते.



## मालासिन्हा


जन्मतारीख - १०/११/१९३६

सिंह लग्न कन्या रास, शुक्र मंगळाच्या राशित चतुर्थात तीन नवमांशात आणि , नेपच्युनच्या केंद्रात

लग्नेश रवि बुधासह तृतीयेत आणि त्याच्या लाभात नेपच्युन. हिंदी चित्रपटसृष्टी गाजवणारी अभिनेत्री.

मालासिन्हाच्या पत्रिकेत मंगळाच्या राशित चतुर्थस्थानी शुक्राचा नेपच्युनशी केंद्रयोग. त्यामुळे तिला मादकता लाभलेली. चेहऱ्यात गोडवा, बोलका चेहरा आणि सहज अभिनय. शुक्राच्या वरदानाबरोबरच पंचमातील गुरूमुळे तिला अमाप लोकप्रियता लाभली. जहाँ आरा, सुहागन, बहुरानी, गुमराह, धूल का फूल, अनपढ, हिमालय की गोदमें, फिर कब मिलोगी, धर्मपुत्र, मेरे हुजुर, मर्यादा, फॅशन, डिटेक्टिव्ह, माया, परवरिश, लव्हमॅरेज, मिट्टी में सोना, दुनिया ना माने, ग्यॅरह हजार लडकियाँ, उजाला, मैं नशेमें हूँ आदी डझनावरी चित्रपटात मालासिन्हाने हुकमी भूमिका साकारल्या. 'रोशन आरा' ह्या बंगाली चित्रपटाद्वारे मालासिन्हाचे पडद्यावर प्रथम आगमन झाले. बादशहा, एकादशी या सुरूवातीच्या चित्रपटातही ती गाजली. अशोककुमार, राजकपूर, राजकुमार, शशिकपुर, धर्मेन्द्र, संजय खान, जितेंद्र, राजेश खन्ना, संजीवकुमार, अमिताभ बच्चन आदी अभिनेत्यांबरोबर मालासिन्हाच्या वैशिष्ट्यपूर्ण भूमिका गाजल्या.

## वहिदा रहेमान




जन्मतारीख - ३-२-१९३८


मकर लग्न, कुंभ रास, रवि शुक्र युती लग्नी पराक्रमस्थानी शनि मंगळ युती, गुरू हर्षल केंद्र योग बुध नेपच्युन त्रिकोण योग.

सिनेतारका आणि नर्तिका. दोन्ही पातळीवर अद्वितिय यश. वहिदा रहेमानच्या पत्रिकेत लग्नी राजयोगकारक. शुक्र, शनि, गुरू युतीबरोबर त्यामुळे तिची कारकीर्द देदिप्यमान ठरली. तृतीयस्थानी मीन राशित शनि मंगल युती त्यामुळे तिचे पदलालित्य अभिनयाइतकेच लक्षवेधी ठरले. गाईडमध्ये वहिदा रहेमानची भूमिका नर्तिकेचीच होती. तृतीयेतील शनि मंगळ युतीने वहिदा रहेमानला संवादफेकीची शैली लाभली.

रवि गुरू युती लग्नी असल्याने वहिदा रहेमानला रेश्मा और शेरामधील भूमिकेसाठी नॅशनल अॅवॉर्ड मिळाले. भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीच्या वाटचालीत वहिदा रहेमानचा जो एक सुवर्णकाळ ठरला तो प्यासा, कागज के फूल, गाईड, चौदहवी का चाँद, तिसरी कसम, खामोशी, साहिब बिवी और मुलाम, नीलकमल, काळाबाजार, पालकी यासारख्या अनेक चित्रपटातील तिच्या अविस्मरणीय भूमिकांमुळेच.




मालासिन्हा : जन्म दिनांक : १०-११/११/१९३६




वहिदा रहेमान : जन्म दिनांक : ३/२/१९३८



- प्रा. अनिल गोरे
समर्थ मराठी संस्था, ७०५, बुधवार
पेठ, पुणे - ४११००२.
भ्रमणध्वनी - ९४२२००१६७१

# गणेशविद्या प्रसार चळवळ

मराठी मजकूर लिहिण्यासाठी सध्या जी चिन्हे लोकप्रिय आहेत त्या चिन्हांना मुळाक्षरे व जोडाक्षरे म्हणतात. या लोकप्रिय चिन्हसमूहाला देवनागरी लिपी म्हणतात. ही लिपी खुद्द गणेशाने बनवली अशी श्रद्धा आहे. व्यास आणि गणपती यांनी एकमेकांना घातलेल्या अटींमुळे ही दर्जेदार लिपी तयार झाली. मराठीसह काश्मिरी, संस्कृत, सिंधी, हिंदी, नेपाळी भाषांसाठी ही लिपी सर्वाधिक वापरात आहे. जगातील कोणतीही भाषा या लिपीत अधिक अचूकपणे लिहिता, वाचता येते.

महर्षी व्यासांना महाभारत लिहायचे होते. महाभारताची कथा सुचल्यावर हा ग्रंथ प्रचंड होईल, असे त्यांना जाणवले. एवढा प्रचंड ग्रंथ लिहायला तसाच जबरदस्त लेखक हवा होता. गणपतीच हे अवघड काम करू शकेल, हे व्यासांना माहीत होते. त्यांनी लेखनसहाय्य करायची विनंती गजाननाला केली. गणपती जेवढा बुद्धीमान तेवढाच खोडकर! ''भराभर आणि सतत सांगणार असाल तरच मी लिहीन. एकदा थांबलो की पुन्हा तुमचे हे काम करणार नाही.'' अशी अट त्याने व्यासांना घातली. गणपतीचा लिहिण्याचा वेग प्रचंड होता. महाभारत सांगताना श्वास घ्यायला तरी सवड मिळेल की नाही याची व्यासांना काळजी वाटू लागली.

बराच विचार केल्यावर महर्षी व्यासांना एक युक्ती सुचली. गणपतीने घातलेली अटही मोडणार नाही आणि महाभारत सांगताना आपल्यालाही थोडी उसंत मिळेल, असा उपाय त्यांना सापडला. त्यांनी गणपतीला सांगितले, ''हा नवा ग्रंथ नव्या लिपीसह लिहिला जावा, अशी माझी इच्छा आहे. आतापर्यंत कोणीही वापरली नाही अशी एक लिपी तू हा ग्रंथ लिहिताना वापर. तुझ्या बुद्धिमतेची, प्रतिभेची छाप विश्वावर रहावी, यापूर्वी वापरात असलेल्या लिप्यांपेक्षा अधिक उपयुक्त, अधिक सोयीची लिपी तू तयार कर. आपण जे उच्चारतो, तेच तंतोतंत लिहिले जाईल, अशी एक नवी आधुनिक लिपी तू निर्माण करू शकशील. त्याच लिपीसह तू महाभारत लिही.''

साक्षात बुद्धिदेवता असलेल्या गणेशाने हे आव्हान आनंदाने स्वीकारले. व्यासांनी उच्चारलेले शब्द काळजीपूर्वक ऐकून त्याने प्रत्येक उच्चारासाठी एकेक चिन्ह तयार केले. जोडाक्षरांचे उच्चार ऐकताना कोणते अक्षर अर्धे, कोणते पूर्ण ते नीट ऐकून त्यानुसार चिन्हे बनवली आणि लिहिली. याकरता विचार करताना गणेशाला अधूनमधून थोडे-थोडे थांबावे लागे. व्यासांना त्यावेळी थोडीशी उसंत मिळायची. या लिखाणाच्या वेळी बावन्न अक्षरे तयार झाली. यात सोळा स्वर, तर छत्तीस व्यंजने आहेत. सोळा स्वर मानवी मुखातील स्पंदनाने निर्माण होतात. मानवी पाठकण्याच्या तेहेतीस मणक्यांच्या स्पंदनाने तेहेत्तीस व्यंजने निर्माण होतात. काही व्यंजनांच्या संयुक्त उच्चाराने तीन संयुक्त व्यंजने तयार होतात. प्रत्येक मानवी मणक्याशी एकेक मराठी मुळाक्षर जोडलेले आहे. केवळ ऐकलेल्या आवाजावरून संबंधित उच्चार मुखातल्या की मणक्यातल्या स्पंदनापासून उगम पावला हे समजणे अतिशय अवघड आहे. श्रीगणेशाकडे ही शक्ती आहे, हे माहीत असल्यानेच महर्षी व्यासांनी गणपतीची लेखनिक म्हणून निवड केली असावी. जितके वेगवेगळे उच्चार आहेत तितकीच स्वतंत्र अक्षरचिन्हे गणपतीने बनवली. या चिन्हांनाच मुळाक्षरे म्हणतात. यापासूनच गणेशाने जोडाक्षरेही तयार केली.


महाभारत लेखनाच्या निमित्ताने श्रीगणेशाच्या हातून ध्वनीवर आधारित उत्तम लिपी तयार झाली. खुद्द गणेशाने बनवलेली ही लिपी आपण वापरतो म्हणून 'जसा उच्चार तसे लिहिणे' आपल्याला मराठीत जमते! मानवी शरीरातील उच्चारक्रियेशी थेट संबंधामुळे ही लिपी अचूक लिहायला व वाचायला अतिशय सोयीची ठरत असावी. देवाने तयार केली व नागरिक वापरतात म्हणून ही लिपी 'देवनागरी' या नावाने प्रसिद्ध झाली. या लिपीत बावन्न मुळाक्षरे आहेत तर पृथ्वीवरील वर्षही बावन्न आठवड्यांचे आहे. गणेशविद्या पृथ्वीवरील मानवी अस्तित्वाशी घट्टपणे जोडलेली आहे, हे लक्षात येते.

कागदाचा वापर होण्यापूर्वी वनस्पतींच्या अवयवांपासून बनलेल्या पानांवर लिखाण केले जात असे. उत्तरेत भुर्जपत्रावर लिखाण केले जाई. दक्षिणेत भुर्जपत्रे उपलब्ध नसल्याने ताडपत्रांचा वापर होत असे. भुर्जपत्रे आकाराने उभी असतात. उच्चारभेदांसाठी श्रीगणेशाने योजलेली वेलांटी, रफार, मात्रा, अनुस्वार, चंद्र, अर्धचंद्र वगैरे चिन्हे अक्षराच्या वर आणि उकार, रूकार, रकार, नुक्ता वगैरे चिन्हे अक्षरांच्या खाली देणे या उभ्या पानांवर सोयीचे ठरते. उभे तीन स्तर असलेली देवनागरी लिपी उत्तरेत लोकप्रिय झाली. दक्षिण भारतीय मुळाक्षरे मराठीशी साम्य दाखवत असली तरी उच्चारभेदांसाठी योजलेली चिन्हे मुळाक्षरांच्या डावी-उजवीकडे जोडतात. ताडपत्रे आडवी असल्याने त्यावर लिहिताना ही चिन्हे अक्षरांच्या डावी-उजवीकडे देणे सोयीचे ठरते. याचमुळे दक्षिणी

भाषांतील लिखाण आडवे पसरट असते. ताडपत्रांना रूंदी जास्त तर उंची कमी म्हणून दक्षिणी भाषांच्या लिपीत शिरोरेखाही नसतात.

गणेशाने तयार केलेली ही देवनागरी लिपी गणेशविद्या म्हणूनही ओळखतात. मुलांच्या शालेय शिक्षणाच्या प्रारंभाला 'श्रीगणेशा' असे म्हणतात! केवळ धार्मिक नव्हे तर वैज्ञानिकदृष्ट्याही देवनागरी लिपी हे जगाला मिळालेले वरदान आहे. जगातील कोणत्याही भाषेतील कुठलाही उच्चार लेखी नोंदवण्यासाठी इतर लिप्यांपेक्षा देवनागरीत कमी अक्षरे व कमी जागा लागते. सर्व जगाने ही गणेशविद्या (देवनागरी लिपी) वापरली तर जगातील कागदाचा वापर ६०% कमी होईल. संपूर्ण जगातील जंगलतोड ६०% कमी तर शाईमुळे होणारे शिशाचे प्रदूषणही ६०% कमी होईल. जगभर संपर्क असणाऱ्या भारतीयांनी गणेशविद्येचा प्रसार सर्व देशांत करायला हातभार लावला पाहिजे.

भारतीयांनी तर प्रत्येक कामात ही लिपी वापरली पाहिजे. ज्या भाषांसाठी देवनागरी लिपी वापरतात त्यापैकी मराठीसाठी सर्वात कमी अक्षरे लागतात. महाराष्ट्रभर कोणत्याही दुकानात, घरात, उद्योगात, पत्रकावर, पुस्तक, पावती, जाहिरात, फलक यासाठी मराठी भाषा, मराठी शब्द वापरल्यास छपाई खर्च कमी होईल. मराठी शब्द-वाक्ये-अंक व संख्या इंग्रजी शब्द-वाक्य-अंक व संख्यांपेक्षा लहान असल्याने बोलणे, लिहिणे, वाचणे या क्रिया लवकर होतात. जे व्यावसायिक मराठी शब्द व अंक वापरतात, त्यांचे काम कमी वेळात होते. त्यांचा नफा वाढतो. देवनागरी लिपी, मराठी शब्द, मराठी अंक यांचा वापर केल्याने गणेशाची कृपा तर होईलच, पण शिवाय लक्ष्मीचीही कृपा होईल. गणेशभक्तांना या कृपेचा लाभ होईलच. नास्तिकांनीही पर्यावरण रक्षणासाठी इंग्रजीचा वापर पूर्ण बंद करून देवनागरी लिपीसह मराठी भाषेचा वापर करावा. निसर्ग पृथ्वीच्या रक्षणासाठी श्रीगजानन सर्वांना अशी बुद्धी देवो, ही प्रार्थना!




'साहित्य चपराक'च्या सर्व वाचकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



मा. ना. शरदचंद्रजी पवार





मा. ना. अजितदादा पवार

**श्री. तानाजी खेडकर**

■ उपाध्यक्ष : पश्चिम हवेली राष्ट्रवादी काँग्रेस ■ कार्याध्यक्ष : जोशी समाज समिती, महाराष्ट्र राज्य
■ उपाध्यक्ष : भटके विमुक्त जाती-जमाती सेल, पुणे ■ अध्यक्ष : अष्टविनायक मित्र मंडळ, वारजे माळवाडी

**सौजन्य : ओम कन्स्ट्रक्शन**
मातोश्री निवास, अष्टविनायक चौक, वारजे माळवाडी
पुणे ४११ ०५२, भ्रमणध्वनी : ९८८१३८१२१९



- डॉ. सुभाष सावरकर
जनसाहित्य भवन,
गणेश कॉलनी, अमरावती.
भ्रमणध्वनी : ९८६०४५१०७५

# 'सर्वधारां'चे तीर्थक्षेत्र: जनसाहित्य

जननिष्ठ जाणिवेने जीवनवास्तवाचा घेतलेला कलात्मक वेध' म्हणजे जनसाहित्य होय. या व्याख्येतील 'जन', 'जननिष्ठा', 'जननिष्ठ जाणीव' यांना गेल्या २४ वर्षांच्या चिंतन प्रक्रियेत विशिष्ट अर्थ प्राप्त झाला असून, 'कलात्मकता' या संज्ञेलाही जनसाहित्य विचारात प्रचलित अर्थाहून निराळा असा अर्थ प्राप्त झाला आहे. वरील परिभाषिक संज्ञांचे जंजाळ बाजूला सारल्यास 'जनसाहित्य हे माणसातील माणुसकी जागविणारे साहित्य' असा साधासरळ अर्थ सांगता येतो.

'जननिष्ठा' म्हणजे धर्म-जात-वर्ग-पंथ-लिंग आदी भेद न मानणाऱ्या निखळ माणसावरील - अर्थात माणुसकीवरील अभंग निष्ठा होय. दलित जनांविषयी कळवळा, ग्रामीण जनांविषयी अनुकंपा, आदिवासी भटक्यांविषयी करूणा किंवा स्त्रीजनांविषयीची कणव यांचबरोबर शोषकांनी चालवलेल्या अन्याय- अत्याचाराविरूद्धचा संताप, विद्रोह हे पोटात घेऊनच माणुसकी उभी राहत असते. मात्र तिची महत्ता एकेका गटविशेषाचा वा व्यक्तिविशेषाचा नव्हे; तर त्या मागच्या प्रवृत्तीचा गौरव अगर निषेध करण्यात असते. म्हणून वरील समाजगट हे जसे जनसाहित्याला आपले वाटतात तसाच 'अभिजन' गट देखील आपला वाटतो. अर्थात जनसाहित्य विचाराचा विरोध अभिजन गटाशी वा अभिजन जातवर्गीय व्यक्तीशी नाही; तर तो 'अभिजनवादी', 'अभिजनधार्जिण्या' (म्हणजे प्रस्थापित वर्चस्ववादी) प्रवृत्तीला आहे. ही साधी बाब अनेक विद्वानांना मात्र पचविता आलेली नाही.

'जननिष्ठे'चा समाजसंस्कृतिनिष्ठ अर्थ हा गेल्या शतकात महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनप्रवाहात व साहित्यात तसाच संत गाडगे महाराज यांच्या जीवनकार्यात आढळून येतो. १९ व्या शतकात जोतिबा व सावित्रीबाई फुले यांच्या साहित्यातून तसेच जीवनकार्यातून व त्यामागच्या संत तुकाराम, एकनाथ, कबीर, नानक, रविदास, ज्ञानेश्वर, नामदेव, चक्रधर, बसवेश्वर, गोरक्षनाथ यांच्या मध्ययुगीन साहित्यातून तथा क्रांतिगर्भ कार्यातून ही जननिष्ठा प्रतीत होते. त्याही पलीकडच्या तथागत बुद्ध, महावीर, लोकायतिक, औपनिषदिक, वैदिक ऋषीमुनींच्या चिंतन, दर्शन व कृतींमधून 'जननिष्ठे'ला प्रस्तुत असा 'माणुसकी'चा किंवा मानवी शहाणपणाचा वारसा भारतीयांना लाभला आहे. हाच वारसा राष्ट्रसंतांच्या जीवनकार्यात 'आधुनिक राष्ट्रनिष्ठ मानवधर्म' व गाडगेबाबांच्या जीवनकार्यात 'रोकडा मानवधर्म' म्हणून प्रस्फुटित झालेला दिसतो. जनसाहित्य विचाराला वरील साऱ्या क्रांतिकारी जननायकांचे मार्गदर्शन लाभले आहे; ते राष्ट्रसंत तुकडोजींच्या सर्वगुणसमन्वयक व्यक्तित्वातून, कर्तृत्वातून, साहित्यातून व चिंतनातून. त्यांच्या चिंतनात प्राचीन भारतीय दर्शनांसोबतच समाजवाद, मार्क्सवाद, विज्ञानवाद, विवेकवाद, साम्ययोग आदी आधुनिक विचारप्रणाली मुरल्या असून, त्यातून एक आगळावेगळा समाजप्रवर्तक मूल्यव्यूह घडून आला आहे. ज्याच्या केंद्रस्थानी निखळ 'माणूस' आहे. हा मूल्यव्यूव्ह समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यासोबतच ते ज्याच्या माध्यमातून घडवून आणायचे, त्या माणसातच बदल घडवून आणणारा आहे. या देशात स्फुरण पावलेले व हजारो वर्षांपासून जनांनी शिरोधार्य मानलेले - इतकेच नव्हे तर जनमनात खोलवर रूजलेले भूमिनिष्ठ प्रेरणांचे साधेसरळ पण तितकेच मौल्यवान असे देशीय शहाणपण राष्ट्रसंत तुकडोजींच्या माध्यमातून जनसाहित्य विचारास लाभले असून, त्यांच्या 'ग्रामगीता' या युगग्रंथातील कल्पदृष्टीच्या आधारे 'जनसंस्कृती' ही संकल्पना जनसाहित्याने पुरस्कारली आहे. या कल्पदृष्टीची बांधिलकी समग्र मानवतेशी -माणसाच्या माणुसकीशी आहे; एखाद्या विशिष्ट समाजगटाशी नाही. ती धर्म-पंथ-जात-लिंग आदी भेदांच्या पलीकडे जाण्यासाठी माणसाला समग्र परिवर्तनाची प्रेरणा देणारी आहे. अशाप्रकारे जनसाहित्यिकाची बांधिलकी ही समग्रलक्ष्यी मानवतेशी असल्यामुळे व लक्ष्य निखळ मानवकल्याणाचे असल्यामुळे जनसाहित्य हे हेतुगर्भ बांधिलकीचे साहित्य असूनही समग्रलक्ष्यी जीवनदर्शन घडविण्याचे शिवधनुष्य पेलू पाहते.

ऐतिहासिक परिप्रेक्ष्यात मराठी साहित्याची न्याहाळणी केल्यास अगदी प्रारंभापासूनच (लीळाचरित्र) जनसाहित्याची निर्मिती होत आलेली दिसते. नामदेव व त्यांची प्रभावळ, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, बहिणाबाई, दासबोधकार संत रामदास हे मध्ययुगीन संतकवी, शिवपेशवेकालीन निवडक बखरकार व शाहीर, तसेच आंग्लकाळात जोतीराव-सावित्रीबाई, पद्मनजी, भालेकर, केशवसुत, हरिभाऊ हे जनसाहित्यिक असून, आधुनिक काळात विनोबा, सानेगुरूजी, व्यंकटेश माडगूळकर, अण्णा भाऊ साठे, राष्ट्रसंत तुकोडोजी महाराज यांच्या साहित्यात

जननिष्ठेच्या पाऊलखुणा स्पष्टपणे प्रतीत होतात. या जनसारस्वतांना अभिजन साहित्याने पुरस्कारलेल्या साहित्यमूल्यांचे बंधन न पाळता जनजीवनाच्या सहानुभूतिपूर्ण दर्शनात व विधायक कल्पदृष्टीद्वारा घडवून आणावयाच्या जाणीवप्रवर्तनात साहित्याची इतिकर्तव्यता मानली. अलीकडे साठोत्तर मराठीत उदयास आलेल्या नऊ-दहा पुरोगामी (परिवर्तनवादी) साहित्यप्रवाहांनी सुद्धा आपापल्या जनविभागणी अस्मिता जागविण्याचा प्रयत्न चालविला असून, त्यासाठी प्रस्थापित साहित्यमूल्यांची फारशी पर्वा केली नाही. मात्र, आपापल्या गटसापेक्ष जाणिवांची व्यवच्छेदकता अधिकाधिक प्रखर व टोकदार बनविताना जो आग्रही अभिनिवेश त्या त्या प्रवाहात आला, त्यातून समाजविघटनाची बीजे पडू लागली आणि मराठी साहित्यात विभाजनवादी कुंपणे उभी होऊ लागली.

विविध जनविभागांच्या परिवर्तनवादी साहित्यप्रवाहांना एकात्मतेच्या सूत्रात ओवणे म्हणजे त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभवविश्वाचे वा रूपसिद्धीचे कंगोरे नष्ट करून त्यांचे सपाटीकरण करणे नव्हे, तर त्या सर्वांना साधारण ठरतील, अशा साकल्यात्मक मूल्यनिकषाच्या आधारे त्या सर्व प्रवाहामधील साहित्यकृतींचे मूल्यमापन करणे व त्यांच्यातील 'जननिष्ठे'च्या प्रमाणानुसार त्यांना जनसाहित्यत्व बहाल करणे होय.

जनसाहित्य हा साहित्याचा आदर्श असून, जनसाहित्य चळवळ ही सर्व परिवर्तनवादी साहित्यप्रवाहांना त्या आदर्शाप्रत नेणाऱ्या सिद्धीचा शोध घेत आहे. खरे म्हणजे वरील सर्व प्रवाहांतील साहित्यनिर्मितीच्या तळाशी झुळझुळणारा अंत:प्रवाह हा मानवजातीच्या कळवळ्याचा व कल्याणकारी परिवर्तनाचा असून, जनजीवन - अभिमुखता व जनजीवन निष्ठा ही त्याची गमके होत. एकेका गटसाहित्यप्रवाहाद्वारे प्राप्त होणारे आंशिक जीवनसत्य सकल मानवी जीवनजाणिवांच्या संदर्भात जोखण्याकरिता सर्वव्यापी अंत:सूत्र पुरविणे आणि एकांगी होऊ पाहणाऱ्या साहित्यप्रवाहांना व्यापक जनकल्याणाच्या दिशेने प्रवाहित करून त्याद्वारे जनसंस्कृतीच्या संरक्षण - संवर्धनाचा मार्ग प्रशस्त करणे - हे जनसाहित्य चळवळीचे प्रयोजन तथा प्रत्यक्ष कार्यही आहे. जनसाहित्य अन्य सर्व साहित्यप्रवाहांमध्ये ठसठशीतपणे उमटून दिसेल असा पृष्ठीय प्रवाह नाही; तर त्या सर्व परिवर्तनवादी प्रवाहांच्या तळाशी संथपणे झुळझुळणारा मानवहितैषी अंत:प्रवाह आहे व तो निखळ मानवनिष्ठेचा पक्षघर आहे.

साठोत्तर व त्यातही १९७५ च्या आगेमागे शरश्चंद्र मुक्तिबोध, बाबुराव बागुल, दया पवार, प्र. इ. सोनकांबळे, नारायण सुर्वे, शंकरराव खरात, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने, केशव मेश्राम, भ. मा. परसवाळे, आनंद यादव, विश्वास पाटील, अनिल अवचट, वामन इंगळे, आशा बगे, कमल देसाई, गौरी देशपांडे आदींनी आपापल्या प्रदत्त समाजविभागनिष्ठ जीवन जाणिवांची कुंपणे पार करून जनसाहित्य निर्मितीचा ओघ कायम राखला.

**जनसाहित्याची संकल्पना :** जन म्हणजे भेदकारी उपाधींपलीकडचा निखळ माणूस असून, जनतत्त्व म्हणजे असे निखळ माणूसपण किंवा मानवी सत्त्व (माणुसकी) होय. निखळ माणुसपणाच्या सामर्थ्यावर लेखकाची निष्ठा म्हणजे 'जननिष्ठा' असून, तिचा संबंध लेखकाच्या जाणिवेशी अभिप्रेत आहे. जननिष्ठा हे लेखकाच्या आत्मनिष्ठेचे अहंनिष्ठेपासून विकसित होत आलेले प्रगल्भ रूप होय. लेखकाची जाणीव ही नेणिवेच्या संजीवक स्पर्शाने सर्जनशील बनलेली जाणीव असून, हीच जीवनवास्तवाचा वेध घेत नव्या जीवनार्थांना नव्या शब्दरूपात जन्म देत असते. जनसाहित्य विचारात कलात्मकता म्हणजे संप्रेषणसिद्धी होय. सुघटता ही या सिद्धीची पूर्वअट आहे. सुघटतेचा संबंध अर्थगर्भ आशयबीजाच्या सहजविकासाशी व त्यातून साकार होणाऱ्या प्रकृतिसिद्ध रूपाशी आहे. ही 'प्रकृती' जनअभिरूचीने प्रभावित असते. जनअभिरूची ही जनसंस्कृतीची देणगी असून, या जनसंस्कृतीचे संरक्षण - संवर्धन करण्यासाठीच जनसाहित्यकृतीचे प्रयोजन असते. यातले 'संरक्षण' म्हणजे परदेशी इझम्स नाकारून एतद्देशीय (जननिष्ठ) जीवनादर्श स्थापित करणे; तर 'संवर्धन' म्हणजे जनसामान्यांची अभिरूची विकसित करणे व सन्मानित करणे होय.

श्रद्धा ही केवळ एक भावनिक अवस्थाच नसते; तर एक ऊर्जास्त्रोतही असते. तिला योग्य वळण देऊन तिचे युगसंवादी उन्नयन करून समाजात परिवर्तन घडवून आणता येते. हे वळण परंपरेतील क्रांतिकारी जननेत्यांच्या जीवनचिंतनातून प्रेरणा व मार्गदर्शन स्वीकारून करता येते. (फुल्यांचे 'अखंड,' राष्ट्रसंताची 'ग्रामगीता', बाबासाहेबांचे 'बुद्ध आणि त्याचा धम्म' ही अशी नवी श्रद्धास्थाने होत.) अशा या व्यापक 'जननिष्ठ' भूमिकेमुळे सर्व काळांमधील पुरोगामी जननिष्ठ साहित्यकृतींना व्यापक परिप्रेक्ष्यात गौरविण्याची क्षमता जनसाहित्य विचारात आली आहे.

'जन' ही संज्ञा विभाजनात्मक नसून, साकल्यात्मक आहे. 'दलित', 'ग्रामीण', 'जनवादी', 'स्त्रीवादी', 'आदिवासी' इ.च्या लक्षण - संज्ञाप्रमाणे ती केवळ विवक्षात निदर्शक (वर्णनात्मक) राहत नाही. तर साकल्यात्मकतेमुळे ती साहित्यमुल्यात्मकही होते. सकल जनांमधील 'जनतत्त्वा'ला आवाहन करणारे व सकलजनांना जीवाभावाने जपावेसे वाटणारे असे जनहितकार, जीवनाभिमुख साहित्य म्हणजे जनसाहित्य ठरते. साकल्याचा प्रदेश संकुचित करणारी विभाजनात्मक प्रवृत्ती ही 'जन'द्रोही ठरते. विशिष्ट जात-वर्ग वर्णाची संसस्कारसमष्टी ही देखील

त्याच कारणाने जनद्रोही / जनविरोधी ठरते. जनसाहित्य विचारात पोथीनिष्ठेला स्थान नाही. जनविरोधी अहंनिष्ठा, अलगाववादी फुटीरता किंवा उपाधिसिद्ध अहंमन्यता याही बाबी जनद्रोही होत. तसेच अमुक एका किंवा दोघातिघा जननायकांच्या प्रेरणाच तेवढ्या पुरोगामी मानून विशिष्ट सामाजिक/ राजकीय/ वा वाङमयीन चौकटीत बंदिस्त होण्याची प्रवृत्तीही जनद्रोहीच होय.

जनांच्या सार्वभौमत्वाची सनद असणाऱ्या जनसाहित्याच्या बाबतीत केवळ परिवर्तनवादी असणे पर्याप्त नसते; तर हे परिवर्तन 'जननिष्ठ' असावे लागते. अफाट जनतेवर सत्तेची पकड कायम राखण्याकरिता जोपासलेल्या विषमतावादी प्रवृत्तीविरूद्ध व तिच्या समर्थक व्यवस्थांविरूद्ध जनसाहित्य विचाराची मांडणी आहे. त्याला अभिजनसंस्कृतीच्या विरोधात जनसंस्कृतीच्या पक्षधरांनी दिलेल्या सांस्कृतिक संघर्षाचा संदर्भ आहे. म्हणूनच जनत्व, जननिष्ठा, जनव्यापी आवाहन, संप्रेषण, जनसंस्कृती संरक्षण व संवर्धन हे जनसाहित्याचे मूल्यगमक म्हणून पुढे येतात; व आजपर्यंतचे साहित्यमूल्यनाचे प्रस्थापित मूल्यनिकष अप्रस्तुत ठरू लागतात, कारण ते अभिजनवादी / विभाजनवादी व्यवस्थेचे समर्थक, संरक्षक व संवर्धक असतात.

सर्वच प्रचलित साहित्यप्रवाहांमधील सामंजस्याचे मुद्दे जनसाहित्य चळवळीला महत्त्वाचे वाटतात; वैमनस्याचे नव्हेत; कारण वैमनस्य हे त्या त्या प्रवाहाच्या व्यवच्छेदक जाणिवांमधून आलेले असते व विवेकनिष्ठ भूमिकेतून आग्रह / अभिनिवेश यांचा निचरा झाला म्हणजे प्रत्येक प्रवाहातून जनसाहित्याचीच वाट प्रशस्त होणार असते.

**जनसाहित्य समीक्षाविचार :** जनसाहित्यकृती म्हणजे लेखकाचा जननिष्ठ आत्मविष्कारच असून, तो भाषा माध्यमातून प्रकट होत असल्यामुळे जनव्यापी आवाहन - संप्रेषणाच्या दृष्टीने भाषिक संघटनेचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. साहित्यकला ही मनोगोचर अशा संवेदन - स्मृतींच्या चेतकांवर आधारलेली कला आहे. त्यात प्रस्तुत ठरणाऱ्या संवेदना या भावनार्थयुक्त असतात. म्हणून भाषामाध्यमातील भावनार्थयुक्त संवेदनास्मृतींच्या संघटनेचा अभ्यास साहित्यमूल्यनाच्या दृष्टीने अपरिहार्य ठरतो.

साहित्य व्यवहार हा साहित्यकृतीची निर्मिती, तिचे भाषाशरीरातील अस्तित्व व तिची वाचकाला येणारी प्रचिती या त्रिविध अंगांनी सिद्धीस जातो. ही तिन्ही अंगे परस्परांवर प्रभाव पाडीत हा व्यवहार गतिमान करतात. जनसाहित्यात तिहींची योग्य बूज राखून साकल्यात्मक मानवनिष्ठ दृष्टीतून साहित्यकृतीची गुणवत्ता जोखण्यात येते.

त्यापैकी निर्मिती विचारात जाणीव व नेणीव यांच्या फलदायी संघातून कार्यान्वित होणारी संश्लिष्ट जाणीव शोधून या जाणिवेची जननिष्ठता पडताळण्यात येते. निर्मात्याचे आवाहन लक्ष्य, निर्मितीचे प्रयोजन, निर्मात्याची जीवनदृष्टी व अखेरीस त्याच्या जाणिवेची जननिष्ठता या क्रमाने ही पडताळणी होते.

आशयाचे घटक असलेल्या विविध भावनार्थांचे संघटन हे लेखकाच्या जीवनदृष्टीच्या अनुरोधानेच होत असल्यामुळे साहित्याचे झटितिप्रत्ययी रूप हे जीवन दृष्टीशरण मानले जाते. भावनार्थांच्या त्यानुरूप झालेल्या मांडणीमुळे साहित्यवस्तूत सौंदर्याच्या शक्यता उपस्थित होतात; व त्या शक्यतांचा आस्वाद स्वतःच्या पूर्वानुभवांच्या बळावर वाचक घेतो. म्हणजेच तो वस्तुनिष्ठ सौंदर्याचा व्यक्तिनिष्ठ पातळीवर अनुभवनिष्ठ आस्वाद घेतो. जनसाहित्य विचारात 'सौंदर्य म्हणजे अवयवांचा अवयवाशी चैतन्यपूर्ण मनोहारी मेळ' असून, 'मनोहारी' या पदातील मन हे आस्वादकाचे असल्यामुळे हे सौंदर्य जननिष्ठ असल्याची पडताळणी आस्वादकाच्या प्रतीतीच्या अनुरोधाने करावी लागते.

अस्सल साहित्यकृतीच्या जननिष्ठ आवाहन - संप्रेषण सामर्थ्यापुढे आस्वादकाचे पूर्वग्रह क्रमाक्रमाने मावळत जाऊन त्याची जाणीव जननिष्ठेकडे ओढली जाऊन त्याची आस्था जागी होते. ही एकप्रकारे आस्वादकाची सर्जनशील अवस्थाच असते; मात्र लेखकनिर्मित म्हणून परायत्त अशा जनसाहित्यकृतीच्या अनुरोधाने ती त्याच्या अनुभवास येत असते. हा सर्जनशील अनुभव नेणीवेत झंकार निर्माण करून जाणीवप्रवर्तन घडवून आणतो. या प्रवर्तनक्षमतेची जननिष्ठता तपासावी लागते. संप्रेषित होणाऱ्या अनुभवाची विशालता, सखोलता, प्रगाढता व जाणीवप्रवर्तनाची जननिष्ठता या क्रमाने आस्वादातील जननिष्ठा जोखावी लागते.

जी साहित्यकृती निर्मिती, स्वरूप व आस्वाद या तिहींत जननिष्ठ असेल तिला जनसाहित्यकृतीचा दर्जा द्यावा लागेल. मात्र, अशी ही जनसाहित्यकृती किती प्रमाणात श्रेष्ठ कृती आहे हे तिने जनसंस्कृती संवर्धनात दिलेल्या योगदानावरून ठरविता येते. वरील पद्धतीने केलेल्या श्रेणीबद्ध विश्लेषणातून तिच्याबद्दल मूल्यविधान करता येते.

अशाप्रकारे मराठीतील सर्व महत्त्वाच्या साहित्यकृतींची प्रतवारी लावता येऊ शकते. अर्थात, उपरोक्त प्रतवारी ही जनसंस्कृतीसापेक्ष राहील.

**जनसाहित्य निर्मिती : ठळक प्रवृत्ती -** चळवळीच्या आतल्या किंवा चळवळीबाहेरच्या लेखक - कवींनी निर्माण केलेल्या जननिष्ठ जाणिवांच्या साहित्यकृतींमधून काही सर्वसाधारण प्रवृत्तींचा आढळ होतो. उदाहरणार्थ - अगदी मध्ययुगीन साहित्यापासून थेट समकालीन वर्तमान साहित्यापर्यंत धांडोळा घेतल्यास-

या साहित्यातील ईश्वरविषयक कल्पना इहनिष्ठ असल्याचे (म्ह. पारलौकिक नसल्याचे) ध्यानात येते. 'जनी जनार्दन' पाहण्याची व जनांनीच पूजा बांधण्याची ही प्रवृत्ती होय.

दुसरी ठळक प्रवृत्ती प्रयत्नवादाच्या पुरस्काराची दिसून येते. नियतिवाद अव्हेरण्याची; वारंवार अपयश आले तरी ना उमेद ना

होता जीवन संघर्षास पुन:पुन्हा सामोरे जाण्याची ही प्रवृत्ती होय.

तिसरी ठळक प्रवृत्ती द्वेषावर प्रेमाने मात करण्याची आहे.

त्याचबरोबर उत्स्फूर्त भाषा व अकृत्रिम शैली यांच्याद्वारे मानवी भावभावनांचे, इतकेच नव्हे तर मानवी महत्तेचेही दर्शन जनसाहित्यातून थेटपणे घडविण्याची प्रवृत्ती ही ठळक आहे.

जनसाहित्यकृतीतील आणखी एक ठळक प्रवृत्ती म्हणजे अतिरेकी चित्रणे अगर वृथा गौरवचिन्हे त्यागून साध्यासरळ मांडणीत वास्तवाचे दर्शन घडविण्याची होय.

**मराठी सारस्वताला योगदान :** मराठी साहित्याच्या उगमापासून सारस्वत घडविले ते याच प्रवाहाने. मध्यंतरीच्या काळपट्ट्यांमध्ये काही बुडबुडे जरूर निर्माण झाले; पण ते लवकरच विरूनही गेले. जनसाहित्य प्रवाह मात्र वाहताच राहिला. मराठीतील बहुतेक सर्व श्रेष्ठ साहित्यकृती या जननिष्ठ प्रवाहाशी निगडित असून, मध्ययुगीन कालखंडापासून त्या कालोत्तीर्ण होत आल्या आहेत. इतकेच नव्हे तर समकालीन साहित्यातील सर्वच श्रेष्ठ साहित्यकृती या (जननिष्ठ) प्रवाहाशी नाते सांगणाऱ्या आहेत.

एकंदरीत 'जनसाहित्य प्रवाहा'ने मराठी सारस्वताला पुढील योगदान दिल्याचे दिसते -

१) साहित्य हे जनाभिमुख असण्याचा ध्रुवात्मक निकष दिला.

२) लेखकांना साहित्यनिर्मितीची जननिष्ठ दृष्टी दिली.

३) रसिक वाचकाच्या आस्वादाला जननिष्ठेची व्यापक दृष्टी दिली.

४) जननिष्ठेच्या निकषावर समीक्षेची त्रिस्तरीय व्यवस्था तोलण्याचा मंत्र दिला, तसे तंत्रही दिले.

५) परिवर्तनाच्या प्रेरणेला जननिष्ठेचा सुदृढ आयाम दिला.

६) साहित्यव्यवहारास जनसंस्कृतीच्या निकोप समृद्धीची दिशा दिली.

**जनसाहित्य : भवितव्य -** समाजातील आर्थिक - धार्मिक गुंडगिरीचा, पंथीय - पक्षीय फुटीरतेचा दाब जसजसा वाढत जाईल तसतसे या चळवळीतील लेखकमन क्रमाक्रमाने 'जन'दृष्टी अनुसरत समाजन्याय व बंधुतेच्या जवळ जाऊ लागेल व जननिष्ठ जाणिवेतून साहित्यनिर्मितीस उद्युक्त होत जाईल. त्यातून अधिकाधिक सक्षम (जननिष्ठ) साहित्यनिर्मिती होत जाईल. चळवळीबाहेरल्या - म्हणजे अन्य समकालीन साहित्यप्रवाहांतल्या लेखकांचीही प्रवृत्ती जनसाहित्य निर्मितीच्या दिशेने अग्रेसर होईल, कारण वाचकही अंतत: सार्वत्रिक आवाहनकारी साहित्याकडे अधिकाधिक आकृष्ट होत असलेला त्यांना जाणवेल. या दोन्ही निर्मितीस्रोताच्या आंतरक्रियेतून जनसाहित्य समृद्धीस योग्य वातावरण लाभेल व परिणामत: अन्य प्रवाहांच्या साचलेपणातून जनसाहित्य निर्मितीला विकसित होण्यासाठी अधिक मुक्त व अनुकूल असा अवकाश लाभेल. उद्याच्या जागतिकीकरणाच्या वातावरणात या भवितव्यतेचा विचार करू जाता, बहुजिनसी समाजाच्या विविध घटकांच्या जाणिवांमध्ये इष्ट परिवर्तन घडवून समाधिष्ठित एकजिनसी मानवसमाज निर्माण करणे हे जनसाहित्याचे ध्येय जागतिकीकरणाच्या सकारात्मक बाजूशी अनुरूप असेच दिसते. कारण प्रदेशोप्रदेशीची भूमिनिष्ठ गुणवैशिष्ट्ये व कृतिपर संस्कारसमष्टी जपणाऱ्या विविध भाषिक समूहांनी समता - बंधुतेच्या पातळीवर परस्परपूरकतेच्या भूमिकेतून परस्परविनिमय साधणे हेच जागतिकीकरणाचे सकारात्मक रूप होय.

मात्र प्रगत राष्ट्रांनी बेईमानीने जागतिकीकरणाचे धोरण स्वत:च्या स्वार्थासाठी वापरून धनसत्तेच्या बळावर अप्रगत राष्ट्रांच्या संस्कृतींना चिरडून टाकण्याचा प्रयत्न चालविला तर त्या त्या भाषेतील जनसाहित्य हे त्या त्या राष्ट्रांच्या भाषिक संस्कृतीची अस्मिता प्रखर करीत नेणारे व त्यांना व्यापक 'जन'हितार्थ संघटित करून चोख भूमिका निभावणारे जनक्रांतिनिष्ठ हत्यार सुद्धा ठरणार आहे आणि ''जगातील समस्त जनांनो, मानवी सत्त्वरक्षणार्थ एकत्र व्हा!'' अशी क्रांतीची ललकारी देण्याचे बळही त्या त्या भाषेतल्या एकात्म अशा जनसाहित्यातच निर्माण होणार आहे.

**(लेखक 'अक्षरवैदर्भी' या मासिकाचे कार्यकारी संपादक आहेत.)**


WITH BEST COMPLIMENTS FROM...

OM STEEL

Tmt Steel, Channel, Angle, Bar's, Ambuja Cement, Sand, Tiles, Cement Sheets etc.

S. R. No. 146, Behind Cosmos Bank,
Pashan, Pune - 411 021
Tel. 020-25896565
Cell : 9822306052,
Fax : 020-25896565


Prop. Nimhanbandhu



- प्रभाकर तुंगार
४०८, नारायण पेठ, 'दत्तात्रय सदन'
मुंजाबाचा बोळ, पुणे - ३०.
भ्रमणध्वनी - ९०९०४६०८६

# अफलातून दानधर्म
## (कथा)

संस्कृत भाषेत एक श्लोक आहे. श्लोक न देता त्याचा अर्थ सांगतो. माणसांनी उद्योग करण्याच्या बाबतीत मांजराचा आदर्श ठेवावा. मांजराकडे जन्मत: गाय नसते पण ते उद्योग करून रोज दूध पिते. माणसाने उद्योग केला म्हणजेच व्यापार केला (नोकरी नव्हे) की त्यामुळे तो भरभराटीस येतो. भरपूर पैसा आडका मिळवितो. जो धनवंत असतो, त्याला जगात फार मानसन्मान असतो. 'जो वरी पैसा तो वरी, मानसन्मान घरीदारी' हे जसे खरे तसे 'नो मनी तो पुसेना कोणी' हे सुद्धा खरे. एकूण काय धनवंताला लोक अतिशय अगत्याने, आग्रहाने समारंभाला बोलवतात. अध्यक्षाच्या खुर्चीवर बसवतात. हार-तुरे घालतात. सामाजिक कार्यासाठी त्याच्याकडून भरपूर देणगी मिळावी, अशी अपेक्षा असते. धनवंताच्या दानावर मदतीवर मोठमोठी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक कार्य उभी राहतात.




नुकताच गावात एका गणपती मंदिराच्या उभारणीचा कार्यक्रम झाला. भक्तगणांची कार्यक्रमाला गर्दी होती. त्या कार्यक्रमाला धनवान जयाशेटला अध्यक्ष म्हणून खास निमंत्रित करण्यात आले होते. तसेच पंडीत व्यास यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलविले होते. गणेशाची पूजा अर्चा कशी करावी, गणेशयागाचे महत्त्व काय, त्याचे फलीत काय, अथर्वशीर्ष म्हणल्याने जीवन कसे यशस्वी होते, देवालयात भजन, कीर्तन, प्रवचन इ. कार्यक्रमाचे आयोजन कसे करावे, इ. धार्मिक माहिती त्यांनी द्यावी म्हणून त्यांना विनंती केली होती. कार्यक्रम सुरू झाला. कार्यकर्त्यांनी मंदिराच्या बांधकामाची माहिती दिली आणि संयोजकानी पं. व्यास यांना गणेशमहती सांगावी, अशी विनंती केली.

पं. व्यासजी म्हणाले, "कोणत्याही कार्याच्या प्रारंभी आपण गणेशाला वंदन करून कार्यक्रम सुरू करतो. गणेश रिद्धी, सिद्धीची देवता आहे. तो सुखकर्ता आहे. दु:खहर्ता आहे. तो संकटांचा नाश करतो. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या सुरूवातीलाच गणेशाची आराधना केली आहे. सर्व संतांनी गणपतीची प्रार्थना करूनच कार्यारंभ केला आहे. आपल्या हिंदू धर्मात गणेशाला अनन्य साधारण महत्त्व आहे. त्याची उपासना करा. पण त्याच्याकडून अपेक्षा करू नका. निरपेक्ष सेवा करा. तो प्रसन्न होईल. त्याच्या मंदिराच्या उभारणीसाठी दान जरूर करा. पण अपेक्षा दूर ठेवून. काही लोक आपले नाव व्हावे म्हणून दान करतात. पण ते खोटे दान असते.

त्याला अजिबात यश नसते. याउलट काही धनवान दान करतात पण आपले नाव गुप्त ठेवतात. आपले नाव कोठेही येऊ देत नाहीत. त्यांची भरभराट होते. तोच खरा भक्त होय.''

पंडीत व्यासांचे भाषण झाल्यावर जयशेट उभे राहिले. ते म्हणाले, ''व्यास साहेबांच्या भाषणाने मी शहाणा झालोय. (त्यांना पंडित व्यास म्हणायचे होते. पण भाषणाची सवय नसल्याने ते त्यांना साहेब म्हणाले) फार भारावून गेलोय. त्यांच्या भाषणाचा मुद्दा म्हणजे स्वत:चे नाव कोठेच घालायचे नाय. घेऊ द्यायचे नाय. मी मंदिरांच्या प्रमुखाकडे पाच लाखाचा चेक देणगी म्हणून देतोय. अजून लागले तरी देईन. काळजी करू नका.'' सर्वांना देणगीचा आनंद झाला. पुढेही देणगीचे आश्‍वासन मिळाल्याने समाधान वाटले. लोकांनी कडाडून टाळ्या वाजवल्या. शेटजी हारतुरे घेऊन गाडीत बसून रवाना झाले.

दुसऱ्या दिवशी मंदिरातील प्रमुख बँकेत चेक भरायला गेले. तेव्हा बँकेतील चेक स्वीकारणाऱ्या सेवकांनी सांगितले, ''पाच लाखाच्या चेकवर सही नाही.''

प्रमुख तात्काळ शेटजींकडे गेले आणि म्हणाले, ''शेटजी, अहो गडबडीत चेकवर सही करण्याचे विसरलात.'' त्यावर शेटजी म्हणाले, ''मी खरा भक्त असून, माझ्या भाषणात जाहीर केले की माझे नाव कोठे येता कामा नये. मी बोलतो तसा वागतो. माझा व्यवहार चोख असतो. लांडीलबाडी नाही. खरा भक्त स्वत:चे नाव कोठेही घालत नाही, घालू देत नाही.''

सतत बदलत जाणे हे काळाचे स्वरूप आहे. तो प्रत्येकाला पटो न पटो बदल स्वीकारावाच लागतो. लहानपणी आपण जसे असतो तसे तरूणपणी नसतो. तरूणपणी जसे असतो तसे म्हातारपणी नसतो. विचार, आचार वर्तन हे काळाप्रमाणे बदलते. बदलावे लागते. आता सध्याचा काळच पहा ना. तो फार धावपळीचा आहे. तसेच त्या ओघात कुटुंब व्यवस्था बदलत चालली आहे. एकत्र कुटुंबाचे अस्तित्व संपत चालले आहे. नवरा बायकोला नोकरी केल्याशिवाय गत्यंतर नाही. एवढी महागाई वाढली आहे. गरजा वाढल्या आहे. पतीपत्नी दिवसभर घराच्या बाहेरच असतात. पशुपक्षी जसे अन्नासाठी दिवसभर फिरून रात्री घरी येतात. तसे माणसाचे झाले आहे. बाप-मुलाची तर सुट्टीच्या दिवशी भेट होते. 'अन्नासाठी जगदिशा आम्हा फिरविशी दाहीदिशा' अशी परिस्थिती झाली आहे.

मुलं पाळणाघरात आणि आईबाप वृद्धाश्रमात अशी समाजरचना होताना दिसते. बाळासाठी 'पाळणाघर' आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी 'वृद्धाश्रम' ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यांच्याकडे म्हातारपणी पाहण्यासाठी, त्यांना सांभाळण्यासाठी ठिकठिकाणी 'वृद्धाश्रम' निघत आहेत.

जनमानसाची गरज ओळखून एका सामाजिक संस्थेने शहराबाहेर निवांत ठिकाणी 'वृद्धाश्रम' उभारणी करण्याचे योजिले होते. त्यासाठी एक कार्यक्रम आयोजित केला होता. त्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून किसनशेट या मोठ्या उद्योगपतीला पाचारण केले होते. ते दानशूर व गरज ओळखून त्याठिकाणी आवश्यक ते दान करण्याबाबत प्रसिद्ध होते. उदा. शाळा बांधायची असेल तर ते पैसे न देता विटा, पत्रे, सिमेंट, लाकूड इ. देत. ते व्यवहारात अत्यंत धोरणी, कुशल होते. योग्य ठिकाणी योग्य दान हे त्यांचे व्रत होते. दान देताना त्या ठिकाणाचा, त्यांच्या ध्येय धोरणाचा विचार करून दान करत.

समारंभ सुरू झाला. सर्व कार्यकर्ते, समाजसेवक शेटजीच्या दानशूरतेबद्दल, दातृत्वाबद्दल भरभरून बोलले. त्यांचे दान गरजेप्रमाणे योग्य असते. ते कधीही अनाठायी दान करीत नाहीत, असे अनेक प्रमुख वक्त्यांनी सांगितले.

समारंभाच्या शेवटी किसनशेट बोलू लागले. ''माझ्या दानशूरतेबद्दल अनेकजण बोलले. तसेच मी अनाठायी दान करीत नाही याची माहितीही अगोदरच्या लोकांनी दिली. त्या सर्वांचा मी मनापासून आभारी आहे. ज्येष्ठ नागरिकांची जेवणखाण, राहणे, औषधोपचार याची व्यवस्थित सोय कुटुंबात होऊ शकत नाही. कारण कोणाला वेळ नाही. काळाच्या गरजेनुसार वृद्धाश्रम निर्माण झाले आहेत. त्यांना गरजेनुसार, वृद्धाश्रम चालावा म्हणून, माझी कायम आठवण राहावी म्हणून मी सुव्यस्थित यथायोग्य दान करणे, माझे आद्य कर्तव्य समजतो.'' उपस्थित श्रोत्यांनी शेटजींचे आश्‍वासन ऐकून भरभरून टाळ्या वाजवल्या. टाळ्यांचा गजर थांबल्यावर शेटजी शांतपणे म्हणाले, ''वृद्धाश्रमाची गरज ओळखून माझे सर्वस्व वृद्धाश्रमाला देत आहे.'' ते ऐकल्यावर लोकांना वाटले शेटजी केवढे उदार आहेत. आपले सर्वस्वच आश्रमाला देत आहेत. केवढे औदार्य! पुन्हा टाळ्यांचा कडकडाट. लोक उत्सुकतेने काय दान करतात हे ऐकण्याच्या मनस्थितीत होते. लोकांची उत्सुकता जाणून शेटजी म्हणाले, ''माझे जन्मदाते आईवडील वृद्धाश्रमाला देणगी म्हणून देत आहे. आता माझ्याकडे काही उरले नाही. त्यांचा कृपया स्वीकार करावा. त्यांची जपणूक करावी आणि माझा आदर्श धनवानांनी गिरवावा.''

भगवानदास शेटजींना बरेच वर्ष मूलबाळ नव्हते. त्यांची पत्नी जमुनाबाई अत्यंत धार्मिक. जप, उपवास, व्रत वैकल्यात ती दंग असे. शेवटी देवाला ती नवस बोलली. देव तिच्या नवसाला पावला आणि शेटजींना मुलगा झाला. शेटजींना जमुनाबाईंनी सांगितले की, ''माझ्या नवसाला देव पावला आणि आपल्या पोटी त्याने गुटगुटीत सुरेख पुत्र जन्माला घातले. मी नवस बोलले की

'मला मुलगा झाला. की त्याचं थाटामाटात बारसं करून त्याच्या पहिल्या वाढदिवशी तुला सोन्याचा पोशाख अर्पण करीन. माझ्या बाळाला आशीर्वाद दे की तो आयुष्यमान, गुणवान, भाग्यवान होऊ दे. आपल्याला देव पावला आहे. आपल्याकडे भरपूर धनदौलत आहे. आपण तयारीला लागू. एक वर्षात नवस फेडून देवाच्या ऋणातून मुक्त होऊ.''

शेटजी भगवानदास काळजीत पडले. एक वर्षात एवढा मोठा नवस फेडायचा म्हणजे काय तोंडच्या गप्पा आहेत? एवढा पैसा का खर्च करायचा? बायकोने परमेश्वराची खूप भक्ती केली. जप केला, उपास तापास केले. तेव्हा भक्ताच्या नवसाला पावणे देवाचे कर्तव्यच आहे. एवढ्यासाठी सोन्याचा पोशाख देवाला अर्पण करण्याची गरज काय? तो सोन्याचा पोशाख घालून देवीबरोबर थोडाच फिरायला जाणार आहे? तरी पण शेठाणी नवस फेडल्याशिवाय राहणार नाही. मुलाला जन्म देऊन मी बाप झालो आहे. नवस फेडण्यातून बाप जन्मी माझी सुटका होणे शक्य नाही. पण यातून सुटण्यासाठी काहीतरी युक्ती काढली पाहिजे. विचार करता करता शेवटी त्यांना एक नामी युक्ती सुचली. त्यांनी थाटामाटात बारस करून मुलाच नाव 'सोन्या' ठेवलं.

शेठाणीला नाव फार आवडल. 'सोन्या' म्हणून ती लाडानं त्याला हाक मारी आणि फार छान नाव ठेवलं म्हणून नवऱ्यावर खूष होती.

पहिल्या वाढदिवशी शेटजी जमुनाबाई नवस फेडण्यासाठी मंदिरात जायला निघाली. जाताना भगवानदास शेटजींना विचारलं, ''धनी, सोन्याचा पोशाख तयार आहे ना?'' शेटजी म्हणाले, ''सगळे तयार आहे. काळजी करू नकोस. तू खुषीत राहा, तू बघशीलच मी सगळं घेऊन तयार आहे. तू देवापुढे हात जोडून डोळे मिटून देवाचे ध्यान कर, डोळे उघडताच सोन्याचा पोशाख देवाला वाहिलेला दिसेल.''

देवळात गेल्यावर ठरल्याप्रमाणे जमुनाबाई देवापुढे डोळे मिटून उभ्या राहिल्या. थोड्या वेळात डोळे उघडून पाहतात तो काय एक कापडाचा साधा पोशाख आणि नारळ देवापुढे ठेवलेला दिसला.

त्यांनी शेटजीला विचारले, ''धनी अहो हा काय सोन्याचा पोशाख आहे? त्याशिवाय नारळही सोन्याचा घेणार म्हणालात तो नारळही साधाच आहे की,'' शेटजींनी शांतपणे बायकोला विचारले, ''आपल्या बाळाच नाव काय?''

''सोन्या''

''मग त्याचा पोशाख म्हणजे सोन्याचा पोशाख आणि त्याच्यासाठी घेतलेला नारळ म्हणजे सोन्याचा नारळ. तुझ्या म्हणण्याप्रमाणे फेडला की नाही नवस.''


थोडे कडक... थोडे भडक
'चपराक' म्हणजे 'दे धडक'

चतुरस्र
परखड
रास्त
कर्तव्यदक्ष

धडक - जुनाट, बुरसटलेल्या विचारांना, सर्व क्षेत्रात फोफावलेल्या समाजद्रोह्यांना!
चालू क्षणाबरोबर धावणारे, चुरचुरीत, चुरचुरीत, तरतरीत मासिक.

साहित्य चपराक

● स्थानिक ते जागतिक पातळीवरचा चटपटीत मजकूर ● समर्पक चित्रे, छायाचित्रे, व्यंगचित्रे ● उत्तम कागद, उत्कृष्ट छपाई ● वाजवी किंमत आणि 'जरा हटके' संपादनाची दुर्मिळ हिंमत

संपादक : घनश्याम पाटील
(लई जंक्शन मानूस!)

नवा विचार, नवा प्रकाश
हिरवी धरती, प्रसन्न आकाश...
हासत, नाचत, आनंद उधळीत आली दीपावली।
उजेडाच्या या उत्सवानिमित्त
आकाश कंदीलाच्या साक्षीने
आमच्या लखलखीत शुभेच्छा!
मानवतेची ज्योत तेवत ठेवणाऱ्या आपणा सर्वांना



मा. शरदचंद्रजी पवार
( केंद्रिय कृषीमंत्री )



मा. अजितदादा पवार
( जलसंपदामंत्री, महाराष्ट्र )

शुभेच्छुक



**मा. श्री. आबा सुतार**
सरचिटणीस, पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस


**सौजन्य : समस्त ग्रामस्थ मंडळ, सुतारवाडी,
अखिल एक गाव एक गणपती मंडळ, सुतारवाडी**



- विलास ज्ञा. पायगुडे
सिंहगडरोड, पुणे
भ्रमणध्वनी : ९९२२३०७५०४

# जन्म नामार्थ जाहला
## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

महाराष्ट्राची भूमी अनेक संतांच्या पदस्पर्शाने, त्यांच्या विचार-आचारांनी पावन झालेली भूमी आहे. ज्याप्रमाणे प्रत्यक्ष जीवनात संत भक्तांना मार्गदर्शन करतात, बोलतात, तसेच ते वागत असतात. त्यांचे आचरण शुद्ध असते. भगवंतांच्या प्रेमाने भरलेले असते. म्हणूनच ते संतपदाला पोहचतात. संतांचे जीवन भव्य, उदात्त असते.



भगवंताच्या नामाचा, नामस्मरणापासून भगवंताचा आत्मसाक्षात्कार होतो, याचे ज्ञान सर्वसामान्य भक्तगणांत निर्माण करून संतपदी विराजमान झालेले महान संत श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज! आपल्या प्रभावी प्रवचनांच्या माध्यमातून ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी जनसामान्यांना भक्तीचा, जीवनाचा मार्ग दाखविला. आपल्या जीवनात ते जसे वागले तसेच ते बोलले. आपण जे आचरण करतो, तेवढेच आपणास लोकांना सांगण्याचा अधिकार आहे असे ते नेहमी म्हणत असत. लोकांना नामस्मरणाचे महत्त्व पटावे, त्यांच्यात नामस्मरणाची आवड निर्माण होण्यासाठी त्यांनी जीवनभर कार्य केले. असे असले तरी महाराजांचे जीवन अनेक अलौकिक घटनांनी, दिव्य सामर्थ्यामुळे सिद्धयोगी महान संतपदाला पोहचले आहे.

श्री गोंदवलेकर महाराजांचा जीवनकालखंड इ.स. १८४५ ते १९१३ पर्यंतचा आहे. हा कालखंड अव्वल ब्रिटिश, इंग्रजी राजवटीचा, पारतंत्राचा काळ आहे. इंग्रजांनी अनेक नवनवीन शोध, सुधारणा, नवीन गोष्टी, संस्थांच्या स्थापना यातून जनतेला त्या अवलंब करण्यासाठी सुरू केले होते. त्यामुळे सामान्य जनता संभ्रमात होती. अशावेळी प्रपंचात राहूनही परमार्थात प्रगती करण्यासाठी भगवंताच्या नामस्मरणातून अखंड आनंद, योग्य दिशा मिळून जीवन साफल्याचा साधासोपा मार्ग दाखविण्याचे अलौकिक कार्य श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी केले.

आपल्या ६९ वर्षांच्या काळात त्यांनी विपुल तीर्थाटन केले. श्री गोंदवलेकर महाराजांना प्रवासाची विलक्षण आवड होती. वयाच्या बाराव्या वर्षापासून ते पंचेचाळीसाव्या वर्षापर्यंत त्यांनी बराच प्रवास केला. या प्रवासामधूनच त्यांना तत्कालीन समाजजीवन फार जवळून पाहण्यास मिळाले. प्रवचनाच्या माध्यमातून आपले विचार त्यांनी अनेक प्रांतात पोहचविले. उत्तरेकडील काशी, प्रयाग, अयोध्या - मथुरा, मध्यप्रदेशातील इंदूर, उज्जैन, महू, जवळपास सर्व महाराष्ट्रभर, कर्नाटक, गुजरात प्रांत या अनेक ठिकाणी श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी आपल्या कार्याचा प्रसार, नामस्मरणाचे महत्त्व समजावून सांगितले. याचा उल्लेख त्यांच्या चरित्रात वाचावयास मिळतो. महाराष्ट्रातील नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, महानुभव संप्रदाय, श्रीदत्त संप्रदाय या संप्रदायातील उत्तम गुणांचा संगम गोंदवलेकर महाराजांच्या व्यक्तीमत्त्वात दिसून येतो.

शके १८६६, माघ शुद्ध द्वादशीस १९ फेब्रुवारी १८४५ रोजी सकाळी गोंदवल्यास महाराजांचा जन्म झाला. महाराजांच्या वडिलांचे नाव रावजी, वडील विठ्ठल होते. तर आई गीताबाईंना रामभक्तीची ओढ होती. विठ्ठलभक्ती ही महाराजांच्या घराण्यात पूर्वापार पणजोबा, आजोबांपासून होती. महाराजांचे आजोबा लिंगोपंत आणि आजी राधाबाई दोघेही विठ्ठलभक्त होते. महाराजांचे आई-वडील, रावजी व गीताबाई दोघे पतीपत्नी सदाचारी, साधूसंताचा आदर करणारे, विरक्त वृत्तीचे होते. यामुळे यातूनच महाराजांच्या ठिकाणी विठ्ठलभक्ती व रामभक्तीचा अपूर्व संगम झाला होता. महाराजांचे पाळण्यातले नाव 'गणपती' असे होते. आजोबांचा गणूबाळावर अतिशय जीव होता. लहानपणापासूनच त्यांनी गणूबाळास शिकविण्यास

सुरूवात केली. अभ्यासाबरोबरच गणूबाळास लहानवयातच रामनामाची अत्यंत गोडी होती. अशा रामनामाच्या गोडीतूनच गणूबाळ शाळेला रामराम ठोकून अंतर्मुख होऊन नदीकिनारी जाऊन बसत असत. गुरूशिवाय ज्ञान नाही. गुरूप्राप्ती कशी करावी या विचारातूनच गुरूंच्या शोधासाठी त्यांनी काही मित्रांसोबत गोंदवले सोडून कोल्हापूरला जाऊन राहिले. तेथे भिक्षा मागून खाण्याचे न जमल्यामुळे मित्र गोंदवल्यास परत आले. शेवटी मित्रांमुळे गणूबाळांचा ठावठिकाण माहीत झाल्यामुळे, आजोबांनी गणूबाळांची समजूत घालून त्यांना घरी आणले. पुढे लग्नानंतर संसारात मन रमेल म्हणून गणूबाळांचे खातवळच्या श्री संभाजीराव गोडसे यांच्या मुलीशी लग्न लावून दिले. त्यांच्या पत्नीचे नाव भागीरथी, सासरी आल्यावर सरस्वतीबाई असे ठेवले होते. पण लग्नानंतरही त्यांचे मन फारसे संसारात रमेना. काही काळानंतर त्यांच्या आजी-आजोबांचेही निधन झाले. आजी-आजोबांच्या निधनामुळे गणूबाळांवर फार परिणाम झाला. गुरूभेटीच्या आंतरिक तळमळीमधून त्यांनी शेवटी आईला तसे सांगून, नेसत्या वस्त्रानिशी घर सोडले.

**गुरू श्री तुकामाई**

गुरूप्राप्तीसाठी गणूबाळांचा प्रवास सुरू झाला. वाटेमध्ये सतत नामस्मरण करीत असताना माधुकरी मागून दिवसांमागून दिवस पुढे जात होते. मिरजेचे अण्णाबुवा, अक्कलकोट श्री स्वामी समर्थ, हुमणाबादचे माणिकप्रभू, कलकत्याचे रामकृष्ण परमहंस, काशीचे तेलंग स्वामी अशा थोर साधुसंतांचा यात समावेश होता. या सर्व संत मंडळींनी गणूबाळावर प्रेमाचा वर्षाव करून 'तुला योग्य गुरू भेटतील' असा आशीर्वाद दिला. पण या सर्व थोर संतमंडळींना भेटूनही आपले गुरू भेटले नाहीत ही खंत त्यांच्या मनाला लागून राही. या मन:स्थितीत असताना समर्थ संप्रदायाचे सत्पुरूष रामकृष्ण महाराजांना भेटले व त्यांनी गुरूंचा ठावठिकाणा सांगितला. येहळेगावीचे तुकामाई चैतन्य हे आपले गुरू आहेत हे महाराजांना समजले.

महाराजांचे सद्‌गुरू तुकामाई चैतन्यांचा जन्म १८१३ साली काशीनाथपंत व पार्वतीबाई या गुणी दांपत्यांच्या पोटी झाला. लहानपणापासून अतिशय विलक्षण गुण त्यांच्यामध्ये होते. बाराव्या वर्षी त्यांना नाथपंथीय चिन्मयानंद या गुरूंचा लाभ झाला. योगाइतकेच त्यांनी भक्तीलाही महत्त्व दिले. नामस्मरण, अन्नदान व ईश्वराची भक्ती या गोष्टींवर त्यांनी भर दिला. 'सुखाने संसार करा पण परमेश्वरास विसरू नका' असा संदेश त्यांनी दिला. रामकृष्ण यांच्या सांगण्याप्रमाणे गणुबुवांची व श्रीतुकामाईची येहळेगावी भेट झाली. साक्षात गुरूमाऊलींची भेट झाल्याने गणुबाळ त्यांची मनोभावे सेवा करू लागले. तुकामाईही आपल्या भक्ताची परीक्षा पाहत होते. आपला शिष्य सर्व कसोट्यांतून पार पडल्यावर रामनवमीच्या दिवशी तुकामाईंनी गणुबुवांना अनुग्रह दिला.

'श्री राम जय राम जय जय राम' या त्रयोदशाक्षरी मंत्राचा अनुग्रह देऊन गणूबुवांचे नाव 'ब्रह्मचैतन्य' असे ठेवले. तेव्हापासून गणुबुवा श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज म्हणून ओळखले जाऊ लागले.

महाराजांना दीक्षा देताना तुकामाईंनी सांगितले की, ''प्रापंचिक लोकांना प्रचंचामध्ये परमार्थ कसा करावा हे शिकव. मंदिरांची स्थापना करून रामनामाचा प्रसार कर. माझे महत्त्व वाढविण्यापेक्षा समर्थांचे महत्त्व वाढव. लोकांमध्ये भजनाचे प्रेम निर्माण कर. दीनदुबळ्यांची सेवा कर. त्यांना मार्ग दाखव.'' आपले गुरू तुकामाईंच्या आदेशांचे महाराजांनी आयुष्यभर पालन केले.

पुढे तीर्थयात्रा करीत असताना दीर्घ उपासनेनंतर महाराज इंदु येथे प्रकट झाले. येथूनच नामप्रसाराचे कार्य त्यांनी सुरू केले. तीर्थयात्रा करीत करीत ते गोंदवल्यास परत आले. आपली पत्नी सौ. सरस्वतीबाईंना माहेरहून सन्मानाने परत आणून गृहस्थाश्रम सुरू केला. सरस्वतीबाईंसह त्यांनी आपले गुरू तुकामाईचे दर्शन घेतले. पण काही काळानंतर सरस्वतीबाईंचे निधन झाले. पुढे आईच्या आग्रहावरून आटपाडीच्या सखारामपंत देशपांडे यांच्या जन्मांध मुलीस पसंत करून तिच्याशी विवाह केला. महाराजांना प्रथम पत्नीपासून एक व दुसऱ्या पत्नीपासून झालेली तीन अपत्ये अल्पवयातच दगावली. त्यांनी या सर्व घटना, गृहस्थाश्रम विरक्तपणे स्वीकारला.

महाराज गोंदवल्यास परतल्यावरही त्यांचा प्रवास सतत सुरूच होता, कारण त्यांना प्रवासाची विलक्षण आवड होती. इ.स. १८८० मध्ये गुरू तुकामाईच्या आदेशाप्रमाणे त्यांनी पहिले राममंदिर गोंदवले येथे बांधले. पुढे इ.स. १९१३ पर्यंत महाराजांनी देशाच्या निरनिराळ्या भागात २७ राममंदिरे, ४ दत्तमंदिरे व ४ विठ्ठल मंदिरे स्थापन केली. या मंदिरांच्या माध्यमांतून रामनामाची उपासना त्यांनी सातत्याने वाढवित ठेवली. आजही हे कार्य अखंडपणे चालू आहे.

**कलाप्रेमी, आस्वादक श्री महाराज**

महाराजांना अनेक गोष्टींची आवड होती. श्री महाराज पोहण्यातही निष्णांत होते. घोड्यावर बसण्याची कलाही त्यांना अवगत होती. अवखळ घोड्यालाही ते आपल्या नियंत्रणात आणीत असत. जनावराला त्यांचा स्पर्श होताच, त्यांना वश होऊन महाराजांवर ते प्रेम करू लागत असे. स्वच्छ व वळणदार अक्षर त्यांना आवडत असे. महाराजांचे स्वत:चे अक्षरही सुंदर व वळणदार होते. मोठ्याने, स्पष्टपणे अर्थ समजून वाचण्याची त्यांना आवड होती. लहान मुलांवर त्यांचे प्रेम असे. त्यांच्या मनाप्रमाणे ते वागत, खेळत असत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी अभ्यासातही चांगली प्रगती करावी, असे ते मुलांना नेहमी

सांगत. श्री गोंदवलेकर महाराजांचे व्यक्तिमत्त्व मध्यम बांधा, पिवळसर गोरा रंग, भव्य कपाळ असणारी चेहेरेपट्टी, सरळ नाक, पांढरेशुभ्र दात, चमकदार डोळे, चेहऱ्यावर मंद स्मित असणारी तेजस्वी मुद्रा व विलक्षण वाणीचे सामर्थ्य असणारे होते असे त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट होते. श्री महाराज चोवीस तास लंगोटी घालीत असत. बऱ्याच वेळा कफनी, टोपी घालीत. कमरेस कधी कधी छाटी, धोतर, पीतांबर, उपरणेही असे. कपाळावर केशरी गंध लावून, काळी रेघ ओढीत असत. श्री गोंदवलेकर महाराज स्वत: कविता रचत आणि लोकांनी केलेल्या कवितांचा मोठ्या रसिकतेने आस्वाद घेत. कविता व गोड गळ्याच्या गायनाचीही त्यांना आवड होती. महाराज मारूतीरायांचेही सुंदर चित्र काढीत असत.

श्री गोंदवलेकर महाराजांना विद्वान माणसांपेक्षा अडाणी माणसे आवडत तरीही शिष्योत्तम ब्रह्मानंदांपासून ते व्यसनी माणसांपर्यंत सर्वांना महाराज समान वागणूक देत. एकच मनुष्य पूर्णत्वाला जाण्यापेक्षा, पुष्कळ माणसे थोडी-थोडी पुढे जाणे चांगले, असे ते मानीत असत. कोणताही, कसलाही मनुष्य त्यांचेकडे आला तरी त्यांनी कधीही कोणाचा अव्हेर केला नाही. प्रत्येकास सुधारण्यासाठीच त्यांनी प्रयत्न केला. महाराजांना श्रीमंतांपेक्षा गरीब, साधी माणसे आवडत असत. शहरात राहण्यापेक्षा खेडेगावात राहणे त्यांना आवडत असे. मुलांची,बुद्धीमान तरुणांची मने आकर्षित करून त्यांना लळा लावण्याचे, त्यांच्यात आपुलकी निर्माण करण्याचे विलक्षण सामर्थ्य महाराजांच्या ठायी होते. महाराजांना हिंदी, कानडी, तेलगू, संस्कृत भाषा उत्तम समजत असत. महाराजांकडे येणाऱ्या माणसांची ते छोट्या-मोठ्या गोष्टींमधून परीक्षा घेत असत व तो कोठे आहे याची प्रचिती त्यास आणून देत. गोंदवल्यास त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक माणसावर मात्र श्रीमहाराज पोटच्या पोराप्रमाणे प्रेम करीत. भक्तीचे, भगवंतावरील प्रेमाचे व नामाचे जीवनातील महत्त्व सांगताना महाराजांच्या वाणीत तेज निर्माण होत असे. त्याचबरोबर उत्तम, योग्य दृष्टांतही ते सहज पटवून देत असत.

श्री महाराजांना लौकिकाचा, प्रसिद्धीचाही मोह नव्हता. व्यासपीठावरील व्याख्यानाचाही त्यांना कंटाळा असे. श्री महाराज म्हणत असत - ''भगवंताच्या नामाला खरे महत्त्व आहे. सांगणारा कोणी का असेना. भगवंताचे खरे कार्य इतके प्रचंड आहे आणि आपल्या जीवनाचा काळ फारच थोडा आहे. या जगामध्ये आपण इतके क:पदार्थ आहोत की आपली प्रसिद्धी होऊ देणे अथवा ती करणे हा मूर्खपणा आहे.''

'मागच्या माणसांनी जे जे चांगले, उपयुक्त कार्य करून ठेवले आहे ते आपण का वाया घालवावे? चांगले जुने कायम ठेवून त्यामध्ये चांगल्या नव्याची भर घालावी' असे त्यांचे नेहमी सांगणे असे. त्याचबरोबर जीवन हौसेने जगण्यासाठी जीवनाला उंची व व्यापकता आणण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा. जीवन जगताना मात्र भगवंताच्या नामाला शेवटचा श्वास जाईपर्यंत सोडता कामा नये. स्त्रियांच्याबद्दल त्यांच्या मनात आदर होता आणि ज्या घराण्यातील स्त्रिया सुज्ञ असतात, ती घराणी चांगली चालतात असेही महाराज म्हणत असत.

**अन्नदान महत्त्वाचे दान**

महाराजांनी जी अनेक सामाजिक कार्ये केली त्यातील अन्नदान हे फार महत्त्वाचे दान आहे असे वेदात म्हटले आहे. आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक माणसाला श्रीमहाराज जेवायला घालीत. भगवंताचे नाम ते जितक्या मुक्तपणे घेण्यास सांगत असत तितक्याच मुक्तहस्ताने ते अन्नदान करीत. अन्नाने बुद्धी तयार होते. त्यामुळे प्रेमाने केलेला व प्रेमाने वाढलेला रामाचा प्रसाद (भाजी, भाकरी व आमटी) मंदिरात येणाऱ्या भाविकांनी मनापासून प्रेमाने खाल्ला पाहिजे असे त्यांना वाटत असे. महाराजांनी अन्नदान म्हणजे वंचितांवर केलेली दया नसून अन्नदानास सात्विक, धार्मिक, सामाजिक अधिष्ठान दिले होते. भुकेल्या माणसाच्या पोटात दोन घास घालावेत, त्यामुळे त्याचा आत्मा संतुष्ट होतो. या कल्पनेतील सहृदयता त्यातून अभिप्रेत होते. पंक्तीप्रपंचाची महाराजांना चीड होती. बऱ्याच वेळी सर्व मंडळींना जेवायला बसवून महाराज त्या सर्वांना प्रेमाने वाढीत असत व त्यांची जेवणे झाल्यावर मग आपण जेवायला बसत. पंढरपूरला जाण्यापूर्वी वारकरी आणि दिंड्या मंदिरात असताना श्री महाराज सर्वांचे प्रेमाने आदरतिथ्य करीत. पानावर बसल्यापासून जेवण सुरू होईपर्यंत 'जयजय श्रीराम जयजय श्रीराम' असे मोठ्याने म्हणण्याचा प्रघात श्रीमहाराजांनी सुरू केला.

नुसता प्रपंच चांगला करणे हेच मनुष्यजन्माचे ध्येय असू शकत नाही. मग तसे पाहता जनावरेही आपला प्रपंच करीत असतात. मनुष्याने भगवंताची उपासना करावी. त्यातूनच भगवंताची प्राप्ती होते. भगवंतावर मनापासून श्रद्धा असल्यावर सुखदु:खाची बाधा होत नाही. परमेश्वरावर आपली श्रद्धा ठेवून आपले कार्य करीत रहावे. त्यातूनच पुढे प्रपंचातील कष्टांचे सार्थक होते. भगवंताच्या उपासनेत नामासारखा सोपा उपाय नाही. म्हणूनच प्रत्येकाने नामाची कास धरावी, त्यातूनच त्याचे कल्याण होईल. हेच त्यांच्या शिकवणुकीचे सार होते. हे तत्त्व महाराजांनी स्वत: आचरणात आणले व मगच लोकांना सांगितले.

श्री गोंदवलेकर महाराजांचे परमभक्त व लेखक प्रा. के. वि. बेलसरे यांनी 'गोंदवलेकर महाराज आणि वाङमय' यात लिहिले आहे की, इ. स. १९१३ साली श्री क्षेत्र गोंदवले येथील रामनवमीचा उत्सव श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या

आयुष्यातील शेवटचा मोठा उत्सव होता. नऊ दिवस अखंड नामस्मरण चालू होते. दररोज कीर्तन, प्रवचन इ. गोष्टीही सुरू होत्या. जवळपास पाच हजार माणसे गोंदवल्यास रामनवमीच्या उत्सवास आली होती. नमस्कार करायला येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या पाठीवरून श्री महाराज हात फिरवीत. त्या भक्तगणांना महाराज सांगत, ''बाळ, भगवंताने प्रपंचामध्ये ज्या परिस्थितीत आपल्याला ठेवलेले आहे, त्या परिस्थितीत समाधान मानावे. भगवंताच्या नामाला कधी विसरू नये. जो नाम घेईल, त्याच्यामागे राम उभा आहे. नाम घेणाऱ्याचे राम कल्याण करतो. एवढे माझे सांगणे शेवटपर्यंत विसरू नका.''

***जयाचा जनी जन्म नामार्थ झाला।***
***जयाने सदा वास नामात केला।।***
***जयाच्या मुखी सर्वदा नामकीर्ती।***
***नमस्कार त्या ब्रह्मचैतन्य मूर्ती।।***

मार्गशीर्ष वद्य दशमीला, २२ डिसेंबर १९१३ पहाटे महाराजांनी श्रीरामाचे दर्शन घेऊन सुर्योदयापूर्वी गोंदवल्यातच वयाच्या एकूणसत्तराव्या वर्षी आपला देह ठेवला. आपल्या अवतार कार्यातील दिव्य, तेजोमय प्रवास गोंदवल्यातच संपविला. पण नाम हे चिरंतन आहे, त्याला समाप्ती नाही. नामाचा अखंड महिमा, त्यांचे नामप्रसाराचे कार्य सतत चालू राहिले आहे.

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी नामस्मरणाच्या साध्या, सोप्या मार्गातून लोकांच्या, भक्तांच्या मनात भक्तीभाव जागृत केला. रामनामाच्या महामंत्राने लोकांना मोठ्या प्रमाणात भागवतभक्तीला लावले व ती भक्ती अखंडपणे वृद्धींगत केली. श्री गोंदवलेकर महाराजांनी केलेले सामाजिक, धार्मिक परिवर्तन थोड्या वेगळ्या वाटेवरचे होते. महाराजांनी राममंदिरे, हनुमानमंदिरे, दत्तमंदिरे, शिवमंदिरांची स्थापना करून भारतीय संस्कृतीचे जतन केले. त्यांनी बांधवून घेतलेल्या मंदिरांची सोय त्यांनी त्या वेळेपासूनच केल्यामुळे त्यांच्या पश्चात कुठलाही वाद सहसा निर्माण झाला नाही.

श्री गोंदवलेकर महाराज हे ब्रह्मज्ञानी सिद्धपुरूष, साक्षात्कारी संत होते. महाराजांचे भ्रमण, तीर्थाटन मोठ्या प्रमाणावर होते. आपल्या जीवनातील शुद्ध आचरणाने, आदर्श वर्तनाने एका उत्कृष्ट सामाजिक नेत्याचा आदर्श त्यांनी लोकांपुढे, भक्तमंडळीपुढे ठेवला. आपल्या प्रवासात जागोजागी, महाराजांनी आपली शिकवण प्रवचनांद्वारे जास्त परिणामकारक रीतिने लोकांपर्यंत पोहचविली. प्रवचनांमधूनच नामसाधनेचे महत्त्व लोकांना समजावून सांगत. प्रवचनांच्या माध्यमातून अनेक तऱ्हेच्या कौटुंबीक, सामाजिक प्रश्नांची, अडचणींची उकल ते प्रभावीपणे करीत असत.

महाराजांनी प्रपंच सोडून परमार्थ करा असे कधीच सांगितले नाही. 'आधी प्रपंच करावा नेटका' हे सूत्र स्वत: अंगिकारले. मगच इतरांना सांगितले. प्रपंचाची आबाळ, हेळसांड करून परमार्थ करीत असाल तर तुम्ही कष्टी व्हाल. प्रपंच साधून परमार्थ करा. उत्तम गृहस्थाश्रमी व उत्तम परमार्थी यांचा योग्य संगम जीवनात कसा साधावा हे समाजास, भक्तगणांस स्वत:च्या उदाहरणाने दाखवून दिले. आपल्याबरोबर रामनामाचा प्रसार करण्यासाठी ब्रह्मानंद, आनंदसागर, डॉ. कुर्तकोटी यांच्यासारखे शिष्योत्तम घडविले. नामसाधनेचा प्रसार महाराष्ट्राबाहेर कर्नाटक, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश या राज्यातून स्वत: तर केलाच पण आपल्या शिष्यांमार्फतही करविला. ही परंपरा आजही अखंडपणे चालू आहे.

श्रीक्षेत्र गोंदवले साताऱ्यापासून ६४ किलोमीटरवर आहे. पुण्याहून सासवड -फलटण मार्गे श्रीक्षेत्र गोंदवल्याला जाण्यासाठी मुंबई, वसई, ठाणे, कराड, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पंढरपूर, बार्शी, अक्कलकोट इ. ठिकाणाहूनही भाविकांना गोंदवल्याला जाण्यासाठी बससेवा, एस.टी. उपलब्ध आहे. दहीवडी-गोंदवले हे अंतर ५ कि.मी. आहे.

श्रीसमाधीमंदिर गोंदवले बस स्टँडपासून जवळच २०० मी. अंतरावर आहे. तळघरात समाधी असून, वरच्या बाजूस श्रीगोपालकृष्णाची अतिशय सुंदर, रेखीव मूर्ती आहे. या परिसरामध्ये नाममंदिर, गोशाळा, भक्तांसाठी निवास व्यवस्था, स्वयंपाकघर या वास्तू आहेत. श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या भाविक भक्तगणांसाठी भोजन व्यवस्था मोफत असते. श्री महाराजांच्या समाधी मंदिरामध्ये पहाटेपासून भूपाळ्या, काकडआरती, अभिषेक, नामजप, त्रिकाळ पुजा, शेजारती असे नित्य उपासनेचे कार्यक्रम चालू असतात. श्रीरामनवमी, गुरूपौर्णिमा, गोकुळअष्टमी, दासनवमी हे प्रमुख उत्सव साजरे होतात. श्री गोंदवले गावामध्ये श्री महाराजांची जन्माची व राहण्याची वास्तु आहे. महाराजांनी गोंदवल्यात थोरले राम मंदिर, धाकटे राममंदिर, दत्तमंदिर, शनिमंदिर ही मंदिरे स्थापन केली. या सर्व वास्तू, मंदिरे यांची मालकी श्री महाराजांनी नेमलेल्या विश्वस्तांकडे आहे.

***।।श्रीराम जय राम जय राम।।***
***जयजय श्रीराम। जयजय श्रीराम।।***


| | |
|---|---|
| च | तुरस्त्र |
| प | रखड |
| रा | स्त |
| क | र्तव्यदक्ष |



**-प्रा. मानसी रांजेकर**
‘श्री’ बंगला, पाणिनी सोसायटी,
अरण्येश्वर, पुणे ४११ ००९
भ्रमणध्वनी : ९८५००६९२७७

# श्री. श्री. रविशंकर
## एक अलौकिक व्यक्तिमत्त्व

अगदी लहानपणापासून स्वामी विवेकानंदांच्या कथा वाचताना, ऐकताना ऊर अभिमानाने भरून येत असे. भारताच्या गौरवशाली परंपरेचा ध्वज त्यांनी अमेरिकेत फडकावला. जगभरातील विद्वानांना चकीत केले. त्यानंतर योगानंद परमहंस यांची कहाणी वाचली. त्यांनीही भारतीय तत्त्वज्ञानातील विश्वबंधुत्वाची कल्पना अमेरिकेत आणि इतरही अनेक देशात प्रभावीपणे मांडली. दोघांनी देशात आणि परदेशात खूप समाजकार्य केले. या व इतर अशा थोर लोकांबद्दल ऐकताना मला वाटे की हे सगळेजण पूर्वीच्या काळी होऊन गेले. आजच्या काळात अशी एखादी व्यक्ती का असू शकत नाही?



अचानक एक दिवस, सतत पडलेल्या या प्रश्नाचे मला उत्तर मिळाले. मग मला पटले की आपल्या सर्वांच्या सुदैवाने आपल्या काळात अशी महान व्यक्ती आहे आणि ते म्हणजे ‘‘आर्ट ऑफ लिव्हिंग’’ या संस्थेचे संस्थापक श्री. श्री. रविशंकर! आपल्या कार्यामुळे विवेकानंदांची मला आठवण करून देणाऱ्या या गुरुंनी ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’ या सेवाभावी धर्मनिरपेक्ष संस्थेची १९८२ साली स्थापना केली. त्यावेळी लावलेला हा इवलासा वेल आता गगनावर पसरलेला आहे. भारताच्या सर्व राज्यात त्यांच्या शाखा आहेतच पण जगातील १५० देशात या संघटनेचे आश्रम आहेत. निरपेक्ष वृत्तीने आणि तळमळीने काम करणारे जबरदस्त कार्यकर्ते श्री. श्री. रविशंकर (ज्यांना प्रेमाने गुरुजी म्हणतात) यांनी घडवले आहेत त्याला खरोखरच तोड नाही.

आनंदमय, प्रसन्न आणि दिव्य समाजाची निर्मिती हे गुरुजींचे ध्येय आहे. या संस्थेत जाती, धर्म, पंथ या कशाचीही बंधने नाहीत. कोणतीही अंधश्रद्धा वा कर्मकांडे नाहीत. श्री. श्री. रविशंकरांचे अनुयायी पाकिस्तानातही आहेत. पाकिस्तानला भेट देणारे ते पहिले आणि एकमेव गुरु आहेत.


समाजाच्या, देशाच्या आणि जगाच्या कल्याणाचा विचार त्यांनी वेगवेगळ्या पातळ्यांवरुन केला आहे. प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा पहिला विचार करून त्यांनी अखिल मानवजातीला ‘सुदर्शन’ क्रियेची देणगी दिली आहे. योगाभ्यासातल्या या अत्युच्च्य प्रकारामुळे आपण तणावमुक्त आणि आरोग्यसंपन्न होतो. आरोग्यविषयक बहुतांशी समस्या सुदर्शन क्रिया नियमित केल्याने सुटतात. शिवाय जीवन जगण्याची अशी एक शैली इथे शिकविली जाते की समस्या उद्‌भवू नयेत किंवा निर्माण झाल्याच तर त्यांना समर्थपणे तोंड देता येते. हे वैज्ञानिक प्रयोगांनी सिद्ध झाले आहे.

श्री. श्री. गुरुजींनी तयार केलेले शिक्षक वेगवेगळे कोर्सेस घेऊन सुदर्शन क्रिया, प्राणायाम आणि इतरही अनेक जीवनोपयोगी गोष्टी शिकवितात. देशभरात असंख्य केंद्रात हे कोर्सेस शिकविले जातात. पुणे शहराच्या प्रत्येक भागात आर्ट ऑफ लिव्हिंगचे केंद्र आहे.

श्री. श्री. रविशंकर यांच्याबद्दल लिहावे तितके थोडेच आहे. सामाजिक पातळीवर त्यांचे कार्य आश्चर्यचकीत करणारे आहे. एका व्यक्तीच्या प्रेरणेने इतके कार्य कसे होऊ शकते हे समजत नाही. संपूर्ण भारतात अनेक खेडी त्यांनी दत्तक घेतली आहेत. त्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी मदत केली जाते. नैसर्गिक शेती, पाण्याचा योग्य वापर, आदिवासी भागात फी विरहित शाळा हे सगळे स्थानिक लोकांमधूनच कार्यकर्ते तयार करून केले जाते. अशा एका फलटणजवळच्या गावाला भेट देऊन आम्ही भारावून गेलो.

त्सूनामीसारखे संकट असो की नक्षलवादी आणि रणवीरसेनेचा संघर्ष असो किंवा दहशतवादी संघर्ष, श्री. श्री. गुरुजींचे कार्यकर्ते आणि ते स्वत: ती सोडविण्यात यशस्वी होतात. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे माजी मुख्यमंत्री विलासराव

देशमुखांनी स्वत: श्री. श्री. रविशंकरांना विनंती केली होती आणि त्यांनी लगेच कार्यकर्ते पाठविले.



असेच थक्क करून सोडणारे काम जागतिक पातळीवर सुरू आहे. श्रीलंका सरकारने तमीळ निर्वासितांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी त्यांच्याशी चर्चा केली. अमेरिकेत श्री. श्री. गुरुजींचे इतके अनुयायी आहेत की काही शहरांमध्ये वर्षातील एखादा दिवस श्री. श्री. रविशंकर डे म्हणून जाहीर केला आहे. अनेक देशातील पार्लमेंटमध्ये त्यांना मानपत्र दिलेले आहे. रशियामध्ये आणि जुन्या रशियापासून स्वतंत्र झालेल्या छोट्या-छोट्या राष्ट्रांमध्ये श्री. श्री. रविशंकर लोकप्रिय झालेले आहेत. नुकतीच टी.व्ही.वर त्यांची रशियाभेट दाखविली. रशियन भाषेत तिथले रहिवाशी गुरुजींसाठी गाणी गातात. अमेरिकेतील 'नासा'च्या शास्त्रज्ञांसाठी गुरुजींनी कोर्स घेतला. अमेरिकेतील सायकिएट्रिक असोसिएशनपुढे भाषण केले. 'आर्ट ऑफ लिव्हिंग'ची रजत जयंती आणि गुरुजींचा पन्नासावा वाढदिवस जेव्हा बंगलोर येथे साजरा झाला तेव्हा देशाचे तत्कालीन राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम उपस्थित होते. जगभरातील अनेक देशांचे प्रमुख तसेच सर्व धर्मांचे धर्मगुरु आणि लाखो अनुयायी उपस्थित होते. 'वसुधैव कुटुम्बकम' म्हणजे सारे विश्वच एक कुटुंब व्हावे असे ज्ञानेश्वरांसारखे स्वप्न श्री. श्री. रविशंकरांच्या साक्षीने सर्वांनी पाहिले. नुसते स्वप्न पाहिले नाही तर ते प्रत्यक्षात उतरविण्याच्या योजना आखून काम जोरदार सुरू केले आहे. हा सोहळा डोळे भरून पाहण्याचे भाग्य मला लाभले.

देशभरात अनेक शिक्षणसंस्था, श्री. श्री. रविशंकर विद्यालये, आयुर्वेदिक, पत्रकारिता शिकविणारी व इतर अनेक कॉलेजेस, ओरिसामध्ये विद्यापीठ, दिल्लीत आणि इतर ठिकाणी वेद विज्ञान महाविद्यापीठ, आयुर्वेदिक औषधाचे उत्पादन करणारे केंद्र अशा कितीतरी संस्था त्यांनी सुरू केल्या आहेत.

उत्तम संस्कार असलेल्या, निर्व्यसनी आणि आरोग्यसंपन्न अशा व्यक्ती घडविल्या आणि रसायनमुक्त नैसर्गिक शेतीतून उत्तम धान्य निर्माण केले. नद्या शुद्ध आणि प्रदुषणमुक्त केल्या आणि बॅटरीवर चालणारी वाहने वापरून हवा शुद्ध राखली तर 'दिव्य समाज' नक्की निर्माण होईल. मध्यंतरी गुरुजींनी 'मेरी यमुना, तेरी यमुना' कार्यक्रम दिल्लीत राबवून यमुनेचे शुद्धीकरण हाती घेतले. गंगा शुद्ध करण्यासाठी ऋषिकेशमध्ये प्रयत्न केले. पुण्यातही आर्ट ऑफ लिव्हिंगच्या कार्यकर्त्यांनी मुळा मुठा शुद्धीकरणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. अजून लिहिण्यासारखे खूप आहे. पण शेवटी शब्द अपुरे पडतात. श्री. श्री. रविशंकर आणि माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी एकत्रितपणे मांडलेली कल्पना म्हणजे एम्गहम and spirituality should go hand in hand. 'The best of East and West should come together.' विज्ञान आणि अध्यात्म हे परस्परविरोधी नाहीत तर परस्परपूरक आहेत. या दोन्हींचीही कास धरल्यानेच मानवाची खऱ्या अर्थाने प्रगती होईल. लवकरच या महामानवाने पाहिलेले एक स्वप्न साकार होईल ते म्हणजे 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो'

■ या लेखातील कोणत्याही मुद्द्यांबाबत अधिक तपशीलवार माहिती व अनेक उदाहरणे लेखिकेकडे उपलब्ध आहेत.



# काव्यपुष्प

## एवढसं आभाळ

तुझं माझं एवढसं आभाळं
टिंबाएवढं;
पण त्यात किती तारे चमचमणारे
बेगुमान वाहणारे
वादळ-पावसाचे वारे

तुझा माझा एवढासा समुद्र
थेंबाएवढा;
वरून शांत-नि:स्तब्ध
पण त्यात किती रंगतरंग
त्यात किती खळखळाट नि थयथयाट
सदैव मनाला न्हाऊ घालणारी
भरती-ओहोटीची लाटेवर लाट

तुझं माझं एवढसं तळं
टिकलीएवढं;
पण त्यात दिनरात किती असंख्य भावफुले
फुललेली
त्यात कितीक चंद्रबिंबे तुडुंबलेली
तुझ्या-माझ्या वसतीसाठी आसुसलेली

तुझं माझं एवढसं आभाळं
पण त्यात किती अगणित तारे झगमगणारे
नि हळुहळु एकेक मालवणारे...

**- बाळासाहेब कारले**
सुरेश एजन्सी, शुक्रवार पेठ, पुणे
दूरध्वनी : २४४७०५७६

## कुपमंडूक वृत्ती सोडा

सोडा
कुपमंडूक वृत्ती सोडा
अन् घ्या भरारी
झुलतील यशाचे हिमालय
मित्रहो तुमच्या दारी

सोडावे लागू द्या गाव
तोडावी लागू द्या
नाती-गोतीही
काही काळ
उपसावे लागू द्या
कष्टही तुम्हा अपार

जाऊ नका मुळी खचून
जाऊ नका मुळी पिचून

करा आज
करता येईल तेवढा त्याग
पचवा
पचवता येईल तेवढी आग

उज्ज्वल
उद्या तुमचा भविष्यकाळ.

**-डी. के. शेख**
गल्ली नं. १३, मदिना मस्जिदजवळ,
खाजानगर, धाराशिव
भ्रमणध्वनी : ९५५२८४३३६५

## जीवन

इथेच रुजणे
इथेच थिजणे
जगणे इथेच आहे
स्मरण ठेव तू
पुन्हा जन्मण्या
इथेच मरणे आहे!

इथलीच माती
इथलीच नाती
जुळती इथेच
इथेच तुटती
बाकी उरले त्यांच्यासाठी
ठेवूनी जाती स्मृती...इथेच रुजणे

इथेच राहील
तुझे नि माझे
इथेच आरे ! कारे!
थांबतो ना काळ कधी
विसरून जाऊ सारे
दु:खाचे जरी
असतील डोंगर
सौख्यांचेही असती झरे...इथेच झुरणे

आकाश इथले, इथलेच तारे
सागरही इथला, इथलेच वारे
अखंड राहील इथेच वेड्या,
सृष्टी चक्र फेरे...इथेच रुजणे

**-एकनाथ भंडारे**
फ्लॉट अ-४०, 'प्रेरणा', कस्तुरबा
सोसायटी, विश्रांतवाडी, पुणे १५
भ्रमणध्वनी : ९८५०७९२६२३

# चारोळ्या

## हिस्सा

''कुणी तरी लुटायच्या आधी ।
तुम्ही मात्र जिंकून घ्यावे ।।
तुमच्या हिश्यातला निम्मा भाग ।
आम्हाला देऊन जावे ।।''

## तारुण्य

''म्हातारपण आलंय तरी ।
तरुणासारख्या उड्या मारतात ।।
आठवड्यातून एकदा तरी ।
पेपरमध्ये फोटो छापतात ।।''

**-पंडित हिंगे,** हडपसर, पुणे

## बावरा!

चांदणकाळी दिशांत फुलते
हुरहुरणारे गीत अनामिक
सुरात मिसळून सूर झिंगतो
भिरभिरणारा वारा आणिक ।

सुरासुरातून, जललहरीतून
गीत अनामिक आज तरंगे
दरीदरीतून, गिरीगिरीवरी
स्मृतीत मी तुझिया रंगे ।

इथेच घडले सारे काही
शब्दांना जे कळले नाही
व्यक्त कराया भाव मनीचे
स्पर्शावाचून उरले नाही ।

हिरव्या मखमलीवरती
झुकले होते निळे नभांबर
जणू जगाच्या श्रांतीवरती
घालितसे मायेची पाखर

गवतामधली रानफुले ती
झाली लाजुन कुंकुम टिंबे
संध्येच्या रंगात रंगूनी
नृत्य कराया पाऊस थांबे.

वातावरणी भरला होता
तुझिया श्वासाचाच सुगंध
देह विसरलो, भान हरपले
नुरले 'मी' पण झालो धुंद!

रातराणी केसात माळून
भिजलीस पावसात
आठवतं? म्हणालीस
करीन जीवनभर साथ!

का? अशी निघून गेलीस
हातातला हात सोडवून?
थांबलो होतो 'रासासाठी'
गेलीस रंग सांडून!

उमलत्या गीताची पालखी नेतो
शीळ घालत, मिरवित वारा
धुक्याच्या पाऊलवाटेवर, मी
स्मृतीत भिजलेला एक बावरा!

**-सौ. अपर्णा आंबेडकर**
सेनापती बापट रोड, पुणे १६,
दूरध्वनी : २५६५४२७२

## अरे संसार संसार

अरे संसार संसार
आता तवा ग्यासवर
नाही हाताला चटके
तरी मिळते भाकर

अरे संसार संसार
आता नाही भाकर
आता सारा भर
पाव चपातीवर

अरे संसार संसार
भिस्त आता रेशनवर
जर मिळाले रॉकेल
नाही मिळत साखर

अरे संसार संसार
बस गाडीचा प्रवास
सकाळ-संध्याकाळ
होतो जीवघेणा त्रास

अरे संसार संसार
आता नको झाला जीव
कधी घेईल बोलावून
घरी आपुल्या आता देव

**-राजा फोपे**
'निलमराज', १२ महात्मा सोसायटी,
कोथरूड, पुणे ३८
भ्रमणध्वनी : ९५४५९५५७१६

## आधार

माझ्या हातानी
तुझ्या हाताला
हात द्यावा
जसा फुलाला
देठांनी आधार द्यावा.

माझ्या डोळ्यांनी
तुझ्या डोळ्यांना
पिऊन घ्यावे
जसे भ्रमरानी
फुलातूनी मकरंद प्यावे.

माझ्या स्पंदनांनी
तुझ्या स्पंदनाला
हृदयात कैद करावे
जसे किनाऱ्याने
सागरलाटांना
मिठीत घ्यावे.

**-मारुती कटकधोंड**
४२९, 'मनिकल्प',
राजस्वनगर, सोलापूर
**भ्रमणध्वनी :** ९८८११२४४५०

## जीवनाची कथा

माय शेतात राबते
भूक पोटात दाबते
डोक्यावर इज्जतीचा
फाटका पद झाकते

दोन हाताचे ते बळ
उठे पोटामधी कळ;
कळ दाबण्या पोटाची
अन्न मातीले मागते

पिक भरूनिया आलं
मन आभाळची झालं
पिक असच ठेवाया
आण शेताले टाकते

पिक हाती आल्यावर
फूल फळ झाल्यावर
माय जीवनाची कथा
काळ्या मातीला सांगते

**-प्रकाश मोहन दुलेवाले**
८५, ऑरेंजनगर, खरबी चौक, पो.
म्हाळगीनगर, नागपूर ३४
भ्रमणध्वनी : ९३२५५३७४४३



- रमेश गोविंद वैद्य
२४, अभिवादन,
सहकारनगर नं. २, पुणे. ९

# 'तोच' मी बदनाम!

आपल्याविषयी उठलेल्या खोट्या बातम्या, गावगप्पा, अफवा, कंड्या याविषयी दिलखुलास कथन आणि हितशत्रूंना मुँहतोड जवाब सुप्रसिद्ध कॉपिरायटर, स्तंभलेखक आणि कवी रमेश गोविंद वैद्य यांचा!

**-संपादक**

**।।एक।।**

एकदा माझ्या ज्योतिषी मित्राच्या मुलाच्या नारायण पेठेतील बिऱ्हाडी मी बऱ्याच दिवसांनी गेलो होतो.

काहीशा गंभीर मुद्रेनंच मित्रपुत्रानं माझं स्वागत केलं.

थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर त्याने हळूवार आवाजात विचारले, ''आता कशी आहे तब्येत तुमची? काळजी घेताय ना?''

''माझ्या तब्येतीला काय धाड भरल्येय?? आणि काळजीचं म्हणशील तर तिखटमीठ लावून मी तिचा पेरू करून टाकत असतो.''

माझ्या उत्तराने त्याचा चेहरा उजळला आणि त्याने त्याच्या गांभीर्याचा खुलासाही करून टाकला. त्याच्या म्हणे मध्यंतरी ऐकिवात आलं होतं की, मला (वैद्यांना) हृदयविकाराचा झटका आला होता म्हणून.

ऐकीव बातमीतील खोटेपणा एव्हाना त्याच्या लक्षात आला असेल असे समजून मी त्याचा निरोप घेतला.

**।।दोन।।**

एकदा 'नवा विष्णू' ते 'चिमण्या गणपती' या रस्त्याने जात असताना मी सहज डावीकडे नजर टाकली आणि थोडी वर वळवली. जिन्यावरून खाली येणाऱ्या इसमाची आणि माझी नजरानजर होताच त्याचे डोळे एकदम विस्फारले गेले.

''अगंऽऽ लवकर बाहेर ये'' असे जवळजवळ ओरडतच तो धाड् धाड् जिना उतरत जणू धावतच माझ्यापाशी आला.

मला नखशिखांत न्याहाळत थरथरत्या स्वरात तो म्हणाला, ''रमेश, तू?'' एव्हाना त्याचे कुटुंब जिन्याजवळून आम्हा दोघांकडे उत्कंठेने पाहत होतं. मला काहीच उमगेना.

''तुझा चेहरा असा बावचळल्यासारखा का दिसतोय?'' मी विचारले.

''आता काय सांगायचं तुला! मध्ये कुणीतरी सांगत होतं की तू रेल्वेडब्यातून खाली पडून खलास झालास म्हणून. त्यामुळे अचानक तुला पाहिल्यावर धक्काच बसला मला.''

त्या इसमाचे नक्राश्रू पाहण्याची माझी इच्छा नसल्यामुळे मी पुढे सटकलो.

अशा सुरस आणि चमत्कारिक प्रसंगांची मालिका काही काळ चालू राहिली आणि मध्येच कुठेतरी गुडूप झाली.

**।।तीन।।**

साधारणतः इ.स. २०००च्या आसपासच्या काही वर्षात माझ्याविषयीच्या अनेक कंड्या पुण्याच्या वातावरणात तरंगत होत्या. 'Give a dog name and kill him' या तंत्राचा वापर माझे हितशत्रू करीत होते. एवढा खटाटोप करूनही त्यांचे इप्सित मात्र साध्य होत नव्हते. जाहिरात लेखन, साहित्यनिर्मिती, काव्यमैफली या क्षेत्रातील माझी सत्कीर्ती दिवसेंदिवस वाढतच होती.

आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्यामुळे माझ्याविषयी त्या काळात उठलेल्या खोट्या बातम्या, गावगप्पा, अफवा, कंड्या यांची त्यावरील माझ्या प्रतिक्रियांसह नोंद करतो.

१) म्हणे एकदा मद्याने तर्रर होऊन मी रस्त्याच्या कडेला पडलो होतो. (अगा जे झालेचि नाही तयाची वार्ता पुससी काही. 'लोणकढी' मात्र एकदम पहिल्या धारेची!)

२) म्हणे एकदा कुठल्यातरी चौकात मी भीक मागत उभा होतो. (म्हणजे काल्पनिक खेळात आधी मला 'आडवा' केला आणि नंतर 'उभा' केला.)

'एकदा मारूतीचे लग्न होते तेव्हा थोट्या लोकांनी अंतर्पाट धरला होता. या विधानासारखेच कंड्यातील प्रसंग म्हणजे अशक्य गुणिले अशक्य.'

(अशा तऱ्हेने असत्याचे हाडूक चघळणाऱ्या माझ्या या स्वार्थी, मुर्ख आणि दुष्ट हितशत्रूंना त्यांचे कुटुंबीयही 'हड्' म्हणत असतील.)

३) म्हणे एकदा मला हृदयविकाराचा झटका आला होता. (माझा अवतार झटका येण्यासाठी नव्हे तर झटका देण्यासाठी आहे. आपल्या

तंदुरूस्तीची खात्री पटावी म्हणून मी कशाला माझ्या छातीवर बुक्का मारून दाखवू? वयाच्या ६९ व्या वर्षी रोज दम न लागता चारपाच किलोमीटर्स चालून दाखवाल का माझ्यासारखं?)

४) म्हणे एकदा रेल्वे डब्यातून खाली पडून मी खलास झालो. (मग सध्या वावरत आहे ते वैद्यांचे भूत की काय? मृत्युप्रसंगाची कल्पना माझ्या 'टर्मिनस व्हिक्टोरिया' या कादंबरीतून तर ढापली नाही ना?)

।।चार।।

खोट्या बातम्या - गावगप्पा - अफवा - कंड्या उठण्यासंदर्भात अनुवंशिकतेचाही भाग असावा.

प्राचीन काळी गोविंद वैद्य नावाच्या एका तरूण, होतकरू वकीलाचे सिंधु नावाच्या एका शेतकऱ्याच्या तरूण पोरीशी लग्न ठरले होते.

लग्नाच्या काही दिवस आधी कुणीतरी अफवा उठवली की, सदरहू गोविंद वैद्य अमुक जातीचा नसून तमुक जातीचा आहे.

पुढे तो अमुकच जातीचा आहे असे सिद्ध झाले आणि सिंधुशीच त्याचे लग्न लागले.

आमच्या जन्माआधीचे हे नाट्य तऱ्हेतऱ्हेने जन्मानंतरही अधूनमधून चालूच आहे.

।।पाच।।

बऱ्याच वर्षात माझ्याविषयी नवी खोटी बातमी, अफवा न उठल्यामुळे मी बेचैन झालो होतो.

तेवढ्यात माझ्याविषयी एक ब्रँड न्यू कंडी माझ्या कानावर आली आणि मी स्वत:वर आणि जगावर जाम खूष झालो.

काव्यवाचनाचे कार्यक्रम जनमानसात अधिक रूजावेत, नवोदितांना उत्तेजन मिळावे, मार्गदर्शन लाभावे या भूमिकेतून 'काव्यसप्ताह' नावाचा उपक्रम मी पुण्यात गेली १० वर्षे यशस्वीरित्या आयोजित केला आहे.

'साहित्य चपराक' मासिकाचा एक अंक मध्यंतरी 'काव्य सप्ताह दशकपूर्ती विशेषांक' म्हणून प्रकाशित झाला होता.

हा विशेषांक निघावा म्हणून मी (वैद्यांनी) संपादक घनश्याम पाटील यांच्याशी हजारो रूपयांचे डील केले अशा आशयाची ही ब्रँड न्यू कंडी!

या आधीच्या कंड्या ॲल्युमिनियमच्या मानल्या तर ही कंडी एकदम चकचकीत, स्टेनलेस स्टीलची वाटते.

इतकी चकचकीत की माझ्या हितशत्रूंची थोबाडेही या आरशात कदाचित प्रतिबिंबीत झाली असतील. तात्पर्य तुमची परिस्थिती कशीही असो, कंडी ही उठत राहणारच. मी प्रारंभी खुदुखुदु हसत असे. आता चक्क 'खोखो' खेळतो.

।।सहा।।

खरं तर लेखन आणि सादरीकरण या क्षेत्रात मला उदंड कीर्ति लाभली असली तरी व्यावहारिक दृष्ट्या प्रचंड व झगमगीत यश मला अद्याप मिळालेले नाही. तसे ते मिळण्याची दाट शक्यता पूर्वी होती, अजूनही आहे. नेमकी इथेच बळावत गेली व जाते माझ्या हितशत्रूंची पोटदुखी.

माझ्या अधोगतीच्या कल्पनांचे मांडे ते डालडा लावून खातात व आणखीनच बेजार होतात. त्यांनी उठवलेल्या कंड्या म्हणजे 'Wishful Thinking' चे अतिभिकार नमुने!

।।सात।।

मी स्वतंत्रपणे जगायला लागल्यानंतर माझ्या आर्थिक परिस्थितीत चढउतार झाले. क्वचित प्रसंगी मी मद्याचा आस्वाद मितप्रमाणात घेतला आहे. या गोष्टी मी कधीच नाकारल्या नाहीत.

बऱ्याच वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या माझ्या मुलाखतीत म्हटल्याप्रमाणे मद्याचे व्यसन मला कधीच नव्हते, नाही व नसेल. 'जिना बिलोरी' या माझ्या पुस्तकातील एक रूबाई इथे उद्‌धृत करावीशी वाटते.

***मी व्यसन म्हणूनी मद्य कधी ना प्यालो***
***समदु:खी म्हणूनी जवळ जरासे आलो***
***दुष्कीर्ती होती दोघांचीही झाली***
***पण परिचय होता फुलेच ना टपटपली?***

माझ्या हितशत्रूंनी परांचे डोमकावळे करून अखेरीस त्यांचेच हसे करून घेतले. माझ्या लेखन कौशल्याची आणि वाणीप्रभावाची क्षितिजे विस्तारतच आहेत.

।।आठ।।

माझी उत्कृष्ट शैक्षणिक वाटचाल, उत्तम कौटुंबीक संदर्भ, माझा सरळ स्वभाव आणि माझा अफाट लोकसंग्रह यांची माहिती असलेल्या माझ्या मित्रांचा आणि चाहत्यांचा माझ्याविषयी उठलेल्या खोट्या बातम्या, गावगप्पा, अफवा, कंड्या यावर क्षणभरही विश्वास बसला नाही.

कंड्यात वर्णिलेले प्रसंग प्रत्यक्षात जरी घडले असते तरी त्यांचा माझ्यावरील लोभ कणभरही कमी झाला नसता.

ही किमया आहे माझ्यातील उणिवांसकट माझा स्वीकार करणाऱ्या त्यांच्या जिंदादिलीची आणि लेखनविकास व वाग्विलास या संदर्भात मी आयुष्यभर निरलसपणे केलेल्या अभ्यासाची तसेच त्यासाठी उपसलेल्या अपरंपार कष्टांची!

।।नऊ।।

माझ्याविषयी विविध कंड्या उठल्या तेव्हा त्यामागचे विघ्नसंतोषी चेहरे शोधण्याचा मी यत्किंचितही प्रयत्न केला नाही. लेखन व सादरीकरण यावरचे लक्ष मी ढळू दिले नाही. परिणामत: या दोन्ही बाबतीत माझी प्रगतीच होत गेली.

आज माझ्या नावावर आणीबाणीच्या काळात मी सुरू केलेल्या साप्ताहिक 'कुरूक्षेत्र'ची पाचसहा महिन्यांचीच परंतु विचार स्वातंत्र्याचा जयजयकार करणारी तेजाळ कारकीर्द, चार ख्यातनाम नियतकालिकातील चटकदार स्तंभलेखन, पाच लोकप्रिय काव्यसंग्रह, दोन रंजक, वेधक कादंबऱ्या,

नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, रंगमंच, ध्वनिफित या माध्यमातून झालेले काव्यरचनांचे दखलपात्र प्रकटीकरण अशा गोष्टी जमा आहेत.

सात गाजलेल्या काव्यमैफलींचा मी सादरकर्ता आहे. काही प्रस्थापितांच्या व नवोदितांच्या काव्यमैफलीचे दिग्दर्शनही माझ्या हातून घडले आहे. मायबाप रसिकांचा बक्कळ कृपालोभ या आविष्कारांना लाभला आहे.

अनेक सुहृदांच्या सहकार्यामुळे 'काव्यसप्ताह' या उपक्रमाचे मी गेली १० वर्षे यशस्वी आयोजन करू शकलो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वात या उपक्रमास मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

या पार्श्वभूमीवर 'तोच मी बदनाम!' या शीर्षकाचा माझ्या नव्या काव्यमैफलीचा प्रयोग जाहीर करावा, असे मला वाटते. माझ्याविषयी कंड्या उठवणारे 'बुरखाधारी' या प्रयोगास हजर राहिले तर तिथे उसळलेली गर्दी पाहून आणि हशा-टाळ्यांचा गडगडाट ऐकून या हितशत्रूंचे दात त्यांच्या घशात जातील याविषयी मला तिळमात्रही शंका नाही.

चारदोन हलते दात शिल्लक राहिलेच तर 'कार्य सिद्धीस नेण्यास' माझे मित्र व चाहते समर्थ आहेतच.

।।दहा।।

मी काही कुणी महात्मा किंवा साधुसंत नव्हे. मी एक सामान्य माणूस आहे. चार चुका माझ्याही हातून घडल्या आहेत, पुढेही घडतील. चुकांचे समर्थन करायचे नाही, आवश्यक त्या सुधारणा करायच्या ही भूमिका घेऊन मी जगत आलो. आकांक्षा तिमिराकडून तेजाकडे जाण्याचीच आहे.

आज माणसामाणसातील संबंधात फार फार गरजेचा आहे थोडा अधिक समंजसपणा! ढासळत्या जगाला अखेरीस 'जगा आणि जगू द्या' हे तत्त्वज्ञानच सावरू शकेल. माझ्याच एका कवितेत म्हटल्याप्रमाणे -

***''कोण आहे संत येथे मृत्तिकेचा मी तरी***
***शरिर असते गहन मोठे द्यावी कोणी खातरी***
***या जिवाला त्या शिवाची मान्य आहे मालकी***
***माणसाने माणसाला ओळखावे आणखी***
***गल्ती होते माणसाची द्या क्षमेची त्या सजा***
***आणि त्यालाही लुटू द्या औट घटकेची मजा***
***हाक येता दूर जाते जिंदगीची पालखी***
***माणसाने माणसाला ओळखावे आणखी***
***पाप आणि पुण्य यांचा दूर ठेवा ताजवा***
***किर्र अंधारी पुरेसा एक छोटा काजवा***
***अंतराळी उंच जावो प्रीतीची ही आरती***
***माणसाने माणसाला ओळखावे आणखी''***

वाचता... वाचता... नाचावेसे वाटेल
नाचता... नाचता... वाचावेसे वाटेल

**भरतीच्या लाटेप्रमाणे पुढे-पुढे जाणारे मासिक**

साहित्य चपराक

*अनेक विषयांचा 'दहीकाला'*
*थोडा-थोडा 'मिर्च-मसाला'*
*अधे मधे 'हाय!' कराल*
*मात्र तरीही*
*पुन्हा पुन्हा वाचत रहाल*

- *विविध विषयांवरचा चटपटीत मजकूर*
- *बोलकी, कलात्मक चित्रे, छायाचित्रे, व्यंगचित्रे*
- *उत्तम कागद ■ उत्कृष्ट छपाई*
- *वाजवी किंमत आणि 'जरा हटके'*

*संपादनाची दुर्मिळ हिंमत*

*संपादक*
**घनश्याम पाटील**
*(मेड इन मराठवाडा)*

# पुस्तक आणि वाचन

- प्रभाकर गो. लोहोकरे
३०२, ऋतुरंग, ए बिल्डिंग, भारतीय
विद्या भवनजवळ, कोथरूड, पुणे- २९.

परवा वाचनात आले. गावोगावातील वाचनालये 'वाचका' अभावी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. सांगीतलं जातं, दिल्लीमध्ये संसद सदस्यांसाठी संसदेच्या प्रांगणातच 'भव्य' आणि 'सुसज्य' ग्रंथालय आहे. तिथे दोनशे कर्मचारी काम करतात. लक्षावधी पुस्तके तिथं आहेत. त्यात दर दिवशी दोनशे पुस्तकांची भर पडत असते. अशा या प्रचंड ग्रंथालयाचा 'लाभ' ५५० सदस्यांपेकी फक्त ५० सदस्य घेतात. गल्लीपासून दिल्लीपर्यंत असा हा वाचन संस्कृतीचा ऱ्हास होत चाललाय. असं होणं हे भयावह आहे.

वाचनाने मन प्रभावित होते. बुद्धी पल्लवित होते. जीवन संस्कारित होते. ज्ञानाची वृद्धी व शुद्धी होते. आयुष्यात उभे राहण्याची ताकद वाचनातून मिळते. वेळोवेळी मान्यवरांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व पटवून दिले आहे. त्याची आठवण करून दिल्याशिवाय राहवत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'माझ्या घरावर जप्ती आली, दागदागिने, सोने नाणे, पैसा अडका सारे काही जाण्याची वेळ आली तरी मला त्याचं दुःख वाटणार नाही. पण माझ्या पुस्तकांना कुणी हात लावला तर ते मला कदापि सहन होणार नाही. ज्यावेळी मला सर्वांनी झिडकारले - नाकारले त्यावेळी मला पुस्तकांनी जवळ केले आणि प्रकाश वाटा दाखविल्या. त्यांचे ऋण मी केव्हाही विसरणार नाही.''

जॉन रस्किन - 'पुस्तक नसलेले घर खिडक्या नसलेल्या खोलीप्रमाणे असते.' लोकमान्य टिळक - ''मी नरकात सुद्धा चांगल्या पुस्तकांचे स्वागत करीन. कारण त्यांच्यामध्ये नरकाचेही रूपांतर स्वर्गात करण्याची शक्ती आहे.''

सबकुछ चित्रपटकार 'गुलजार' म्हणतात, 'बॅटरी'ला 'रिजार्च' करून तिचा 'प्रकाश' तिला पुन्हा मिळवून द्यावा, तशी पुस्तकांनी मला माझी 'ऊर्जा', माझे 'चैतन्य' परत मिळवून दिले.''

बॉर्डर ॲमझान - ''घराघरातून पुस्तकांचा वापर वाढविणे हाच ज्ञान-संस्कृती जोपासण्याचा मार्ग आहे.''

लेखिका सई परांजपे म्हणतात, ''मी एका कॅन्सरग्रस्त मैत्रिणीला पुस्तक दिले. तिला ते 'वरदान' देणारे ठरले.''

कश्मीर खोऱ्यातील एका जवानाला विचारण्यात आले, ''प्रतिकूल परिस्थितीत तू लढतोस कसा?'' तो म्हणाला, मजजवळ 'पुस्तक' असतं. रणांगणांवर कार्यरत असलेला एक सैनिक 'आत्महत्या' करण्याच्या विचारात असताना घरून आलेले 'कागदातील' खाद्य पदार्थ तो सोडू लागला. त्याचे लक्ष त्या कागदावरील मजकुरावर गेले. त्यांन तो कागद 'वाचून' काढला अन् त्यानं 'आत्महत्येचा' मार्ग सोडून दिला. मंगेश पाडगावकर म्हणतात, ''ग्रंथ अमुच्या हाती! ग्रंथ उजाळती अज्ञानाच्या - अंधाराच्या भिंती।''

'लॉर्ड ग्रे' यांना पुस्तक वाचनाचा छंद होता. उतार वयात त्यांची 'दृष्टी' अधू झाली म्हणून त्यांनी अंधासाठी असलेली 'ब्रेल लिपी' शिकून घेतली. ते म्हणतात, ''किती सुख आहे या स्पर्शवाचनात! वीज गेली, डोळे शिणले. बिछान्यावर पडले तरी 'वाचता' येतंय.''

तेव्हा 'पुस्तक' आणि 'वाचन' याचे महत्त्व लक्षात घेवून त्याची 'आवड-सवय' अंगी बाळगणे गरजेचे आहे.




**-सौ. शशिकला देवदान वाळके**
सातववाडी, हडपसर, पुणे - ४११०२८
भ्रमणध्वनी : ७७०९२०४०८९
९७६२७१९७५५

# शेवटची इच्छा
## (कथा)

> आपल्या निर्दयी मुलांना दूर जाताना रोखू शकत नव्हती ती. परंतु निघून जाण्यापूर्वी ज्या जागेवर ते उभे होते त्या जागेला मात्र वेड्यासारखी चुंबीत होती ती किती तरी वेळ....

रात्रीपासून फारच अस्वस्थ वाटत होतं तिला. जीव तर सारखाच गुदमरत होता. शरीरापेक्षा तिचं मनंच खूप थकल्यासारखं झालं होतं. ‘‘परमेश्वरा, ने रे बाबा आता’’ असं कितीदा तरी म्हणाली ती. प्रत्येक वेळी असं म्हणताना तिचा जीव फार घुटमळत होता. कुठं तरी, कोणात तरी गुंतत होता. मन समाधानी नाही. आत्मा तृप्त नाही. याची सल जीवघेणी होती. मरणाने संपतील शरीरवेदना पण आत्मा बेचैनच राहिल ना कायमचाच, असा विचार अधिकच गहिरे दु:ख देत होता तिला. नेहमी आपल्याच विचारात मग्न असते ती आणि अशी मग्न असतानाच तिच्या कानी साद आली ‘‘आईऽऽऽ एऽ आई!!!’’ याच आवाजासाठी संपूर्ण वर्षभर तरसली होती ती. याच हाकेची आतुरतेने वाट बघत होती ती.



त्यांचा आवाज ऐकून तटकन् उठली ती. पण ग्लानी आली तिला. खोली गरागरा फिरत असल्यासारखं जाणवताच ती पटकन खाली बसली. डोळ्यांना खूप अंधारी येवून घामेघूम झाली ती. दोन्ही मुलं आली होती तिची. त्यांना कवटाळायला ती अधीर झाली होती. पण शरीर साथच देईना. त्याही अवस्थेत तिचं लक्ष बाहेरच्या आवाजाकडे होतं.

तिचा थोरला मुलगा मेव्हण्याला तावातावाने विचारत होता, ‘‘बाबा वारले. महिना झाला. ही बातमी तुम्ही त्वरित का कळवली नाही आम्हाला? त्यांचे शेवटचे दर्शनही नाही घेता आले आम्हाला. त्यांचा अंत्यसंस्कार करून मोठेपणा मिळवला तुम्ही... आम्ही नालायक, नाकर्ते आहोत हे सिद्धच केलंत तुम्ही...’’

मेव्हणा शांतपणे म्हणाला, ‘‘बाबांची तशी ताकीद होती मला. तुम्हाला बोलावणं तर सोडाच तुम्हाला त्यांच्या मृत्युची वार्ताही कळू नये अशी त्यांची इच्छा होती.’’

धाकट्याने मोठ्या गुर्मीत विचारले, ‘‘बाबांची इच्छा होती की तुम्ही तुमचीच इच्छा पुरी केलीत? अंत्यसंस्कार करणं आमचा हक्क होता.’’

इतका वेळ शांत असणारी बहिण म्हणाली, ‘‘कोणत्या हक्काविषयी बोलतोस तू? मुलगा असण्याचं कर्तव्य तर पार

पाडलं, निस्तरलं नाही तुम्ही!! हक्क गाजवतोय!!''

''बाबा आजारी असल्याचं कळवलं होतं ना तुम्हाला? त्यांना ॲडमिट करायचंय त्यासाठी बोलावलं होतं. पैशांची व्यवस्था करायला सांगितलं होतं ना? घरभाड थकल्याने घर मालक अपमान करतो. घेतलेल्या कर्जाविषयी सावकार धमकावतो. हे पण त्याच पत्रात मी स्वत: कळवलं असतानाही त्याची दोघांनी दखल घेतली? तुमच्या भरवश्यावर तिने वायदे केले. रोज तुमच्या पत्राची वाट बघायची ती!! एका महिन्याने तुम्ही कळवलं की पैसे पाठवता आले नाहीत आणि येताही आलं नाही. कारण काय तर एकाच्या मेव्हणीचं लग्न होतं आणि दुसऱ्याने बंगला खरेदी केला होता. सावकार घरातून टी.व्ही., फ्रीज, शोकेस, दिवाण, कपाट आणि आईचे दागिने घेवून गेला. घरमालकाने भांडीकुंडी घेतली आणि घराबाहेर हाकलून दिलं आईला... आजारी बाबाला घेवून रात्रभर अंगणात बसली होती आई. नंतर तर तुम्ही साधी विचारपूसही केली नाही की बाप मेला की जिवंत आहे...''

थोरला म्हणाला, ''कशी करणार विचारपूस? आईने अगदी स्पष्टच लिहिलं होतं की, आता आपला संबंध संपलाय. पत्रही पाठवू नका. तुमच्याच जीवावर तसं लिहिण्याचं धाडस केलं ना आईने?''

बहिण म्हणाली, ''किती अगतिक, किती लाचार होते आईबाबा! दोन कमवते पुत्र असताना भिकाऱ्यासारखे लज्जास्पद जीवन ते ही जावयाच्या दारात जगत होते ते! संतापून लिहीलं असेल तिने तसं!! ती कळवळून पैसे मागत होती. बाबांच्या आजाराविषयी सांगून बोलावत होती. त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलत तुम्ही. पण पत्रव्यवहार करू नका म्हणाली ती, ते मात्र प्रामाणिकपणे पाळलं आठवणीत ठेवून.... तुम्हाला काय वाटतं, फार सुखी होती ती तुमच्याशी संबंध तोडून? गेल्या दोन वर्षात शांत झोप लागलीच नाही तिला. मनापासून, आवडीने, पोटभर जेवलीच नाही ती... सदा उदास, बेचैन असायची.

बाबा गेल्यावर तर फार एकाकी झाली ती. बोलून दाखवत नव्हती. पण तिच्या मूकपणातूनच तुमची आठवण कळायची. दाराकडेच नजर असायची तिची. तुमचीच वाट बघायची ती!! पोस्टमन आला की मोठ्या आशेने ती बाहेर धावायची... पत्र नाही कळल्यावर मोठ्या प्रयासाने हुंदके गिळायची ती.... पापण्या घट्ट मिटून सारे अश्रू डोळ्यातच जिरवायची ती...''

पलंगावर पडून ती बाहेरचा कानोसा घेत होती. विचार करीत होती मी त्यांची आई... अशी एकदम टोकाची भूमिका घेवून दोघांना तोडलं मी... असं तडकाफडकी निर्णय घेणं योग्य होतं?? त्यांनी पैसे पाठवले नाहीत... बापाच्या आजारपणात मदत करणं लांबच साधी विचारणा केली नाही... माझ्या मातृत्वाचा अपमान केला. थोरल्याने असं विचारून की, ''तू काय माझ्या एकट्याचीच आई आहेस? मीच काय म्हणून मदत करू तुला?''

पैसे मागण्याचा हक्क होताच मला. वास्तविक न मागताच त्यांनी पैसे पाठवायला पाहिजे होते... मला काय चैनीसाठी हवे होते पैसे? घरात नवरा आजारी... पुरेसं अन्न नाही... औषधोपचार नाहीत... मुलगी किती पुरवणार? सावकाराच्या धमक्या... इतरांचे अपमानकारक शब्द ऐकून झुरून झिजून मेला बिच्चारा नवरा माझा! काय आणि कशासाठी अशा या लेकरांशी संबंध ठेवायचा? जोवर माझ्या उदरात होते ते तोवरच त्यांचा माझा खरा संबंध होता. उदराबाहेर येताच नाळ कापून आतड्याचा आतड्याशी असणारा संबंध संपला. त्यांचं दूध तोडलं त्यावेळी माझ्या छातीशी असणारा संबंध संपला त्यांचा... ते हाताने जेवू लागले आणि त्यांना भरवण्याशी असणारा माझा संबंध संपला... मोठे होत गेले तस तसा माझ्या सहवासातला संबंध संपुष्टात येत गेला.... त्यांची लग्ने करून दिली आणि माझ्यावर अवलंबून राहण्याचा संबंधही संपलाच... परंतु त्यांच्यावर अवलंबून राहण्याची पुरेपूर शिक्षा दिली त्यांनी मला... त्यानंतर राहिला होता केवळ नातेसंबंध! जो त्यांनाच नकोनकोसा होता. तो संबंध मीच तोडून संपवला. तुटत तुटत संपले सारे संबंध.... सारं जीवन रिकामं झालं... भली मोठी पोकळी पडली. खोल खड्डा पडला जीवनाला. तडाच गेला आयुष्याला... मी त्यांची आई पण मनच नाही कळलं त्यांना माझं! कसं पचवलं मी पुत्रवियोगाचं दु:ख? काळजाचा लचका तोडणारं.... कुरतडणारं ते भयान दु:ख कसं पेललं, कसं झेललं मी? मायाममतेचे नाजूक तंतू भरभरा ओढून तरतरा तोडणं काय सहज साधं सोपं असतं? किती गुदमरलाय माझा जीव क्षणोक्षणी हुंदके गिळताना.... कसं साधलंय मी फुटू पाहणारं हृदय? कसा थोपवलाय मी साऱ्या अश्रूंचा महापूर? कसं आणि कोणाला सांगू मी??

खरंच, काय हक्क होता त्यांच्यावर माझा? मी जे केलं त्यांच्यासाठी ते कर्तव्यच होतं नां माझं? त्या कर्तव्याची भरपाई म्हणून हक्क? कलियुग आहे हे. मुलांनीच जर विचारलं, आम्हाला जन्म देण्याचा आग्रह अथवा जबरदस्ती आम्ही केली नव्हती. मरणयातना सहन कराव्याच लागतील याची पूर्ण जाणीव असून, तू जन्म दिलास आम्हाला आणि केलंस संगोपन तू आमचं त्यात काय दिव्य केलंस? कर्तव्य केलंस? उपकार नव्हतेच हे! तुझ्या मर्जीने जन्मलो आम्ही म्हणून काय जन्मभर तुझ्याच मर्जीने वागायचं, जगायचं आम्ही?'' काय उत्तर देवू शकेन मी त्यांना?

काही दिव्य, काही उपकार केले नाहीत मी. उपकार तर त्यांनीच केलेत नां माझ्यावर? त्यांच्यामुळेच मी आई झाले!! स्त्री जन्म सार्थकी झाला माझा तो त्यांच्यामुळेच. माझ्या यातना

गौण!! माझे कष्ट क्षुल्लक!! माझी माया कवडीमोल!! ते नसते तर साऱ्या जगाने मला ''वांझ'' म्हणून हिणवलं असतं. वंशवृद्धीसाठी नवऱ्याने दुसरी बायको आणली असती... आता वाटतं... खरंखरं वाटतं जगाचं ते हिणवणं आणि सवतीचं वर्चस्व मी सहनही केलं असतं... पण मूल असूनही हे 'वांझोट' जीवन जगणं नशिबी आलंय. असह्य आहे ही सल!!! त्यांच्या आधाराने, त्यांच्या भरवश्यावर जगण्याचा कसा असा मोह पडला मला?? त्यांच्या नाजूक, गोंडस, लुसलुशीत देहाला हृदयाशी कवटाळताना वाटलं होतं सारं आकाशच कवेत घेतलंय मी... ''घरभर त्यांचं दुडदुडणं बघून वाटायचं चंद्रसूर्य आलेत वस्तीला माझ्या घरात...'' किती तृप्ततृप्त वाटायचं त्यांचं कोवळं जावळ हुंगतांना... किती धन्यता वाटायची त्यांना न्हावू घालताना... कसं मोहरून यायचं तनमन त्यांना दूध पाजताना... त्यांनी आईऽऽ अशी साद घातली की मनाचा प्राजक्त तरारून बहरायचा... सारं जीवन सुंदर, सुगंधी, संगीतमय वाटायचं....

त्यांचे ते छोटे छोटे गुलाबी तळवे किती कित्तीदा मी चुंबून घेतले होते. कल्पनाच नव्हती ना की हेच तळवे मोठे झाल्यावर माझ्या साऱ्या स्वप्नांचा चेंदामेंदा करतील? हेच पाय माझी मायाममता ठोकरतील... ज्या पायांना मी मातीही लागू दिली नाही तेच पाय माझ्या सुखावर मातीचा ढीग रचून दूर जातील. इवले इवले त्यांचे हात सारखेच गळामिठी घालायचे. वाटलंच नव्हतं की कधी तरी हेच हात मला झिडकारतील... जीवनातूनच ढकलून देतील मला... त्यांच्या आधाराने सारं विश्व मी कवेत घेणार होते. एक राणी माँ म्हणून मिरवणार होते. पण मीच माझ्या कवेतून निसटून गेलेय. त्यांचा आधार असताना आकाश जरी कोसळलं असतं ना तरी त्या आकाशाच्या तुकड्यांवर मी भक्कम पाय रोवून उभी ठाकले असते. पण आज दाहीदिशांनी आकाशच चालून आलंय माझ्यावर... पात्राखालची जमीन धसतच चाललीय... म्हातारणाचा आधार असणारे शरीराने व मनानेही खूप दूर आहेत माझ्यापासून....

मरण येत नाही म्हणून जगतेय मी.... ते ही लेकीच्या आश्रयाने... तिच्या दयेवर! आपण कोणाला तरी खूप आवडतो, आपली गरज आहे कोणाला तरी एवढही खूप खूप असतं जगण्यासाठी... कोणी तरी आतुरतेने प्रतिक्षा करंतय, वाट बघतंय हेच तर खूप असतं अगदी अनवाणी चालण्यासाठी... कोणी तरी आपली आठवण करतंय हे ही पुष्कळच असतं आपल्या 'असण्या'साठी आणि नसण्यासाठी देखील... परंतु मी अभागी... त्यापैकी माझ्यासाठी काही काहीच नाही... ना मी कोणाला आवडते ना हवीशी वाटते... ना कोणी माझी वाट बघतं ना कोणी माझी आठवण करतं... ना कोणाला माझी गरज आहे. माझ्या 'असण्यालाच' किंमत नाही तर 'नसण्याची' कोण खंत करेल? एखादाच असतो का श्रावणबाळ जो प्राणपणाने आपल्या मातापित्याची इच्छापूर्ती करतो? असा एकच असतो का पुंडलिक जो मातापित्याच्या सेवेत व्यत्यय नको म्हणून प्रत्यक्ष देवालाच प्रतिक्षा करायला लावतो.? एक, फक्त एकच होता का तो येशू ज्याच्या हातापायात आरपार खिळे होते. मस्तकात काट्यांचा मुगुट रूतला होता. मरण यातना सहन करीत होता तो.... आणि तशा अवस्थेतही त्याने आपल्या आईविषयी असणारे आपले पुत्रकर्तव्य प्रामाणिकपणे चोख बजावले होते. माझ्या मुलांसाठी त्यांचे आदर्श गौण आहेत. आई-बापाला वाऱ्यावर सोडणारे, तुच्छ लेखणारे, विलक्षण तिरकस स्वभावाचे, बायकांच्या तालावर नाचणारे असे माझे पूत्र... काय चुकले मी त्यांच्याशी संबंध तोडले तर? वाटलं होतं मोठेपणी मूलं विसावा देतील बापाला. सूना आल्या की माझे कष्ट संपतील... त्यांनी भराभर मोठ्ठ व्हावं म्हणून मी त्यांच्या बालपणालाच तारूण्याचा आशीर्वाद द्यायचे! यशाच्या, समृद्धीच्या कीर्तिच्या उंच शिखरावर असावीत माझी बाळं म्हणून उपवास, व्रत, प्रार्थना, पूजा-अर्चा करायचे मी. पण साऽऽरं सारं व्यर्थ झालं... मातीमोल ठरलं... आता वाटतं नसती मोठी झाली मूलं तर अजूनही त्यांची गळामिठी असती.... अजून त्यांच्या पैंजणाची रूणझुणक घरभर असती. अजून माझ्याच कुशीत विसावले असते. माझ्याच मांडीवर अंगाई ऐकत झोपी गेले असते. अजून चिवूकावूचा घास भरवला असता त्यांना.... दूर नसते गेले ते... नसते गेले दूर... जाईनात का दूर पण इतके दूर की फिरून कधीच येता येणार नाही? विसरून जाण्याइतके दूर? रक्तबंबाळ, जखमी जीवन जगायचं कोणासाठी? अर्ध जीवन त्यांचं संगोपन करण्यात गेलं. अर्ध जीवन त्यांची प्रतिक्षा करण्यात गेलं... हो, पण आता प्रतिक्षा संपलीय. मुलं आलीत माझी... माझ्यासाठी आलीत... उशिरा का होईना पण आलीत...!!

ती विचार चक्रात गरगरत होती आणि तिची मूलं आपली नसलेली निर्दोषता सिद्ध करीत बहिणीला जाब विचारीत होती. मेव्हण्याशी वाद घालत होती.

थोरला म्हणाला, ''आता बाबा नाहीत. आईला नेतो आम्ही. राहील आळीपाळीने आम्हा दोघांजवळ ती!!''

बहिण म्हणाली, ''तुमच्या पोरांना कडेवर घेवून फिरण्याची शक्ती नाहीये आता तिच्यात. मागे नेली होती तिला तुम्ही... राबवून घेतलं तुमच्या बायकांनीच तिला. आजारी पडली ती तर इथे सोडली आणून तुम्ही.... 'आजारी सासू आमच्या घरी नको' असे तुमच्या बायका स्पष्ट म्हणाल्या. हे विसरली नाही ती अजून, काळजाचा घाव आहे तो... नाही वाटत ती तुमच्याकडे येईल. तिच्या आजारात नोटा लागतील हे चालेल बायकांना तुमच्या? तिची सेवा करतील तुमच्या बायका? मरणाऱ्या

बापाची दखल न घेणारे तुम्ही कशावरून नीट सांभाळाल आईला?''

धाकट्याने मोठ्या तोऱ्यात विचारले, ''बाबा सारखेच आजारी असायचे. कामकाज सोडून काय सारखंच यायचं होतं आम्ही? सारखेच पैसे पुरवायला खजिना नाही ना आमच्याजवळ? बाबांनी कमवून ठेवलं असतं आमच्यासाठी तर नोकरी सोडून बसलो असतो की बाबांची सेवा करत.''

मेव्हणा म्हणाला, ''नको येवू. नका मदत देवू. निदान विचारपूस तर करायची होती. तुमची वाट बघत खंगून झुरून शेवटी गेले बाबा.''

थोरला म्हणाला, ''खंगण्या झुरण्याची त्यांना गरजच नव्हती ना तुम्ही दोघं असताना. आमच्या भरवश्यावर बसण्यापेक्षा फंडाच्या पैशातून उपचार करायचे होते त्यांच्यावर. आमच्या लग्नाची त्यांनाच फार घाई होती. कर्ज काढून लग्न करण्याची गरजच नव्हती. एकदा लग्न झालं की नवा संसार... हौसमौज मग लेकरंबाळ यांच्या व्यापातून कर्ज फेडणार कसं आम्ही? हे बाबांना कळायला पाहिजे होतं ना? फंडातून कर्ज फेडणं शक्य होतंच की! पण सारे पैसे तुमच्या हातात असल्यावर तुम्ही म्हणाल तसेच वागणार ना बाबा?''

मेव्हणा रागाने म्हणाला, ''फंडाची रक्कम केवळ ५० हजार होती. त्यातून तुम्ही २० हजार गाडी घेण्यासाठी महिन्याच्या बोलीवर नेले. लग्नातल्या कर्जाचे १० हजार दिले. बाबांच्या दवाखान्याचा खर्च - घरखर्च यात सर्व रक्कम संपली. बाबांचे बीलच १५ हजार आले. तुम्ही नेलेले पैसेच आई मागत होत्या.''

धाकटा म्हणाला, ''फंडाच्या पैश्यावर आमचा हक्क नव्हता का? दादाने २० हजार घेतले तो त्याचा वाटा होता. मला तर छदाम नाही मिळाला. बाबांच्या औषधाचे म्हणाल तर तुम्ही पुरवू शकले असता ना?''

मेव्हणा चिडून म्हणाला, ''मी डॉक्टर असलो तरी औषध मला विकतच आणावी लागतात. मला शक्य होतं ते मी केलं. तुम्ही काय काय केलंय याच्याशी आम्हाला कर्तव्य नाही. जे केलं असेल ते सर्व स्वार्थीपणानेच केलं असेल...''

''नीट लक्ष दिलं असतं तर बाबा गेले नसते,'' असे थोरला म्हणताच बहीण उसळून म्हणाली, ''लक्ष तुम्ही द्यायचं होतं... जबाबदारी नको तुम्हाला हक्काच्या गोष्टी मात्र करताय!''

धाकटा म्हणाला, ''ताई झालं गेलं विसर!! आईला नेतो मी. चांगल्या डॉक्टरचे उपचार करतो. मी सांभाळीन कायम तिला...''

मेव्हण्याने टोकलं, ''आई तुम्हां दोघांकडेही येणार नाही बाबांना त्यांनी तसं वचन दिलंय. तुमच्यावर कोणताच भार न टाकण्याची शपथ घातलीय त्यांनी आईला... आईचा अंत्यसंस्कारही मीच करेन. ही त्यांची शेवटची इच्छा आहे.''

जावयाचे हे शब्द कानी पडताच गदगदली ती... मोठा हुंदका दाटून आला तिला. नवऱ्याचे अखेरचे शब्द आठवले तिला... ''माझ्या मरणाची खबरही देवू नकोस त्या दोघांना... आणि तुझ्याही प्रेताला त्यांच्या खांद्याचा आधार घेवू नकोस. का आणि कशाला थोडावेळ तरी त्यांच्यावर भार टाकावा आपण? वचन दे, तू त्यांच्याकडे जाणार नाहीस. तू मेल्याचं कळल्यावरही ते येतीलच कशावरून? निर्दयी, कठोर आहेत ते. आले तरी नाटकीच रडतील ना? आसच ठेवू नकोस त्यांची!''

आणि परत विचार चक्रात गुरफटली ती!! खरंच काय अयोग्य सांगतोय नवरा? खोलवर दुखावलाय तो!! जिवंतपणीच मेल्यात गणना करणाऱ्या पोरांबद्दल दुसरं काय बोलणार, सांगणार तो तरी बापडा... मेला नी सुटला... पण मला तर जगायचंय... मरण येईपर्यंत त्यांच्याच आठवणींवर जगायचंय... नाही वाटत मला फार काळ जगेन मी... लवकरच माझ्या शरीराची राख पसरेल साऱ्या आसमंतात... मूठभरच राख ती पण आभाळापर्यंत जाईल... धुसर होतील. चंद्रतारे.. मी असेन क्षितीजापार... आकाशगंगेच्या तीरावर... तुमच्या विरहात बाळांनो, जे अश्रू मी ढाळलेत त्याचा महानद होईल रौद्र.... त्याची गलबलती खळखळ बघून समुद्रही हुंदकेल गदगदून... तुमच्यासाठी जी अंगाई गाईली होती मी, लाटांवर तरंगेल निष्प्राण होवून... फुटू पाहणारं हृदय आणि महासागरी अश्रू सारं थोपवलं होतं मी पापण्याच्या डोहातच काळीज सांधून... पण मूकपणे भळभळतच राहिली जखम... पहाटेच्या धुक्यातून, कोवळ्या उन्हातून, टळटळल्या दुपारी, कातर सांजवेळी, काळोख्या रात्री तुमचीच प्रतिक्षा करीत राहिले की... माझी सावलीच खुडून नेली तुम्ही... टळटळीत, रणरणत्या दुपारसारखा माझा भविष्यकाळ... रखरखीत वणव्यासारखा माझा वर्तमानकाळ... पण तुम्हाला एकदाही वाटलंच नाही की बघावं मागं वळून कशी होरपळत्येय आपली आई वियोग दु:खात? काळोखात ढकलण्यापूर्वी एखादी पणती तरी ठेवून जायचं होतं तुम्ही.... आभाळभरचा अंधार पसरवूनच गेलात तुम्ही... आणि विसरूनही गेलात की आपल्याला आई आहे.... तुमचा बालहुंकार मी अजून जपलाय, कवटाळलाय हृदयाशी... मनाचं तळघर काठोकाठ भरलंय दु:खाने...

हुंदके आवरताना श्वास गुदमरतोय माझा. प्रतिक्षेतच संपून जाईन मी.... माझ्या शरीराच्या राखेचे कण आतुरतेने म्हणतील, ''या रे बाळांनो, घरी परत या. एखादा राखेचा कण आदळेल तुमच्या दारावर... दार उघडून याल तुम्ही बाहेर... आणि तो राखेचा कण असेल तुमच्या पायाखाली... शांत, नि:शब्दपणे चुंबून घेईल तुमचे तळपाय तो राखकण... मला खूप समाधान मिळेल तुमच्या पदस्पर्शातून...'' मी कळवळून विनवित होते

नका रे जावू मला सोडून... पण तुम्ही निष्ठुरपणे गेलातच... तुमचे जाणारे पाय मी अडवून रोखू शकले नव्हते. पण जाण्यापूर्वी जेथे तुम्ही उभे होता ती जागा मी वेड्यासारखी रोज रोज चुंबून घेत होते... आई ना मी तुमची?? रोजरोज कितीदा तरी कळवळून, तळमळून आर्त हाक मारलीय मी तुम्हाला... मनातल्या मनात... पण कुठं कशी कमी पडलेय मी? इतकी मायाममता करूनही माझा आर्त स्वर कसा नाही पोहचला तुमच्यापर्यंत? चुकूनही कधी कधीच आठवण नाही आली माझी? कधी नाही वाटलं आईच्या कुशीत शीरावं? कधी नाही वाटलं आईच्या मांडीवर मस्तक ठेवून शांतपणे झोपावं? तुम्ही माझ्या मिठीतच आहात या वेड्या विचाराने मी मलाच कवेत घेवून समाधान मानत आले. तुमचे डोके मांडीवर आहे या विचाराने मी हळूवार मांडीवर थापटत राहिले. जीवनाच्या शेवटच्या क्षणी तुम्ही जवळ असावं... तुमचे हात हाती असावेत. तुमची ''आई'' अशी साद हृदयात खोलवर साचत असतानाच हृदयाची धडकन थांबावी... पण देवजाणे ही इच्छा पूर्ण होतेय की नाही?

आता तिच्या डोळ्यांवर झोपेची जबरदस्त झापड येवू लागली... हातापायातली शक्ती संपत चालल्याचं जाणवू लागलं... ती मोठ्या प्रयासाने स्वत:ला सावध ठेवण्याचा प्रयत्न करीत होती. लेकरांना डोळे भरून बघायचं होतं तिला... पापण्या एकमेकात घट्ट बिलगू बघत होत्या. तगमग वाढली होती. जीव कासावीस झाला होता आणि त्याचवेळी दोन्ही बाजूने हात धरले गेल्याची तिला जाणीव झाली. तिचा रोमरोम त्या स्पर्शाने मोहरला, बहरला. सारी अस्वस्थताच संपली. प्रसन्नतेची लहर शरीरभर पसरत चेहऱ्यावर स्थिरावली. 'आईऽ आईऽऽ आईऽऽऽ' ही साद ती हृदयात साठवत राहिली. मोठ्या प्रयासाने तिने डोळे उघडले. आपल्या लेकरांकडे बघता बघता तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळले आणि क्षणातच तिची मान हलकेच कलली....

घरंगळणारी अश्रूधार अखेरची असल्याचे लेकीने ओळखले. हंबरडा फोडला तिने... आईच्या निष्प्राण देहाला कवटाळून रडणारी तिची लेकरं, जावई थंड नजरेने, शांतपणे बघत होते. दोन्ही मुलांनी आईचे हात गच्च धरून ठेवले होते... चिड आली जावयाला यांची... त्या आईची तगमग आठवली, तिची कासाविस, घालमेल आठवली... जिवंतपणे तिला ठोकरणारे आता तिच्या पायावर डोकं ठेवीत होते हे बघून त्याने हलकेच बायकोच्या कानात कुजबुज केली आणि दोघं नवराबायको अंत्ययात्रेच्या तयारीला लागले. लेकीने महायात्रेसाठी आपल्या आईची तयारी पूर्ण केली.

थोरला आणि धाकटा अंगणातच घुटमळत होते. धाकट्याने दारातूनच बहिणीला विचारले ''ताई तिरडीची व्यवस्था....?'' त्याला मध्येच आडवित मेव्हणा म्हणाला, ''त्याची तुम्ही काळजीच करू नका. तिरडीची आणि इतर सामानाची गरजच नाहीये... आईला नेण्यासाठी ॲम्बुलन्स येईल आणि विद्युत दाहिनीत त्यांचा अंत्यसंस्कार होईल... त्यामुळे तेथे तुमची काहीच आवश्यकता नसेल...''

दोघा भावांनी चमकून एकमेकांना पाहिले...

ॲम्बुलन्स आली... दोघं भाऊ तत्परतेने धावले पण तोवर जावयानेच सासूमाँचे पार्थिव अलगद उचलून स्ट्रेचरवर ठेवलेही...

दोघं नवराबायको गाडीत चढताच दार बंदही झालं...

गाडी वळणावर पोहचून दिसेनाशी होताच दोघं भाऊ भानावर आले... आपली आई महायात्रेला निघालीय. आपण येथेच असून, त्या यात्रेत सहभागी होवू शकत नाही या जाणिवेने दोघं भारावले. भ्रमिष्टासारखे एकमेकालाच न्याहाळीत राहिले. मेव्हण्याने प्रत्येक शब्दावर जोर देवून उच्चारलेले शब्द कानात घुमू लागले. ''तेथे तुमची काहीच आवश्यकता नाही.'' अवसान गळाल्याने एकमेकाला आधार देत ते खाली बसून हमसून रडू लागले. अचानक त्यांची नजर बंद दारासमोरच्या बॅगांकडे गेली. दार बंद करण्यापूर्वी त्यांच्या बॅगा दाराबाहेर ठेवून परतून जाण्याचा एक इशारा त्यांना देण्यात आला होता.

दोघांच्या दु:खाला खदखदून उकळी फुटली होती आणि त्याचवेळी मेव्हणा समाधानाने विचार करीत होता की, प्रामाणिक आईबापांच्या कृतघ्न पोरांवर क्षणभरही दोघांच्या पार्थिवाचा भार मी पडू दिला नाही. त्यांची कोणतीच इच्छा त्यांच्या पोरांनी पुरी केली नव्हती. मी मात्र त्यांची शेवटची इच्छा संपूर्णपणे पूर्ण केलीय...

